# महाराष्ट्राचे शिल्पकार विनोबा भावे



**प्रा. किसन चोपडे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

# विनोबा भावे

प्रा. किसन चोपडे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ३१
प्रथमावृत्ती : जानेवारी २०१०

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, २ रा मजला,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
प्रमोद भोगटे,
स्नेहेश प्रिंटर्स,
३२०-ए, शाह अँड नाहर इंड. इस्टेट अ-१,
धनराज मिल आवार, सीताराम जाधव मार्ग,
लोअर परळ, मुंबई-१३. (दूरध्वनी : २४९४ ५६१५)

मुखपृष्ठ : राजा बडसल, पुणे

किंमत : रु. ४६/-

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी
साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राची संत परंपरा फार उज्ज्वल आहे. प्राचीन काळापासून ह्या भूमीमध्ये अनेक संत आणि सत्पुरुष निर्माण झाले. त्यांनी महाराष्ट्राला सन्मार्ग, सत्‌गती व सत्त्वशीलता शिकवली. सर्वसामान्यजनांना संसार सांभाळूनही अध्यात्माकडे वळविण्याचा प्रयत्न केला. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्यासारख्या संतांनी 'भावार्थ दीपिका' सोप्या मराठीमध्ये आणून भगवत्‌गीतेतील तत्त्वज्ञान बहुजन समाजासाठी खुले केले. त्यानंतरच्या सर्व संतांनी महाराष्ट्राला वर सांगितल्याप्रमाणे सन्मार्गावर नेण्याचे अतुल्य काम पार पाडले. त्यामुळेच महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. कर्मयोग, धर्मयोग, भक्तीयोग आणि ज्ञानयोग यातील सारे तत्त्वज्ञान या संतमंडळींनी कधी काव्यातून तर कधी कीर्तनातून, कधी प्रवचनातून-निरूपणातून तर कधी भजनातून, शिकविले. महाराष्ट्राची सात्विकता या सर्व संतमंडळींनी सांभाळली एवढेच नव्हेतर तर तिचे संवर्धनही केले.

काळ बदलला त्याप्रमाणे समाजाच्या गरजाही बदलत गेल्या. तरीही कर्मयोग, धर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग यांना पर्याय नव्हता. किंबहुना सर्वसामान्य माणसाला त्यांचा मोठा आधार वाटत होता. एकोणिसाव्या, विसाव्या शतकामध्ये भारतामध्ये स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. नव्या काळाची राजकीय स्वातंत्र्य ही महत्त्वाची गरज होती. त्यानुसार लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर, महात्मा गांधी यांसारख्या महामानवांनी देशाला स्वातंत्र्याचा मंत्र दिला तर महात्मा जोतिबा फुले, न्या. रानडे, न्या. गोखले, आगरकर, कर्वे आणि बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या प्रबोधनकारांनी जनतेला सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखविला. स्वातंत्र्य चळवळ चालू असताना ज्यांनी महाराष्ट्रीय समाजाला राजकीय आणि सामाजिक नेतृत्वाबरोबरच आध्यात्मिक नेतृत्वही पुरविले, त्यामध्ये पूज्य साने गुरूजी आणि विनोबा भावे यांचा प्रामुख्याने समावेश होतो. महाराष्ट्रामध्ये गांधीवाद, सर्वोदयवाद

यांच्याद्वारे समाजाचे मनोपरिवर्तन करून त्याला अहिंसा, शांती, करुणा, क्षमा, सत्याग्रह याद्वारे नवा आध्यात्मिक सन्मार्ग दाखविण्याचे कार्य पूज्य साने गुरूजी, आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, दादा धर्माधिकारी आदि विचारवंतांनी केले. त्याबरोबरच विनोबाजी भावे यांनी महात्मा गांधींच्या शिकवणीनुसार आचरण करून समाजाला एक आदर्श घालून दिला. महात्मा गांधींनी सुरू केलेल्या सत्याग्रहीव्रताचा पहिला स्वयंस्फूर्त सैनिक म्हणून विनोबाजींचे नाव आदराने घेतले जाते. महात्मा गांधींची शिकवण विनोबाजींनी स्वत:तर पाळलीच परंतु गांधीमार्गावरून समाजाने वाटचाल करावी, यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांची 'गीता प्रवचने' आणि 'गीताई' हे दोन ग्रंथ मराठीमध्ये अपूर्व म्हणता येतील, अशा योग्यतेचे आहेत. त्याशिवाय महात्माजींच्या वर्धा आश्रमामध्ये राहून त्यांनी केलेले विधायक कार्य महत्त्वाचे होते. बुनियादी तालीम, भूदान, ग्रामदान यासारखे त्यांचे समाजपरिवर्तनाचे प्रयोग देशामध्ये नव्हे तर सर्व जगात अतुलनीय म्हणता येतील, अशा योग्यतेचे होते. या सर्वातून त्यांच्या संतत्वाची एक शुचिर्भूत प्रतिमा साकार झाली.

महाराष्ट्राच्या संत परंपरेमध्ये शोभून दिसावे असे विनोबाजींचे चरित्र होते. म्हणूनच त्यांना संत विनोबा असे सार्थपणे म्हटले जाते. संत या पारंपारिक संज्ञेपलिकडे विनोबाजींचे संतत्व गणले गेले पाहिजे. 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या चरित्रमालेमध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे विनोबा भावे यांचे चरित्र प्रकाशित करण्याचा योग यावा, ही भाग्याची गोष्ट होय. प्रा. किसन चोपडे यांनी विनोबाजींचे चरित्र आटोपशीरपणे मंडळाला लिहून दिले, त्याबद्दल त्यांचे आभार.

**मधु मंगेश कर्णिक**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# दोन शब्द

१९५८-५९ च्या दरम्यान केव्हातरी विनोबांची पदयात्रा औरंगाबादला आली असताना सरस्वती भुवन हायस्कूलमध्ये विनोबांचे प्रवचन ऐकले होते. विनोबांविषयी एक वलय पूर्वीच निर्माण झालेले होते. एक व्यक्ती भूमीहीनांसाठी जमीन मागतो आणि लोक त्याला जमिनी कशा देतात? हेच तेवलय. हीच त्या वयातील विनोबांची ओळख. पुढे पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात गांधी, विनोबा, जयप्रकाश नारायण, सर्वोदयाचा अभ्यास करावा लागला. यातच १९७० साली विनोबांचे 'तिसरी शक्ती' हे पुस्ताक प्रसिद्ध झाले. या पुस्तकातून विनोबांची नवीनच ओळख झाली. विशेषतः या पुस्तकात असणारे 'गांधीजी आणि साम्यवाद' हे प्रकरण. १९५० साली किशोरीलाल मश्रुवालाच्या गुजराती पुस्तकात 'गांधीजी अने साम्यवाद' या नावाने लिहिलेली ही प्रस्तावना मराठीतील उत्कृष्ट प्रस्तावनेत मोडते.

गांधींचा विचार आणि मार्क्सचा विचार त्यांचे स्वरूप, साम्य, भेद सर्व गोष्टी अत्यंत साध्या सोप्या भाषेत विनोबांनी या प्रकरणात सांगितल्या आहेत. विनोबा म्हणतात-''भारतात गांधी विचार आणि साम्यवाद यांची सतत तुलना केली जाते. गांधीच्या विचाराभोवती अध्यात्मिक तेजोवलय असून, साम्यवादाला शास्त्रीय परिभाषेचे मोठे पाठबळ आहे. गांधी विचाराने भारताचे स्वराज्यसंपादनाचे श्रेय पदरात पाडून अव्यवहार्यतेच्या आक्षेपातून सुटका करून घेतली. तशीच साम्यवादाने चीनच्या पुराण पुरुषाला तारुण्य देऊन आपली तत्कालीक शक्ती दाखवून दिली आहे. त्यामुळे दोन्ही विचारांचा शक्य तितका ताळमेळ साधावा अशी लालसा काही प्रचारकर्त्यांच्या मनात उठत असते.''

यात विनोबांनी फार मोठे सत्य सांगितले. गांधी विचारांच्या समर्थकांना आणि साम्यवाद्यांना खरे म्हणजे यापासून काही शिकून या देशासाठी फारसे काही

करता येईल.

विनोबा ७० च्या दशकात पुन्हा एकदा वलयांकीत झाले. पण राजकारण आणि अध्यात्माची जोडी होऊच शकत नाही, हे विनोबांचे तत्व पुन्हा 'अनुशासनपर्व'च्या घोटाळ्यामुळे सिद्ध झाले. विनोबांनी ज्या प्रमाणे गांधी विचारांची व्यवहार्यता दाखविली तसेच विनोबांच्या विचारांचीही व्यवहार्यता सिद्ध झालीआणि होऊ शकते.

सामान्यांना हे सगळे सामान्यपातळीवरून सांगण्याचा हा प्रयत्न करण्यात आला आहे. विनोबा भाषाप्रभु; पण त्यांच्या भाषेतला सर्व सामान्यांसाठीचा भागच मोठ्या प्रमाणात  निवडून विनोबांचे निरव विचार आणि कार्य सांगण्याचा प्रयत्न येथे केला आहे. तो कितपत यशस्वी होईल हे वाचकच ठरवतील. पण या प्रयत्नाला प्रोत्साहन दिले महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी. महाराष्ट्राचे शिल्पकार या मालिकेमुळे महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रातील जडणघडण सर्व सामान्यांपर्यंत या मार्फत पोहोचविण्याची प्राचार्य बोराडे यांची धडपड यशस्वी करण्यात मला सहभागी होता आले याचा आनंद आहे.

**-प्रा. किसन चोपडे**

# अनुक्रमणिका


१. पहिला सत्याग्रही ........ १
२. बालपण आणि शिक्षण ........ ४
३. साबरमती आश्रमात ........ १२
४. एका वर्षाच्या रजेवर ........ १७
५. वर्धा आश्रम ........ २३
६. गीताई-गीता प्रवचने ........ २९
७. बुनियादी तालीम ........ ४०
८. भूदान ........ ५३
९. बंगाल-ओरिसा पदयात्रा ........ ६०
१०. चंबळच्या खोऱ्यात ........ ७४
११. ग्रामदान ........ ८५
१२. सूक्ष्मतर कर्मयोग ........ ९२
१३. अखेरचे पर्व ........ ९७

# पहिला सत्याग्रही

म. गांधी नंतर म. गांधींचा विचार जिवंत ठेवणारा, म. गांधींच्या विचारानुसार आचरण करणारा म. गांधीचा सच्चा अनुयायी म्हणून विनोबा भावे यांचा उल्लेख करता येईल. १७ ऑक्टोबर १९४० रोजी देशी विदेशी वर्तमानपत्रातून पहिल्या पानावर चौकटीतून एक बातमी झळकली होती. ब्रिटीश सरकारने भारतीयांच्या संमतीचा विचार न करता दुसऱ्या महायुद्धात भारताला सामील करून घेतले. अशावेळी जनतेच्या सहकार्यासाठी ब्रिटीशांतर्फे होणाऱ्या प्रयत्नांना असहकार्य करण्याचे राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांनी ठरवले. काँग्रेस नेत्यांनी केलेल्या गंभीर चर्चेअंती ब्रिटीश शासनाविरुद्ध सविनय कायदेभंगाचे आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला. या आंदोलनाबाबत दिशा व कार्यपद्धती ठरवण्याबाबतचे सर्व अधिकार पक्षानी म. गांधींना प्रदान केल होते. म. गांधीजींनी नेहमीप्रमाणे सामुहिक सत्याग्रहाऐवजी व्यक्तीगत सत्याग्रहावर भर देण्याचे ठरवले. ब्रिटीश सरकारवर सत्याग्रहीच्या संख्यात्मक प्रभावाऐवजी व्यक्तीगत प्रभाव पाडून हेतू साध्य करण्याची नीति यावेळी म. गांधीनी ठरवली, या व्यक्तिगत सत्याग्रहात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबा भावे आणि दुसरा सत्याग्रही म्हणून पंडित नेहरू यांच्या नावाची घोषणा म. गांधीनी केली. वर्तमानपत्रातून आलेली बातमी ती हीच होती, आणि सर्वांनाच प्रश्न पडला. हे विनोबा भावे कोण आहेत? हे माहीत करून घेण्याची उत्सुकता सर्वांना लागली होती.

म. गांधीनी 'हरिजन'च्या अंकातून विनोबांची देशातील आणि जगातील कार्यकर्त्यांना ओळख व्हावी यासाठी 'हे विनोबा कोण आहेत?' या मथळ्याखाली स्वत:च विनोबांचा परिचय सर्वांना करून दिला. त्यात म. गांधी म्हणतात-

'हा विनोबा कोण' असा प्रश्न सर्वानाच पडला असेल, यांनाच का म्हणून प्रथम सत्याग्रही निवडले असेही सर्वांना वाटत असणार. विनोबा एक अण्डर

ग्रॅज्युएट आहेत. मी भारतात परतल्यावर विनोबांनी १९१६ मध्ये कॉलेज शिक्षण सोडले. विनोबा संस्कृतचे विद्वान असून साबरमती आश्रमाच्या संस्थापक सभासदापैकी ते एक आहेत. संस्कृतचे अध्ययन करून स्वत:ला अधिक पात्र बनवण्याच्या दृष्टीने त्यांनी आश्रमातून एक वर्ष सुटी घेतली आणि वर्ष संपल्याबरोबर आश्रमात रुजू झाले. विनोबा त्या दिवशी आश्रमात परतणार आहे याचा तर मला विसर पडला होता. आश्रमातील स्वयंपाक करण्यापासून ते संडास साफ करण्यापर्यंत सर्व लहानातली लहान कामे त्यांनी केली आहेत. अद्‌भूत स्मरणशक्तीची त्यांना देणगी असून प्रकृतीविद्यार्थ्याची आहे. आपल्या आयुष्यातील अधिकाधीक वेळ त्यांनी सुतकताईत खर्च केला असून सुतकताईत त्यांनी मिळविलेले नैपुण्य फारच थोड्यांनी मिळविले आहे. सुतकताई हा भारताचा प्रमुख उद्योग बनावा अशी त्यांची धारणा असून देशातील प्रत्येकाने सुतकताईचा स्वीकार करावा. यामुळे भारताचे दारिद्र्य दूर होऊन गावागावातून नवचैतन्य निर्माण केले जाऊ शकेल अशी त्यांना खात्री वाटते. विनोबा हाडाचे शिक्षक असून हस्तकलेच्या माध्यमातून शिक्षणाची योजना विकसीत करण्यात हिंदुस्थानी तालीमीसंघाच्या श्रीमती आशादेवी आर्यनायकम् यांना त्यांनी मदत केली आहे.सुतकताई हा मुलोद्योग मान्य करून सुतकताईवर त्यांनी एक पुस्तकही लिहिले असून त्यातील त्यांचा विचार अत्यंत मौलिक आणि नाविन्यपूर्ण आहे. सुतकताईच्या कार्यक्रमाची चेष्टा करणाऱ्याचा मनात या पुस्तकामुळे सुतकताई हे बुनियादी शिक्षणाचे माध्यम आहे असा विश्वास निर्माण होऊन सुतकताईला ग्रामोद्योगाचे स्थान मिळू शकेल. टकळीवर सूत कातण्याच्या पद्धतीत क्रांती करून टकळीच्या अकल्पीत शक्तीची ओळख त्यांनी सर्वांना करून दिली. याबाबत त्यांच्या इतके ज्ञान देशातील दुसऱ्या कुणाला असेल असे मला वाटत नाही.

विनोबांचा आणखी परिचय करून देताना गांधीजीपुढे म्हणतात-

''स्पृशास्पृश्यता हा विचार त्यांनी आपल्या मनातून पूर्णत: काढून टाकला असून माझ्या इतकीच त्यांचीही जातीय ऐक्यावर उत्कट निष्ठा आहे. इस्लाम धर्माची खरी ओळख व्हावी म्हणून त्यांनी वर्षभर अरबी आणि मूळ कुराणाचा अभ्यास केला आहे. आपल्या भोवतालच्या मुस्लीम बांधवांशी संपूर्ण संबंधासाठी ह्या अभ्यासाची त्यांना आवश्यकता जाणवली आणि ती त्यांनी पूर्ण केली.''

विनोबांच्या कार्याचा परिचय करून देत म. गांधीजी पुढे लिहितात-

त्यांच्या एका इशाऱ्यावर मोठ्यातला मोठा त्यागास सिद्ध होणारा मोठा शिष्यवर्ग त्यांच्यामागे असून त्या शिष्यवर्गात एका शिष्याने मनोहर दिवाण आपले सर्व आयुष्य कुष्ठरोग्याच्या सेवेसाठी अर्पण केले आहे. त्या शिष्यास वैद्यक किंवा

कोणतीही डॉक्टरी ज्ञानाची माहिती नसली तरी केवळ कुष्ठरोग्याच्या सेवेवर निष्ठेतून त्यांने या क्षेत्रात नैपुण्य मिळविले आहे. हा शिष्य आज अशा अनेक सेवा केंद्राचे संचालन करीत असून शेकडो कुष्ठरोगी रोगमुक्त केले आहे. त्यांनी अनेक वर्षे वर्धा येथील महिला आश्रमाचे संचालन केले आहे. दारिद्रीनारायणाची सेवा व त्यातील निष्ठेमुळे विनोबा वर्धायेथील खेड्यातून पवनार येथील आश्रमात दाखल झाले आहे. येथूनच त्यांनी आसपासच्या खेड्यांशी संपर्क ठेवला आहे.

भारतीय स्वातंत्र्याबाबत विनोबाचा दृष्टीकोन वर्णन करताना म. गांधी सांगतात-

''विनोबा भारतीय स्वातंत्र्याला नितांत आवश्यक मानतात. भारतीय इतिहासाचा अत्यंत खोलवर जाऊन त्यांनी अभ्यास केला आहे. परंतु रचनात्मक कार्याशिवाय ग्रामीण जनतेला खरे स्वातंत्र्य मिळणार नाही. खादी हा रचनात्मक कार्याचा बिंदु आहे असे विनोबा मानतात. चरखा हा अहिंसात्मक कार्याची खूण असून सत्याग्रहाचा त्याच्या मागील एक अभिन्न घटक होता. यापूर्वी विनोबा राजकीय व्यासपीठावर कधीही दिसले नाही, कारण सत्याग्रहावर निष्ठा ठेवून शांतपणे रचनात्मक कार्य करीत राहणे राजकीय भाषणबाजी पेक्षा अधिक प्रभावी आहे. तसेच रचनात्मक कार्यात पूर्ण विश्वास असल्याखेरीज अहिंसात्मक प्रतिकार असंभव आहे असे त्यांना वाटते.''

म. गांधींनी विनोबाचा इतका सविस्तर परिचय करून दिला असला तरी १९१६ सालीसुद्धा गांधीनी विनोबांच्या वडीलांना लिहिलेल्या पत्रातही विनोबांचा उल्लेख 'लहानशा वयात आत्म्याचे श्रेष्ठत्व आणि यम नियमाच्या पालनाची जाणीव असणारा तरुण ज्यासाठी मी (गांधीजी) अनेक वर्षांपासून प्रयत्न करीत आहे.'' या शब्दात केला होता.

म. गांधीनी खुद्द विनोबांचा इतका सविस्तर परिचय दिल्यामुळे सर्व भारतीयांना विनोबाचा परिचय झाला. पहिला सत्याग्रही या निवडीबद्दलही सर्वांचे समाधान झाले. विनोबांची ख्याती सगळीकडे पसरून त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्याची उत्सुकता सर्वांना लागून राहिली.

❐

# बालपण आणि शिक्षण

११ सप्टेंबर १८९५ रोजी महाराष्ट्राच्या कुलाबा जिल्ह्यातील गागोदे या गावी विनोबांचा जन्म झाला. चार भाऊ आणि एक बहीण यात विनोबा सर्वात वडील. विनोबांचे वडील नरहरी शंभूराव भावे बडोदा संस्थानात नोकर होते. आजोबा शंभूराव भावे एक प्रगतीशील विचाराचे पण धार्मिक प्रवृत्तीचे होते. विनोबांची आई रुक्मिणीदेवी अत्यंत भाविक, सतत परमेश्वर भजनात मग्न असे. विनोबाचे पाळण्यातले नाव विनायक. त्यांचे बालपण गागोद्यात आजोबांच्या सहवासात गेले. वाईच्या शिव मंदिराचे व्यवस्थापन भावे कुटुंबियांकडे असल्यामुळे वर्षातून सहा महिन्यात एकदा विनोबा आपल्या आजोबासोबत वाईलाही जात. सतत आजोबा सोबत असल्याने विनोबावर आजोबांचा प्रभाव पडला. शंभूराव धार्मिक असले तरी त्यांनी वाईचे शिवमंदिर दलितासाठी खुले केले. कधी कधी मुस्लीम गायकाच्या भजनाचे कार्यक्रमही या मंदिरात घेण्यात येत त्यामुळेकट्टर हिंदू शंभूरावाची टवाळी करीत. तरीही शंभूरावानी कुणालाही जुमानले नाही. या सर्वांचा प्रभाव बालपणातच विनोबावर पडल्यामुळे विनोबांचे विचार धार्मिक व उदारमतवादी बनले.

गागोदे येथे भावे कुटुंबाची शेती होती. या शेतात अनेक आंब्याची झाडे होती. आंब्याच्या दिवसात आंब्याची पहिली खेप शंभूराव आपल्या इष्टमित्रांना वाटीत व नंतरच घरी खात. शंभूराव नाडीपरीक्षा, रोग्याची शुश्रुषा, औषधोपचार विनामुल्य करीत. वयाच्या ३७ व्या वर्षी शंभूरावांनी गृहत्याग करून कोटेश्वराच्या सेवेत पुढील आयुष्य घालवले.

विनोबांची आजी गंगाबाई. वयाच्या ५५ व्या वर्षी लिहीणे, वाचणे शिकली. उदारमताची आणि कौटुंबिक अडचणींना धीराने सामोरे जाणे हा तिचा स्वभाव होता.

विनोबांचे वडील नरहरराव. विवेकी, नियमबद्ध, व्यवस्थित आणि टापटीपीचे गृहस्थ होते. पाश्चात्य शिक्षण आणि विज्ञान विषयावर त्यांचे प्रेम होते. बडोद्याच्या कलाभवन येथून त्यांनी कला, शिक्षण क्षेत्रातील पदविका मिळविली होती. त्यांची वृत्ती संशोधकाची होती. खाकी कपड्याचा शोध हे त्यांचेच संशोधन ह्यालाच पुढे ब्रिटीशांनी सैन्याच्या गणवेषासाठी स्वीकार केला. काही दिवस बकींगहॅम गिरणीत रंग विभागात सेवा केल्यानंतर ते बडोद्यात गेले. बडोदा संस्थानच्या कार्यालयात कारकूनाची नोकरी केली.

नरहररांची वृत्ती संशोधकाची असल्यामुळे कापडाच्या नवनव्या छपाईचे, नवनवे रंग, डिझाईन तयार करणे हा त्यांचा छंद होता 'कपडा छपाई' तंत्रज्ञ म्हणून त्यांचा लौकिक होता. तसेच शिस्तबद्ध आणि जबाबदार व्यक्ती म्हणूनही त्यांचा लौकिक होता. आपल्या प्रमाणेच विनायकानेही इंग्रजी, फ्रेंच शिकावे, परदेशात जावे. बॅरिस्टर व्हावे किंवा किमान आपल्याप्रमाणे ( Textile Chemist) औद्योगिक रसायनशास्त्री व्हावे असे त्यांना सतत वाटे.

आजोबा, आजी वडीलांबरोबर विनोबाच्या जीवनावर त्यांच्या धर्मनिष्ठ, प्रेमळ आईचा मोठा प्रभाव होता. विनोबांची आई अत्यंत साधी, संयमी आणि व्रतवैकल्याचे पालन करणारी गृहिणी होती. 'देतो तो देव आणि राखतो तो राक्षस' हा गुप्तमंत्र विनोबांना त्यांच्या आईनेच दिला होता. दारावर आलेला भिकारी हा ईश्वर असतो. पात्र अपात्रता ठरवणे हे आपले काम नाही. विनोबाचे जेव्हा आजन्म ब्रह्मचारी राहून समाजसेवा करण्याचा मानस बोलून दाखवला तेव्हा त्यांच्या या विचाराला संमती व त्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम त्यांच्या आईनेच केले होते. जो व्यक्ती विवाहानंतर सदाचारयुक्त आयुष्य घालवतो तो कुलकिर्ती वाढवतो. पण जो व्यक्ति ब्रह्मचारी राहतो तो मात्र आपल्या ४२ पिढ्यांचा उद्धार करतो. हा विचार विनोबांनी वयाच्या १० व्या वर्षी ऐकला तेव्हाच त्यांनी आजीवन ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय केला. त्यांचे धाकटे भाऊ बाळकृष्ण उर्फ बाळकोबा शिवाजी आणि दत्तात्रय पैकी दत्तात्रयाचे अकाली निधन झाले. परंतु बाळकोबा आणि शिवाजी यांनीही आजन्म ब्रह्मचर्याचे पालन केले. बहिण शांताबाईच्या लग्नानंतर काही दिवसातच तिचा मृत्यू झाला.

विनोबांच्या आयुष्यात वरील सर्व वडीलधाऱ्या मंडळीपैकी आईचेस्थान अनन्य साधारण असे होते. भावी आयुष्यातील अनेक गोष्टीचे मुळ त्यांच्या आईच्या शिकवणुकीत आढळते. 'जीवनाचा खरा आनंद संयम आणि संतोषातच असतो, मनात कोणतीही भीती न बाळगता ईश्वराप्रती पूर्ण श्रद्धा ठेव.' इत्यादी शिकवणुकीचा समावेश होतो.

विनोबांची बालपणीची आठ दहा वर्षे गागोद्यातच गेली. या काळात त्यांचा

प्राथमिक शाळेची संबंध आला नाही. आईनेच त्यांच्यावर नैतिक संस्कार केले. या वयातच त्यांना वाचन आणि पाठांतराची गोडी लागली. १९०१ साली गागोद्यातच त्यांचा उपनयन संस्कार करण्यात आला. १९०३ साली वयाच्या नवव्या वर्षी विनोबा बडोद्यास वडीलांकडे आले. बडोद्यात त्यांना एकदम तिसरी इयत्तेत प्रवेश मिळाला. विनोबा पुढे सतत प्रथम येत त्यामुळे दरवर्षी शिष्यवृत्ती त्यांना मिळत असे. सातवीत असताना विनोबांनी मराठीत ६५ टक्के आणि संस्कृतमध्ये ८५ टक्के मार्क्स मिळवून सर्वांना आश्चर्यचकीत केले होते.

बडोद्याला हायस्कूलमध्येच पुढील शिक्षणासाठी त्यांनी प्रवेश घेतला. प्रवेशासाठी इंग्रजी येणे आवश्यक होते. तेव्हा त्यांच्या वडीलानीच त्यांना इंग्रजी शिकविले. गणित हा त्यांचा आवडता विषय आणि भूमितीतील प्रमेये सोडवणे हा त्यांचा छंद होता. वाचनाचा त्यांना जबरदस्त व्यासंग होता. दिवस दिवस ते वाचनालयात काढीत. 'देवानंतर कोणती एखादी वस्तू मला प्रिय असेल तर ती भूमिती होय.'' असे ते म्हणत. याकाळात वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनाही ते गणित सोडवण्यासाठी मदत करीत. ते सतत आपल्या मित्रांना सूचवत एखादे गणित तुम्हाला सोडवता येत नसेल तर ते लिहून घेत व वर्गात शिक्षक गहन विषय समजूत सांगत अशा वेळी ते गणित सोडवित बसत.

विद्यार्थी दशेपासून लोकमान्य टिळकांच्या 'केसरी'चे विनोबा नियमित वाचक होते. देशांतर्गत राजकीय घटनापासून स्वतःला अवगत ठेवण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असे. राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय सहभागी होण्याची त्यांची उत्कट इच्छा होती. बंगालच्या क्रांतीकारी आंदोलनाचेही त्यांना फार आकर्षण होते. १९०५च्या वंगभंगाच्या आंदोलनाच्या काळात टिळक, चिपळुणकर हे त्यांचे आवडते नेते होते.

प्राथमिक शाळेप्रमाणे हायस्कूलमध्येही विनोबांनी आपला प्रथम क्रमांक सोडला नाही. मराठी आणि संस्कृतातील अभ्यासक्रमाबाहेरचे वाचनावर त्यांनी भरपूर वेळ दिला. मोरापंताची'केकावली' हे त्यांचे आवडते काव्य. विनोबांनी 'केकावली'चे भाषांतर इंग्रजी आणि फ्रेंच भाषेत करावे अशी त्यांच्या वडीलांची इच्छा होती. तर आपल्या मुलाने मराठी आणि संस्कृतकडे अधिक लक्ष द्यावे अशी त्यांच्या आईची इच्छा होती. मातृभक्त असल्याने विनोबाचे वडीलांच्या इच्छेकडे दुर्लक्ष केले व मराठी संस्कृतमध्ये प्रावीण्य मिळविले. इंग्रजीवरील त्याचे प्रावीण्य वडीलांमुळे होते.

'मौनार्थ सर्वार्थ साधनम्' हाच विनोबाचा विद्यार्थी जीवनातला आदर्श होता. अधिकाधिक वेळ मौन हा त्यांचा परिपाठ होता. गंभीर विषयावरील चर्चेत भाग

घेणे त्यांना आवडे. स्वच्छ साधा पोषाख पण अस्ताव्यस्त केस असा त्यांचा अवतार असे. अस्ताव्यस्त केसाबद्दल कुणी टवाळी केल्यास तुझे केस कापण्याचे दुकान आहे का? असा सवाल ते करीत.

विद्यार्थी दशेतच शिवजयंती साजरी करताना त्यांनी दाखवलेला स्पष्टवक्तेपणा शिक्षक आणि सहकारी मित्रांना चकीत करणारा ठरला. ''गुलाम घरात शिवजयंती साजरी करता येऊ शकते का?'' असा प्रश्न विनोबांनी शिक्षक आणि सहकारी मित्रांना करून वर्गाबाहेर शिवजयंती साजरी करण्याचे समर्थन केले. त्यासाठी झालेला दंडही त्यांनी भरला.

बडोद्याच्या मुक्कामात विनोबांनी लोकमान्य टिळकाचे गीतारहस्य व जोसेफ मॅझिनी या दोन्ही पुस्तकाचे वाचन केले होते. अभ्यासमंडळात या दोन्ही पुस्तकावर भाषण करणें त्यांना आवडे. संघटनात्मक काम मात्र त्यांना आवडत नसे. ''तुकारामाला एखाद्या ऑफिसात कारकूनीचे काम देणे'' असे त्यांचे संघटनात्मक कामाबाबत मत होते. अभ्यास मंडळाच्या निमित्याने ते सतत बाहेर राहत, उशिरा घरी येत तरी त्यांच्या आईने याबाबत तक्रार केली नाही. उलट उशीरा घरी गेल्यानंतरही आई त्यांना गरम जेवण वाढी. इतका विनोबावर त्यांच्या आईचा विश्वास होता. बाळकोबा त्यांच्या या कालखंडाविषयी लिहीतात, ''विनायक अर्ध्या रात्री पर्यंत वाचीत बसे, यामुळेच त्याची दृष्टी अधू झाली, तरी त्याने चष्मा घेण्यास नकार दिला. पुढे म. गांधीच्या आग्रहावरून चष्मा घेतला. विनायकाने आपल्या प्रकृतीची केव्हाही काळजी घेतली नाही. त्याला सतत ताप असे तरी स्वत:ची कामे तो स्वत:च करी.

**उच्च शिक्षण:** १९१३ साली विनोबानी मॅट्रीकची परीक्षा पास केली आणि बडोदा कॉलेजात इंटर मिजीएटसाठी प्रवेश घेतला. तेथेही त्यांच्यात काहीच बदल झाला नाही. उलट भटकण्याच्या त्यांच्या छंदात वाढ झाली. आधुनिक शिक्षणाचा प्रत्यक्ष जीवनात काहीच उपयोग नसल्याने आजकालची महाविद्यालये म्हणजे yours most obedient servant तयार करणारे कारखाने होत असे विनोबा आपल्या मित्रांना सांगत. ह्याही काळात विनोबांनी चौफेर वाचन केले. बडोदा सेंट्रल लायब्ररीत उन्हाळ्याच्या दिवसात विनोबा शर्ट टोपी काढून उघड्या अंगाने वाचीत बसले असता असे बसणे वाचनालयाच्या परंपरेविरुद्ध आहे असे म्हणताच, 'महाशय, देवाने बुद्धी दिली आहे म्हणून मी असा बसलो आहे''असे उत्तर दिल्यामुळे त्यांची तक्रार ग्रंथपालाकडे करण्यात आली. ग्रंथपालाने शिस्त सभ्यतेविषयी सांगायला सुरुवात केल्याबरोबर विनोबा उद्‌गारले, ''महाशय, सभ्यता तुम्हालाच शिकवावी लागेल, समोर खुर्ची रिकामी असताना आलेल्यास आधी बसण्यास सांगावे हा साधा

नियम आपणास माहिती नाही का?'' विनोबाच्या धाडसाचे कौतुक करीत ग्रंथपालाने हसत हसत विनोबाचा निरोप घेतला.

बडोद्याच्या वास्तव्यातच विनोबांच्या जीवनाचे ध्येय निश्चित होत होते. त्यांच्याभोवती सतत दहा पाच  विद्यार्थ्यांचा गराडा असे. विनोबांची बुद्धीमत्ता, निर्भयता, त्यांचे वाचन, मनन, चिंतन आदीमुळे त्यांना विद्यार्थी आणि शिक्षकात लोकप्रियता मिळाली होती. त्यांच्या नेहमीच्या मित्रात गोपाळराव काळे, शंकरराव तगारे, महादेव मोघे, श्रीधर धोत्रे यांचा समावेश होता. हे सर्व दर रविवारी एकत्र येत. विविध विषयावर चर्चा करीत. यातून १९१४ साली 'विद्यार्थी मंडळा'ची स्थापना करण्यात आली. स्वदेशी, स्वधर्म आणि स्वभाषा हा या विद्यार्थी मंडळाचा प्रमुख उद्देश होता. १९१४ सालचे विद्यार्थी मंडळ म्हणजे विनोबांच्या सार्वजनिक जीवनाची-सुरवात होय. मंडळाची स्थापना झाली तरी या मंडळामार्फत घ्यावयाच्या कार्यक्रमासाठी, वाचनालयासाठी लागणारा पैसा आदीचा प्रश्न आला तेव्हा विनोबांनी नेतृत्व करावे असे मित्रांनी सुचवले, तेव्हा विनोबा म्हणाले, ''एखाद्यावर बॉम्ब टाकायला झाला तर मी तो टाकेन पण माझे पुढारीपण म्हणजे तुकारामाने बँक मॅनेजर होण्यासारखे आहे.''

विद्यार्थी मंडळासाठी पैसे जमविण्यासाठी विनोबांनी घरोघरी जाऊन भाजी विकणे, भांडी घासणे, कपडे धुणे, दळण आणून देणे इत्यादी पर्याय सुचवले आणि सर्वांना ते मान्य झाल्यामुळे अशा प्रकारची कामे करून पैसा जमविण्यास सुरुवात झाली. यातूनच पुस्तकांची जमवाजमव , शिवजंयती, गणेशोत्सव, रामदास नवमी साजरी करणे, विविध विषयावर व्याख्याने आयोजित करणे आदी कार्यक्रम घेण्यात येऊ लागले.

**गृहत्याग:** आई, आजोबा, वडीलांच्या प्रभावाबरोबरच चौफेर वाचनामुळे विनोबांना गौतमबुद्ध, जगत्गुरू शंकराचार्य आणि रामदासस्वामी यांच्या आयुष्याचे आकर्षण वाटू लागले. या तिन्ही व्यक्तींनी ज्याप्रमाणे घर सोडून नवे आयुष्य घडवले तसेच आपणही करावे अशी सुप्त इच्छा या काळात त्यांच्या मनात घोळत होती. २५ मार्च १९१६ रोजी इंटरमिजीएटची परीक्षा देण्यासाठी विनोबा आपले मित्र गोपाळराव काळे आणि इतर मित्रासह गाडीत बसले. सुरत स्टेशन आल्यानंतर गोपाळरावाच्या हाती वडीलांच्या नावे पत्र देत म्हणाले, ''मुंबईला गेल्यानंतर पोस्टात टाक.'' आणि विनोबा, तगारेआणि बेडेकर या मित्रासह भुसावळ मार्गे काशीला जाणाऱ्या गाडीत चढले. वडीलाच्या नावे लिहिलेल्या पत्रात विनोबांनी लिहीले होते, ''मी परीक्षेला जाण्याऐवजी इतरत्र जात आहे, आपला माझ्यावर पूर्ण विश्वास आहे याची मला जाणीव आहे आणि आपणास हेही माहित आहे की मी

कोठेही गेलो तरी कोणतेही गैरकृत्य करणार नाही.'' हे पत्र वाचून नरहररावांनी मात्र आकाशपाताळ एक केले. टक्केटोपणे खाऊन येईल परत अशी मनाची समजूत घालून ते गप्प राहिले. आईची प्रतिक्रिया मात्र बोलकी होती, ''विन्या जेव्हा एखादी गोष्ट ठरवतो तेव्हा कोणत्याही परिस्थितीत ती पूर्ण केल्याशिवाय राहत नाही.''

विनोबांनी काशीला जाण्याचे निश्चित केले होते, कारण त्यांना तेथे संस्कृतचा अभ्यास करायचा होता, बंगाल, हिमालयाचा प्रवास करायचा होता. काशी या सर्वांच्या केंद्रस्थानी असल्यामुळे विनोबांनी मनोमन काशीची निवड केली होती. काशीला गेल्यानंतर विनोबांनी आपला मुक्काम आहिल्याबाई होळकर वाचनालय आणि निवासासाठी तात्या टोपेची बहीण खुर्देकराच्या वाड्यात जागा मिळाली. काशीला पोहोचण्याबरोबर विनोबा वेद आणि उपनिषदाच्या अभ्यासात मग्न झाले. अन्नछत्रात जेवण आणि अभ्यास असाच त्यांचा दिनक्रम होता. काही दिवसानंतर त्यांनी घरी पत्राने कळविले, 'मी संसार सोडला असून ब्रह्मजिज्ञासा हे माझे एकमात्र लक्ष ठरवले आहे.''

काशी येथील वास्तव्यात विनोबा शास्त्रार्थ चर्चेच सहभागी होत. खाजगी शाळेतील नोकरीचा पगार म्हणून त्यांनी स्वत:च दोन रुपये पगार मागीतला. ''जेवण अन्नछत्रात असल्यामुळे मला महिन्याला दोन रुपये पुरतील अधिकची जरुरी नाही'' असे त्यांनी संस्थाचालकांना सांगीतले. काशीतील सुरुवातीच्या वास्तव्यात विनोबांच्या जीवनात दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. त्यांच्या सोबत गृहत्याग केलेल्या बेडेकरांचा अचानक मृत्यू. त्यामुळे नोकरीचा पहिला पगार त्यांना बेडेकरांच्या अंत्यसंस्कारासाठी खर्च करावा लागला. दुसरी घटना घरासाठी कुलुप खरेदीची. तीन आण्याचे कुलुपाचे दुकानदाराने दहा आणे मागितले. विनोबांनी त्याला दहा आणे देत म्हटले, ''मला माहित आहे या कुलुपाची किंमत तीनच आणे आहे तरीपण मी आपणावर विश्वास ठेवून दहा आणे देत आहे.'' विनोबा त्या दुकानासमोरून दररोज जात, दररोज त्यांची अन् दुकानदाराची नजरानजर होई. एके दिवशी मात्र त्या दुकानदाराने विनोबांना बोलावून सांगितले, ''कुलुपाची किंमत तीनच आणे असताना तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवून दहा आणे दिले, कृपा करून आपले सात आणे परत घ्या.'' विनोबांच्या आयुष्यातला हृदय परिवर्तनचा हा पहिला यशस्वी प्रयोग होय. आयुष्यातला पहिला मृत्यू आणि पहिले हृदय परिवर्तनाने विनोबा भारावून गेले.

**काशी विद्यापीठ-गांधींचे भाषण**

६ फेब्रुवारी १९१६ रोजी तत्कालीन व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या हस्ते

काशी विद्यापीठाचा उद्घाटन समारोहाच्या निमित्ताने म. गांधींचेही भाषण झाले होते. या भाषणाचा वृत्तांत विनोबांनी काही महिन्यानंतर बडोद्यात वाचला; पण गांधींनी आपल्या भाषणात दाखविलेल्या धाडसाचा, स्पष्टवक्तेपणाचा प्रभाव विनोबावर पडला. या भाषणात म. गांधीनी म्हटले होते, ''मला माझ्या देशबांधवांशी या पवित्र कार्यात या नव्या विद्यापीठाच्या कक्षेत परक्याच्या भाषेतून आपले विचार मांडावे लागत आहेत ही अत्यंत लाजेची आणि अपमानजनक बाब आहे.'' या विचारांनी आपल्या भाषणाची सुरुवात करून ब्रिटीशांच्या सत्ता वैभवाच्या प्रदर्शनावर टीका करीत कार्यक्रमाला हजर असलेल्या संस्थानिकांच्या बडेजाव आणि भरजरी पोषाख व दागिन्यावर गांधींनी टीका केली. म. गांधी पुढे म्हणाले, ''या विशाल मंडपामध्ये काय दिसते? एक भपकेबाज दृश्य की श्रीमंती, जडजवाहीराचे प्रदर्शन, की परदेशातून पॅरीसमधून येणाऱ्या बड्या जवाहिऱ्याच्यासाठी श्रीमंतीचे प्रदर्शन आपल्या ऐश्वर्याने नटलेल्या या संस्थानिकांशी मी या देशातील लक्षावधी हिंदी बांधवांची तुलना करतो... पण मला असे म्हणावेसे वाटते की आपल्या देशबांधवांचे विश्वस्त बनल्याशिवाय या देशाला स्वातंत्र्य मिळणार नाही.''

पुढे याच भाषणातून गांधीजींनी क्रांतीकारकांच्या दहशतवादी मार्गावर टीका करताना ते म्हणाले, ''मीही एक क्रांतीवादी आहे. पण निराळ्या प्रकारचा. आपल्यामध्ये अराजकतावादी क्रांतीकारकाचा आणखी एक वर्ग असून त्यांच्यापर्यंत जर माझा आवाज पोहोचत असेल तर मी त्यांना सांगेन की भारतीयांना जर त्यांना जिंकायचे असेल तर भारतात अराजकतावादाला स्थान नाही. अराजकतावादीचे देशप्रेम मी मान्य करतो, स्वदेशासाठी मरण पत्करण्याच्या त्यांच्या धैर्याचे मी कौतुक करतो पण त्यांची हत्या सन्माननीय नाही अशा मार्गांना कोणत्याही धर्मग्रंथात स्थान नाही....''

सर्वात शेवटी गांधीजीं म्हणाले, ''इंग्रजांनी या देशात् न राहता हा देश सोडून चालते व्हावे असे आम्हाला वाटते...स्पष्टपणे असे सुचवल्यामुळे जर आम्हाला मृत्युदंड दिला तरी आम्ही राजी खुषीने मृत्युदंडही स्वीकारण्यास तयार आहोत.''

म. गांधींच्या या भाषणामुळे मात्र सभाध्यक्ष ॲनी बेझंट, सभेत उपस्थित संस्थानिकांनी सभात्याग केला आणि सभा गोंधळात पार पडली.

या घटनेपासून म. गांधींना भेटण्याची विनोबांना तीव्र इच्छा होती. गांधींच्या निर्भयता, अहिंसक प्रतिकाराच्या भावनेचा विनोबावर प्रभाव पडला. काशीतील दोन महिन्याच्या वास्तव्यानंतर त्यांना असे वाटू लागले की आपली राजकीय आणि अध्यात्मिक विषयक आकांक्षाची पूर्तता गांधी भेटीतूनच पूर्ण होऊ शकेल. म्हणून

त्यांनी म. गांधींना काही पत्रे लिहिली. यातून आपल्या काही तात्त्विक, सैद्धांतिक शंका त्यांनी विचारल्या. तेव्हा गांधींनी विनोबांना कळवले अशा प्रश्नाची उत्तरे पत्राने देता येत नाहीत त्यासाठी अहमदाबादेस कोचरब आश्रमात येऊनच सर्व शंकाचे समाधान होऊ शकेल.

❐

# साबरमती आश्रमात

७ जून १९१६ रोजी म. गांधी आणि विनोबांची पहिली भेट झाली. विनोबा आश्रमात आल्याची बातमी म. गांधींपर्यंत पोहचली. आंघोळ करून भेटायला येऊ द्या असे सुचवित म. गांधी स्वयंपाक घरात शिरले. साबरमती-कोचरब आश्रमाचे जेष्ठ सभासद मामा फडके यांनी स्वत: विनोबांना म. गांधींकडे नेले. म. गांधी स्वयंपाकघरात भाजी चिरीत बसले होते. विनोबा म्हणाले, ''भाजी चिरण्याचे साधे कामही राष्ट्रनेता करीत असलेला कधी ऐकले व पाहिले नव्हते. पण त्यांच्या पहिल्या दर्शनानेच मात्र श्रमाचा पाठ मिळाला.'' विनोबा-म. गांधींची पहिले भेट आणि चर्चा भाजी चिरता चिरताच पार पडली. श्रमपाठाने प्रभावित झालेले विनोबा म्हणतात, ''हिमालय आणि बंगालला जाणे ही माझी दोन स्वप्ने पूर्ण झाली नसली तरी ईशकृपेने मी. म. गांधी जवळ आलो, त्यातून मला हिमालयाची शांती प्राप्त झाली, त्याचबरोबर बंगालचे वैशिष्ट्य असणारी ज्वलंत देशभक्तीही प्राप्त झाली. अशाप्रकारे माझ्या दोन्ही अभिलाषा पूर्ण झाल्या.''

**श्रमाची दीक्षा :** पहिल्या भेटीतच म. गांधींनी विनोबाच्या हातात भाजी चिरण्यासाठी चाकू दिला. ''काम करण्याची पहिली दीक्षा' अशा प्रकारे गांधींनी मला दिली असे विनोबा म्हणतात. भाजी चिरताना गांधीनी विनोबांची सर्व माहिती घेतली. ही कोणी सामान्य व्यक्ती नसून अध्यात्मिक विकासाची ओढ असणारी व्यक्ती अशी गांधींची धारणा झाली म्हणून गांधींनी विनोबांना सुचवले, ''तुला येथील वास्तव्य आवडेल! आयुष्यात काहीसेवा त्याग करायचा असेल , तर तू येथे रहा तुझ्या राहण्याने मला आनंदच होईल.'' पुढे त्यांनी सुचवले, ''आत्मज्ञानी कधी आजारी प डत नाही. तू मात्र आजारी असल्यासारखा दिसतो, दुबळा दिसतो हे बरं नाही.'' यावर विनोबा म्हणतात, ''हा बापूचा दुसरा पाठ जो मी आयुष्यभर लक्षात ठेवला!''

यापूर्वी विनोबांनी घरकाम केलेल नव्हते. अभ्यास हे त्याचे नेहमीच काम असे. आश्रमात आल्यानंतर मात्र अनेक प्रकारची कामे त्यांच्या अंगावर पडली. आश्रमातील आश्रमवासीयांसाठी आवश्यक स्वयंपाक, दळणे, पाणी भरणे, झाडणे, भांडी घासणे, निवडणे, बागकाम, संडास सफाई अशी कामे करावी लागू लागली. ही कामे करताना ती परिपूर्ण नीटनेटकी असावी याकडे विनोबांचा कटाक्ष असे त्यामुळे कस्तुरबाकडूनही विनोबांना समाधानकारक काम केल्याची पावती मिळाली.

या काळात गांधीनी कोचरब आश्रमातच वास्तव्याला होते. देशातील इतर भागात कामाचा व्याप अजून वाढलेला नव्हता. त्यामुळे विनोबांना या काळात गांधीजींचा भरपूर सहवास मिळे. आश्रमात सर्वजण गांधीजींना 'बापू' म्हणत. सायंकाळच्या प्रार्थनेनंतर बापू आश्रमवासियांच्या प्रश्नांना उत्तरे देत. विनोबा बापूंचे विचार ऐकत व त्यावर चिंतन करीत. पण आश्रमात येऊन सहा महिनेपर्यंत पहिल्या भेटीशिवाय विनोबा आणि बापूचा फारसा संवाद झाला नव्हता. शेवटी एक दिवस बापुंनी विनोबाला सायंकाळी आपल्या सोबत फिरायला नेले आणि त्यानंतर आश्रमातील कर्मयोगाच्या पलीकडे जाऊन बापू व विनोबांची सतत ज्ञानचर्चा सुरू झाली. याबाबत विनोबा लिहितात, ''बापूंनी माझी परीक्षा घेतली किंवा नाही मला माहित नाही, परंतु माझ्या कुवतीप्रमाणे मी बापुंची पुरेपूर परीक्षा घेतली, या परीक्षेत जर कमी पडले असते तर मी त्यांच्याजवळ टिकलो नसतो...''

कोचरब आश्रमाशी विनोबा एकरूप झाले होते. आश्रमातील सर्वच कार्यक्रमात विनोबांचा सहभाग असे.

**विनायकचा विनोबा-** एके दिवशी पहाटे चार वाजता विनोबा गीता आणि उपनिषदांतील मंत्राचा पाठ करीत असलेले आश्रमवासियांनी ऐकले. विनोबा संस्कृत आणि धर्मशास्त्राचे पंडित असल्याची जाणीव आश्रमवासियांना झाली. यावरूनच जेष्ठ आश्रमवासी मामा फडके यांनी विनायकाचे नामकरण विनोबा असे केले. महाराष्ट्रातून महापुरुषाचा विशेषत: संतांचा आदरपूर्वक उल्लेख करताना अशाच पद्धतीने केला जातो. ज्ञानेश्वराचा ज्ञानोबा, तुकारामाचा तुकोबा, तसाच विनायकाचा विनोबा. यापुढे मामा फडके विनायकाला विनोबा म्हणू लागले अशा प्रकारे आश्रमातील विनायक आश्रमवासियांचा विनोबा झाला. सर्वांबरोबर बापुंनीही विनोबा या नामकरणाला मान्यता देऊन त्यांनीही त्यांना विनोबा म्हणायला सुरुवात केली. त्यांच्या वडीलांना बापुंनी लिहीलेल्या पत्रातही 'आपला पुत्र विनोबा माझ्या निकट आला आहे' असे संबोधले होते.

म. गांधी आणि विनोबा आश्रमात एक सोबतच दळण, मैलासफाई करीत,

तसेच उपनिषद आणि गीतेचे पठणही सोबतच करीत. सी. एफ. ॲण्ड्रुज आश्रमात आले असता बापूंनी विनोबांचा परिचय देताना सांगितले, ''आश्रमात जी काही रत्ने आहेत, त्यातला एक युवक एक आहे, हा आश्रमाकडून काही मिळविण्याऐवजी आश्रमासाठी आशिर्वादकारच ठरला आहे.'' असे असले तरी विनोबांचे आश्रमातले वागणे नम्र, सर्वसामान्यासारखे होते. एका सहकाऱ्यांशी यासंबंधी मत व्यक्त करताना माझे मलाच माहीत! देशासाठी शौर्याचे काम करण्याच्या माझ्या आकांक्षेपासून बापूंनी मला मुक्त केले. माझ्या अंतरंगातील क्रोध आणि इतर विकारांचा ज्वालामुखी बापूंनी त्वरीत शांत केला. त्यामुळे दिवसेंदिवस माझी सर्वांगीण प्रगतीच होत आहे.''

**मैला सफाईचा धडा:** काही दिवसानंतर विनोबांचे धाकटे बंधू बाळकोबाही आश्रमात दाखल झाले. प्रारंभी विनोबाला हे आवडले नसले तरी नंतर विनोबांनी त्याला मान्यता दिली व दोघेही आश्रमातील दैनंदिन कार्यक्रमात सामील झाले. अशातच आश्रमाचा मैला साफ करणाऱ्याने सुट्टीवर जाताना आपल्या बारा वर्षाच्या मुलावर मैला सफाईचे काम सोपवले. मैल्याने भरलेली बादली त्या मुलास उचलल्याने उचलेना. त्यामुळे त्याला रडू कोसळले. बाळकोबांनी त्यावर दया दाखवत त्याच्या कामात मदत केली. विनोबाला हे समजले तेव्हा विनोबा बाळकोबांना म्हणाले, ''तू त्या मुलाची मदत केली हेउत्तमच झाले. आता मी पण तुझ्या सोबत हे काम करीन.'' यामुळे आश्रमात खळबळ निर्माण झाली. विनोबा आणि बाळकोबा सारखे ब्राह्मण आश्रमाचा मैला साफ करतील?'' असा प्रश्न सर्वांसमोर उभा राहिला. परंतु विनोबांवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. बापूना बाहेरगावहून परतल्यानंतर ही घटना समजली तेव्हा बापूंनी म्हटले, ''मैला सफाई हे एक श्रेष्ठ व धर्म कार्य आहे, यापुढे सर्व आश्रमवासियांचे हे दैनिक काम असेल, ज्यांना हे पसंत नसेल त्यांनी आश्रम सोडावा.'' परिणामी अनेक आश्रमवासियांनी आश्रम सोडला ज्यात बापूंची सर्वात मोठी बहीणही होती. याचवेळी विनोबांनी आणखी एक क्रांतीकारी पाऊल उचलले. त्यांनी आपले जानवे अग्नीला अर्पण केले.

कोचरब आश्रमातील विनोबांची लक्षणीय कामगिरी म्हणजे आश्रमाचे स्वावलंबन. सुरुवातीला आश्रमात कापड विणकामाला मीलचे सूत आणले जाई. काही वर्षांनी आश्रमात चरखा आला, हात कताईचे काम सुरू झाले. हातकातईच्या सूताचे कापड जाडे भरडे असे. विनोबांनी यात प्रगती करून दाखवली. आपल्या गणिती स्वभावानुसार विनोबांनी आश्रमातील सुतकताई आणि कापड विणकामात शास्त्रीयता आणली. त्यामुळे कापडाचा दर्जाही सुधारला.

आश्चर्याची बाब म्हणजे विनोबांना चरखा चालवणे कृष्णदास गांधी यांनी शिकवले. फार मोजक्या दिवसात आश्रमात खादीशास्त्र निष्णात म्हणून विनोबा ओळखले जाऊ लागले.

**कोचरब ते साबरमती :** साधारणपणे दोन वर्षानंतर कोचरब आश्रमाचे स्थलांतर वर्तमान साबरमती आश्रमाचे ठिकाणी करण्यात आले. तेथेही विनोबांनी आपली सुतकताई, खादी विणकाम, मैला सफाईचे काम चालूच ठेवले. साबरमती आश्रमात काही दिवस विनोबांनी स्वयंपाकाचेही काम केले. त्यातच साबरमती नदीचे पाणी आणून त्यांनी आश्रमातील बागही हिरवी ठेवली. दररोज सतत पाच तास त्यांचा कार्यक्रम चाले, अतिश्रमाने कृश झालेल्या विनोबांच्या शरीराकडे बापूचे लक्ष गेल्यानंतर बापूंनी विनोबांना प्रश्न केला, ''विनोबा, तुम्ही इतके श्रम कसे करू शकता?'' विनोबांचे यावर उत्तर होते, ''बापू, हे सर्व करण्याची शक्ती मला माझे शरीर नव्हे मनातून मिळते.''

आश्रमाच्या राष्ट्रीय शाळेचे गुजराथी शिक्षक रजेवर गेले असता बापूंनी विनोबांना ते काम करण्यास सांगितले. आश्रमात आल्यानंतर विनोबांनी गुजराथी भाषा शिकून घेतली होती. तरी पण विनोबांनी बापूंना सुचवले. गुजराथी शिक्षकाची नेमणूक करावी. तेव्हा २४ जुलै १९१८ रोजी विनोबांना बापूंना कळवले, ''आदर्शाच्या दृष्टीने गुजराथी शिक्षकच असावा, परंतु जो पर्यंत असा शिक्षक मिळत नाही तो पर्यंत आपणच ते काम करावे. चरीत्रहीन गुजराथी शिक्षकापेक्षा चारित्रवान मराठी शिक्षकाला मी स्वीकारेन म्हणून चारित्रवान गुजराथी शिक्षक उपलब्ध होईपर्यंत तुम्ही ते काम करावे.''

काही काळासाठी विनोबांने आश्रमातील वसतीगृह प्रमुखाचेही काम केले. सुरुवातीला विद्यार्थ्यांना थोडी भीती होती. विनोबांना विद्यार्थ्यांना सकाळीच उठवत. नियमीत श्लोक आणि भजनाने विद्यार्थ्यांना प्रसन्नता वाटू लागली. एक आदर्श शिक्षक आणि आदर्श गृहपती अशी विनोबांची ओळख सर्वांना झाली. या विद्यार्थ्यांत एक विद्यार्थी होता. वल्लभदास जो पुढे सर्व सेवा संघाचा अध्यक्ष झाला. प्रभुदास गांधी आणि कृष्णदास गांधीचाही समावेश या वसतीगृहाच्या विद्यार्थ्यांमध्ये होता. काकासाहेब कालेलकर या विद्यामंदीराचे प्राचार्य होते. कालातंराने त्यांची नेमणूक गुजराथ विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून झाली.

वसतीगृहात विनोबाचे व्यायामशिक्षक म्हणूनही काम केले. ते दररोज विद्यार्थ्यांना सूर्यनमस्कार आदी व्यायाम शिकवीत, कबड्डी, खो खो सारख्या देशी खेळात सहभागी होत. खेळाच्या माध्यमातून संघभावना वाढून विद्यार्थी अहिंसात्मक वृत्तीकडे वळेल याकडे त्यांचा कटाक्ष असे. क्रिकेट सारख्या विदेशी खेळांना

त्यांनी कधीच प्रोत्साहन दिले नाही. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना देशभक्त नागरिक आणि स्वातंत्र्यात सहभागी होणारा सैनिक बनवण्याकडे त्यांचा कल होता.

साबरमती आश्रमातील राष्ट्रीय शाळेतील विद्यार्थ्यांना दररोज किमान तीन तास कठोर श्रम करावे लागत. शारीरिक श्रमाचा उत्पादकतेशी संबंध असावा असा त्यांचा कटाक्ष असे. विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाचा स्वीकार करण्यासाठी श्रमाच्या महत्त्वाला ओळखले पाहिजे म्हणून ते सतत विद्यार्थ्यांना सूचवत 'शिक्षकाच्या मदतीशिवाय वाचायला शिका.''

याच काळात विनोबांच्या वेषभूषेतही फरक पडत गेला. सुरुवातीला धोतर, सदरा, कोट, टोपी असा त्यांचा वेष असे. काशीला येताना त्यांनी कोट घालणे सोडले. गांधींच्या भेटीला येताना त्यांनी टोपी घातलेली नव्हती. आश्रमात सुतकताई खादीचे कामात प्रगंती झाली तेव्हा त्यांनी धोतराची लांबी कमी करून फक्त ३५ इंच लांबी ठेवून सदरा अंगात न घातला फक्त खांद्यावर ठेवीत. कालांतराने सदरा त्यांनी टाकून दिला. धोतराचा सोगा खांद्यावर टाकू लागले. काही दिवसानंतर धोतराची लांबी फक्त २७ इंच केली. आणि एखादे साधे कापड अंगावर घेत. आणि हाच वेश त्यांनी शेवटपर्यंत कायम ठेवला.

साबरमती आश्रमात काही दिवसानंतर त्याचे बालमित्र रघुनाथ श्रीधर धोत्रे, गोपाळराव काळे, बाबा मोघे, आणि द्वारकानाथ हरकारे विनोबांना सामील झाले. जेव्हा जमनालाल बजाजानी साबरमती आश्रमाचा धर्तीवर वर्धा येथेही एक आश्रम असावा अशी इच्छा व्यक्त केली होती, तेव्हा विनोबासोबत हे सर्व मित्र त्यांच्या सोबत वर्ध्याला आले होते.

साबरमती आश्रमात विनोबांनी स्वत:ला सतत कामात गुंतून घेतल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला होता. त्यांना विश्रांतीची नितांत गरज होती. बापूनीही त्यांना तसे सुचविले होते. तसेच काशीला ज्या हेतूसाठी विनोबा गेले ती संस्कृत शिक्षणाची इच्छाही त्यांच्या मनात प्रबळ झाली होती, यासाठी विनोबांनी म. गांधींकडे एक वर्षाच्या सुटीची मागणी केली आणि गांधींजीनी ती लगेच मंजूर केली.

❐

# एका वर्षाची रजा

फेब्रुवारी १९१७ मध्ये गांधींकडून एक वर्षाची सुटी घेऊन विनोबा संस्कृत अभ्यासासाठी वाई येथे दाखल झाले. वाई येथे त्यांनी प्रथम पंडित नारायणशास्त्री यांची भेट घेऊन ''वेदाभ्यास अस्पृश्यास शिकविण्याची आपलीतयारी आहे का?'' अशा प्रश्न विचारला. पं. नारायणशास्त्रांनी होकार दिल्यानंतर पाठशाळेच्या नियमानुसार विनोबांचे संस्कृत अध्ययन सुरू झाले. याच काळात वाईच्या पाठशाळेत पुढे तर्कतीर्थ म्हणून प्रसिद्धी मिळालेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही होते. त्यांनी विनोबांच्या त्या काळातील संस्कृत अभ्यास, व्रतपालन इत्यादी बाबत आठवणी सांगताना, 'योगशास्त्रात उत्तम मध्यम व मंद असे तीन अधिकारी असतात उत्तम अधिकारी सहा महिन्यातच तयार होतो'' त्याचे प्रत्यतर विनोबांच्या ठिकाणी आले. सहा महिन्यातच शांकर प्रस्थानत्रयीवर विनोबांनी अधिकार मिळविला, असे गुरुवर्यांना आढळून आले.' असे म्हटले आहे. याशिवाय गीता, उपनिषद, पांतजलयोगसूत्र आणि मनुस्मृतीवरील चिकित्सक अभ्यासही सहा महिन्याच्या काळात विनोबांनी केला.

**अध्ययनाची सुरुवात :** विनोबांच्या अभ्यासाविषयी आपले मत देताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिहितात, 'विनोबांच्या परिचयानंतर त्यांच्या वाणीचे वैभव लक्षात येते. अध्यात्मविद्या आणि विविध भाषा हे विनोबांच्या अभ्यासाचे विषय होते. वाईस येण्याच्या अगोदरच त्यांची ज्ञानेश्वरीची आठ पारायणे, गीतारहस्याचे पाच वेळा वाचन, तुकाराम गाथा, दासबोध, मोरोपंत इत्यादीचा अभ्यास झालेला होता. एकीकडे संस्कृतचा अभ्यास आणि त्याचवेळी विनोबांची पुणे, कऱ्हाड, सांगली, मिरज, इत्यादी ठिकाणी पायी प्रवासही करताना जनतेच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचे अवलोकन करीत. गीतेवर अनेक भाषणेही दिली. आपल्या पन्नासाव्या भाषणात विनोबा म्हणाले, ''गीतेपेक्षा श्रेष्ठ वाचनीय कोणताही

ग्रंथ नाही, तरी परंतु मला असा एक श्रेष्ठ पुरुष सापडला, जो गीतेतील तत्त्वज्ञानाप्रमाणे भाषणेही देतो त्याप्रमाणे वागतो ते माझे गुरू साबरमती आश्रमात राहतात.'' या दरम्यान तर्कतीर्थ विनोबांच्या घरी बडोद्याला मुक्कामाला होते. विनोबांनी पुन्हा प्रपंच करावा अशी त्यांच्या आईवडीलांनी इच्छा व्यक्त केली तेव्हा तर्कतीर्थ म्हणाले, ''ते आता अशक्य आहे, ती स्वयंसिद्ध प्रेरणा आहे, तिचा उलटा परिणाम होणार नाही, विकासच होणार. गांधींचा प्रभाव त्यांचेवर पडला याचे कारण समानधार्मित्व होय.''

**बापूंना पत्र :** विनोबांनी एक वर्षासाठी आश्रम सोडला असला तरी त्याच्या आश्रमातील आपल्या सहकाऱ्यांशी आणि बापूजींशी पत्र व्यवहार चालूच होता. आपले मित्र मोघे, धोत्रे, काळे यांना लिहीलेल्या एका पत्रात विनोबा म्हणतात, ''आपल्या आयुष्याचे धोरण, आयुष्य संपविण्याआधी ठरवले पाहिजे. आपल्या कार्याकडे आपली दृष्टी असावी. तुमच्या आमच्यासारखे तरूण तपश्चर्या करु लागल्यास भारतमातेचा उद्धार लवकर होईल, भारतमातेच्या हाकेला प्रतिसाद द्या ही विनंती.'' या पत्रव्यवहाराबरोबरच १०-२-१९१८ रोजी विनोबांनी गांधींना लिहिलेले सविस्तरपत्र म्हणजे त्यांनी आपल्या एका वर्षाच्या सुट्टीत केलेल्या कार्याचा अहवालच आहे. या पत्रात विनोबा लिहीतात,

परमपूज्य बापूजी,

वर्षापूर्वी स्वास्थाअभावी आश्रमातून सुट्टी घेऊन मी बाहेर आलो, दोन तीन महिन्यात आश्रमात परतेन असे त्यावेळी वाटत होते. मात्र जवळ जवळ एक वर्ष उलटले तरी मी आश्रमात परतू शकलो नाही. त्यामुळे मी आश्रमात परतेन किंवा नाही, मी जिवंत आहे वा नाही अशी शंकाही आपणास आली असेल. पण यात सारा दोष माझाच आहे. कारण मामा फडके यांना एक दोन पत्रे लिहिली, त्यात 'सत्याग्रह' सुरू करण्याविषयी काही ठरत असल्यास कळवावे, मी सर्व काही सोडून आश्रमात परतेन अन्यथा ज्यासाठी मी आश्रमाबाहेर राहत आहे ते पूर्ण झाल्यावरच आश्रमात येईन असे लिहिले होते. माझा जन्मच आश्रमासाठी आहे अशी माझी श्रद्धा आहे. तर पुन्हा प्रश्न असा पडतो मी वर्षभर आश्रमाबाहेर का राहिलो?

वयाच्या सहाव्या वर्षी मी ब्रह्मचर्य पाळून देशसेवा करण्याचे ठरवले आहे. हायस्कूलात मात्र गीतेची आवड निर्माण झाली. माझे गीतेवरील प्रेम अजूनही कायम आहे. त्यामुळेच मी वेदांत आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्याचा निश्चय केला. वाईचे नारायणशास्त्री मराठे हे आजन्म ब्रह्मचारी नामांकित विद्वान असून वेदांत आणि इतर शास्त्रे शिकवितात. त्यांचेकडेच उपनिषदांचा अभ्यास

करण्याच्या मोहामुळे मी वाईत अधिक राहिलो. संस्कृतच्या अभ्यासाशिवाय याकाळात मी आणखी काम केले हे आपणस कळवितो. याकाळात उपनिषदे, गीता, ब्रह्मसूत्र आणि शांकरभाष्य, मनुस्मृती, पांतजलयोगसूत्र यांचा अभ्यास केला. त्याशिवाय याज्ञवल्क्य स्मृती, विशेषिक सूत्र, न्यायसूत्र या. ग्रंथाचे वाचन केले. आणखी काही शिकावे अशा मोह नसून जे सहज वाचन होईल त्याचेच वाचन करण्याची इच्छा राहिली आहे. आश्रम सोडण्याचे दुसरे कारण प्रकृती सुधारणे. त्यासाठी दररोज १० ते १२ मैल पायी चालणे, आठ ते दहा शेर दळणे, तीनशे सूर्यनमस्कार अशा व्यायामामुळे माझी प्रकृती आता सुधारली आहे.

**सुट्टीतील आहार व कार्यक्रम**: दैनंदिन आहारात पहिल्या सहा महिन्यानंतर मीठ, मसाला बंद केला असून मीठ मसाला आजन्म न घेण्याचा मी निश्चय केला आहे. फक्त दूध घेत असून, दूध न घेण्यासाठी अनेक प्रयोग करूनही दूधाशिवाय जमत नाही हे सिद्ध झाले. तरी पण भविष्यात दूध सोडण्याबाबत शक्यता निर्माण झाल्यास तेही घेणे सोडण्याची माझी तयारी आहे. तसेच या काळात महिनाभर फक्त लिंबू पाणी घेत राहिलो, त्यामुळे अशक्तपणा जाणवला. आज मी खालीलप्रमाणे आहार घेत आहे. दूध साठ तोळे, दोन भाकरी (वीस तोळे ज्वारीची) केळी चार किंवा पाच, एक लिंबू उपलब्ध असल्यास. आश्रमातील भोजनाबाबत मी आपल्या सल्ल्यानुसार आहार घेईन. चवीसाठी म्हणून कोणताही पदार्थ घेण्याची इच्छा होत नाही. तरीपण वर नमूद केलेला माझा आहार बराच खर्चीक आहे. माझ्या आहारावरचा दररोजचा खर्च पुढीलप्रमाणे केळी आणि लिंबू एक आणा, ज्वारी अर्धाआणा, दूध सव्वा आणा, एकूण खर्च पाऊणे तीन आणे यातील फेरफराबाबत मला आपले मार्गदर्शन हवे आहे. कृपया पत्राने कळवावे.

आतापर्यंत मी खालील प्रमाणे कार्य केले आहे.

१) गीता वर्ग चालवला. सहा विद्यार्थ्यांना फी न घेता अर्थासहीत गीता शिकविली.

२) दोघांना नऊ उपनिषदे शिकविले.

३) चौघांना ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय शिकवले.

४) हिंदी प्रचारासाठीविद्यार्थ्यांसाठी हिंदी वर्तमानपत्राचे वाचन केले.

५) दोघांना इंग्रजी शिकवले.

६) ४०० मैल पायी प्रवास करून रायगड, सिंहगड इत्यादी किल्ले पाहिले.

७) सत्याग्रहाश्रम तत्त्वाचा प्रसार करण्यासाठी विविध प्रयोग केले.

८) वाईत मित्रमंडळ नावाची संस्था स्थापन केली. संस्थेचे वाचनालय सुरू केले. वाचनालयाच्या मदतीसाठी दळण दळून देण्याचा वर्ग सुरू केला.

दळणाचे आलेल्या पैशातून दोन महिन्यात ४०० पुस्तके जमा केली.

९) प्रवासात गीतेवर एकूण ५० प्रवचने दिली. आश्रमात परत येताना मुंबईपर्यंत पायी नंतर रेल्वेने येईन. माझ्यासोबत २५ वर्षाचा एक विद्यार्थीही असेल. मी उशारीरात उशीरा चैत्र प्रतिपदेपर्यंत आश्रमात पोहोचेन.

१०) बडोद्यातील १०-१५ मित्रांनी लोकसेवा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यासाठी तीन वर्षांपूर्वी आम्ही जी संस्था स्थापन केली होती, त्या संस्थेच्या वार्षिकोत्सवात मी सामील झालो होतो. त्यात हिंदी प्रचाराचा आपला विचार मांडला आणि त्यासाठी काम करण्यास ही संस्था व त्याचे सर्व सभासद तयार आहेत.

**सुट्टीतील आचरण:** शेवटी सत्याग्रह- आश्रमाचा निवासी या नात्याने माझे आचरण काय आहे हे सांगणे आवश्यक वाटते.

१) अस्वाद या संबंधी वर लिहिलेले आहे.

२) अपरिग्रह. लाकडी ताट, लाकडी वाटी, आश्रमातील एक तांब्या, धोतर, कांबळे आणि पुस्तके इतकाच परिग्रह, संचय आहे. बंडी, कोट, टोपी न वापरण्याचे व्रत घेतले असून अंगावर धोतरच पांघरीत असतो.

३) माझ्या मते सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्याचे पालन मी काटेकोरपणे केले.

या पेक्षा अधिक काय लिहू? स्वप्नातही ईश्वर माझ्याकडून आपली काय सेवा घेणार आहे! ती खात्रीपूर्वक सांगू शकेन की- एक सोडून माझ्या स्वयंपाक, माझा अभ्यास आश्रम नियमानुसारच आहे. म्हणजे मी आश्रमाला आणि आश्रम हेच माझ्ये साध्य आहे.

सत्याग्रह किंवा दुसरी समस्या निर्माण झाल्यास मी लगेचच परतेन, नसता वर लिहिलेल्या वेळी ही आवश्य येईन.

आश्रमातील बदल काय? तेथे विद्यार्थी किती आहेत? राष्ट्रीय शिक्षणाची कोणती योजना आहे?.. आपणच मला पत्र लिहावे. असा आपणास पितृतुल्य समाजणाऱ्या विनोबाचा आग्रह आहे.

दोन चार दिवसात वाईहून मी इतरत्र जाईन.

विनोबांचा प्रणाम,

ह्या पत्रानंतर मात्र बापू सद्‌गतीत झाले. 'हा तर भीम आहे भीम. गोरक्षाने मच्छिंद्राला हरवले' शिष्याने गुरुचा पराभव केला-

**बापूचे चार शब्द:** या सविस्तर पत्राच्या उत्तरात बापूंनी विनोबाला कळवले,

''तुझ्यासाठी कोणते विशेषण वापरू हे सूचतच नाही. तुझे प्रेम आणि चारित्र्यामुळे मी तुझ्या मोहात गुंतत चाललो आहे. तुझी परीक्षा घेण्यास मी असमर्थ

ठरलो आहे. तू स्वत:च करू घेतलेल्या परीक्षेला मी स्वीकारीत असून तू मान्य केलेले तुझे पितृत्व मी स्वीकारीत आहे. माझी कामना तू पूर्ण केली आहेस. माझ्या मते तोच खरा पिता जो आपल्याही पेक्षा चारित्रवान पूत्रास घडवतो आणि खरा पूत्र तोच जो पित्याचे कार्यास वृद्धींगत करतो. पिता सामवादी, दयामय, दृढ असल्यास मुलाने या गुणांचा अंगिकार करावा आणि हे सर्व काही तू करून दाखविले आहेस. अर्थात तू जे काही केले त्यासाठी मी काही प्रयत्न केले असे मला नाही वाटत. तू मला जे पितृपद दिले आहेस ते तुझी भेट म्हणून स्वीकारीली आहे. त्या योग्य बनण्याचा मी प्रयत्न करीन. पण जर मी हिरण्यकश्यपूप्रमाणे वागू लागल्यास तू प्रल्हाद बनून माझा सादर निरादर करावा.

आश्रमाबाहेर राहूनही तू आश्रमनियमाचे पालन केले ही गोष्ट खरी ठरली असून तुझ्या आश्रमात परतण्याबाबत माझ्या मनात अजिबात शंका नव्हती. मामा फडक्यांनी पाठविलेले पत्र मामांनी मला वाचून दाखविले होते. ईश्वर तुला दीर्घायुष्य बहाल करो, भारताच्या उन्नतीसाठी तुझी सेवा घडो हीच माझी इच्छा.

तुझ्या दैनंदिन आहारात सध्या काही बदल करावयाची गरज नाही. दूध घेणे आता सोडू नको. गरज भासल्यास दूध घेणे थोडे वाढविल्यास हरकत नाही.

रेल्वे सत्याग्रहाची तूर्त आवश्यकता नसली तरी त्याच्या प्रचाराची मात्र गरज आहे. खेडा जिल्ह्यात सत्याग्रहाची गरज भासेल. सध्या मी रमता राम आहे एक दोन दिवसात दिल्लीस जाईन.

प्रत्यक्ष भेटीत सर्व विशेष, सर्वांना तुझ्या भेटीची उत्सुकता आहे.

आश्रम सोडून वर्ष झाले त्याच दिवशी आरतीच्या वेळी उघड्या डोक्याने, अनवाणी जाताना ज्या वेषात होते त्या वेषातच विनोबा आश्रमात पुन्हा दाखल झाले. ते परतणार आहे हेही कुणाच्या लक्षात नव्हते. त्या दिवशी सोमवार म्हणजे गांधींच्या मौनाचा दिवस होता, त्यामुळे बापूंना त्रास देऊ नये असा विचार विनोबांनी केला आणि तडक स्वयंपाक घरात जाऊन भाजी चिरण्याचे काम सुरू केले.

दुसऱ्या दिवशी न्याहारीच्या वेळी विनोबांना पाहून गांधींजी खूष झाले. त्यांच्या वेळेच्या बंधनाच्या पालनाने प्रसन्न होत, आश्रमात त्यांचे स्वागत करीत म्हटले, ''तुमची सत्य निष्ठा पुन्हा एकदा सिद्ध झाली,'' यावर विनोबा उद्गारले, ''ही माझी गणितनिष्ठा आहे.'' त्यावर हसत बापूंनी उत्तर दिले, ''गणितात कधी सत्याचा अपलाप असू शकतो का?''

सत्याग्रह आश्रमात विनोबा सतत सत्य आणि ब्रह्म्यांची अभिलाषा बाळगून स्वत:ला शून्यवत मानीत. याच काळात विनोबांनी गांधींच्या मंगल प्रभातचे मराठीत

रुपांतर करून त्याच्या प्रस्तावनेत काही कवितेच्या काही ओळी लिहिल्या त्यातील शेवटच्या दोन ओळी होत्या-

अद्वितीय चि एकत्व गुरुचे गौरवूनि जे
विन्या शून्य विना -भूत फावला गणितापरी।।

गुरुचे एकत्व अद्वितीयच आहे. ज्याच्या गौरवाने विन्या-विनोबा आणि शून्य गण्पिता समान सफल झाला आहे.

❐

# वर्धा आश्रमात

ऑक्टोबर १९१८च्या सुरुवातीला बडोद्याहून निरोप आला की विनोबांची आई हिवतापाने आजारी आहे. गांधींना ही बातमी समजताच त्यांनी विनोबाला त्वरीत बडोद्यास जाऊन आईची सेवा करण्यास सांगितले. विनोबा लगेच बडोद्याला गेले काही दिवस त्यांनी आईची सेवा केली. विनोबाला पाहून आईला समाधान वाटले. परंतु २४ ऑक्टोबर १९१८ रोजी विनोबांच्या आई रुक्मिणीदेवी देवाघरी गेल्या. पारंपारिक पद्धतीने आईची अंतिम क्रिया ब्राह्मणांच्या हातून करायची नाही, हा विनोबांचा हट्ट कुटुंबियांना मान्य नव्हता. त्यावर बरीच वादावादी झाली. शेवटी विनोबांनी अंतिम क्रियेसाठी स्मशानात न जाता घरी बसूनच गीता पाठ केला. 'आई मला श्रुतीमाऊलीच्या ओटीत टाकून गेली.' या भावनेने वेदपाठ सुरू केले. तत्त्वासाठी आईच्या अंतिमक्रियेसाठी स्मशानात न जाणारा कठोर वेदांती सत्याग्रह आश्रमात परतताना आईच्या दोन वस्तू घेऊन परतला. एक आईचे लुगडे आणि दुसरी अन्नपूर्णादेवीची पितळी मूर्ति, या मूर्तीची पूजा आई दररोज करीत असे. आईचे लुगडे विनोबा अनेक दिवस उशाखाली घेऊन झोपत. परंतु जेव्हा आश्रमात त्यांच्याच मार्गदर्शनाखाली खादीचा विकास होऊ लागला तेव्हा त्यांनी आईचे कापड गिरणीतले लुगडे चूपचाप साबरमतीला अर्पण केले, आणि अन्नपूर्णेची मूर्ती विनोबांनी प्रभुदासा गांधींची आई काशीबा यांनी दिली आणि सांगितले, या मूर्तिची दररोज सूर्यप्रकाशात पूजा केली पाहिजे. प्रभुदासांनी विनोबाचे शिष्यत्व मान्य केले असल्यामुळे विनोबाची अट मान्य करीत मूर्ति स्वीकारली. शेवटपर्यंत काशीबांनी ती मूर्ति सांभाळली. आजही ती मुर्ती प्रभुदास गांधींकडेच आहे.

१९२०च्या काँग्रेसच्या अधिवेशनात जमनालाल बजाज बापूंच्या संपर्कात आले. जमनालाल साबरमतीला अधूनमधून भेटी देत. बापूंनी त्यांना आपला पाचवा मुलगा म्हणून मानले होते. जमनालाल यांची इच्छा होती की साबरमती

आश्रमासारखा आश्रम वर्धा येथेही असावा, आणि बापूंनी तेथे आपल्या सर्व सहकाऱ्यांसमवेश वास्तव्य करावे. गांधींनी जमनालालजींना अडचण सांगितली, 'मी गुजराथी असून गुजराथेतच अधिक सेवा कार्य करू शकतो.' तरीपण जमनालालजींनी आग्रह कायम ठेवला. शेवटी गांधीजींनी सत्याग्रह आश्रम-साबरमतीचे ज्येष्ठ आश्रमवासी रमणीकलाल मोदी यांना वर्धा येथे आश्रमाची शाखा सुरू करण्यासाठी पाठवले. त्यांना वर्धा येथील पाणी, हवामान मानवले नाही. तेव्हा विनोबांनी वर्धा येथे जाऊन आश्रमाची शाखा सुरू करावी असा आग्रह जमनालालनी धरला. पण मगनलाल विनोबांना सोडण्यास तयार नव्हते. त्यापेक्षा वर्धा आश्रम बंद करावा असे मगनलाल गांधींनी सुचविले. पण 'एकदा एखादी सुरू केलेली संस्था सहसा बंद करू नये' असे गांधींनी सुचवले आणि जमनालाल यांची बापूंनी मागणी मान्य केली. विनोबांनीही आपल्या सहकाऱ्यासोबत वर्धा येथे जाण्यास मान्यता दिली.

६ एप्रिल १९२१ रोजी विनोबा आपले सहकारी रघुनाथ श्रीधर धोत्रे, द्वारकानाथ हरकारे, आणि वल्लभस्वामी त्यांचे बंधू भास्कर, केशो गांधी, कृष्णदास गांधी इत्यादी निवडक विद्यार्थ्यांसह साबरमती आश्रमातून वर्ध्याला रवाना झाले व ८ एप्रिल १९२१ रोजी वर्ध्याला पोहोचले. विनोबासह सर्वांनी वर्ध्यात जमनालालजींच्या बागेत मगनवाडी येथे कामाला सुरुवात केली. या बागेत गावातील लोक प्रातर्विधी आणि स्नानासाठी येत म्हणून जागा बदलण्याची सूचना विनोबांनी जमनालालजी यांना सुचवले. जमनालालजी यांनी लगेचच आपला बंगला आणि त्या भोवतालची आठ एकर जागा आश्रमासाठी दिली. ही बजाजवाडीची जागाही शहरालगतच होती. शेवटी जुलै १९२१ मध्ये विनोबांनी या आश्रमाचे स्थलांतर गावापासून दूर एकांतात घासबंगला येथे केले. कालांतराने बाबा मोघे, गोपाळराव काळे, वाळुंजकर वर्धा येथे हजर झाले. विनोबांचे बंधू बाळोबांनी अध्ययनाच्या निमीत्याने वर्ध्याला हजर झाले. तेथे साफ आणि विंचवाची भीती होती. विनोबांनी विद्यार्थ्यांना साप विंचू पकडणे शिकवले आणि सुचवले की यांना मारून टाकण्याऐवजी लांब नेऊन सोडावे.

जमनालालजींना घास बंगला आश्रमासाठी योग्य वाटला नाही. म्हणून त्यांनी घास बंगल्यापासून एक मैलाचा अंतरावर दुसऱ्या जागेत नवीइमारत बांधून तेथे आश्रमाची व्यवस्था करण्याचे ठरवले. बांधकामाची जबाबदारी द्वारकानाथ हरकारे आणि गोपाळराव काळे यांचेकडे सोपवण्यात आली. १९२४ साली वर्धा आश्रम नव्या जागेत सुरू झाला. १९३२च्या शेवटी विनोबा कैदैतून सुटल्यानंतर वर्ध्यास कॉटन मार्केटजवळ व नंतर नागपूर रोडवरील तनालवाडी या ठिकाणी राहू

लागले. नालवाडी ही अधिकांश दलित वस्ती होती.

**वर्धा आश्रम कार्यपद्धती :** विनोबांनी वर्धा आश्रमाची कार्यपद्धती साबरमती आश्रमाच्या धर्तीवरच केली. त्याचबरोबर विनोबांनी आपल्या काही विचाराची भर घालून वर्धा आश्रमात नवनवे प्रयोग सुरू केले. वर्धा आश्रमातील जिवनपद्धती साबरमती आश्रमातील जीवनपद्धतीपेक्षा अधिक कठोर आणि अनुशासनबद्ध केले. आश्रमातील जीवन अधिकाधिक स्वावलंबी बनविण्याकडे विनोबांचा कल होता. त्यासाठी त्यांनी नियम केला, प्रत्येक आश्रमवासी जितके शारीरिक श्रमाची कमाई करील-त्यातच त्याने आपला उदरनिर्वाह करावा. अनेक वर्ष रात्रीचे जेवण दुपारच्या कामाच्या हिशोबानंतरच तयार केले जाई. जितका कामाचा मोबदला तेवढेच जेवण तयार केले जाई. आठ तास सूत कताईची मजुरी तीन आणें, विणकामाचा दीड रुपया, शेतकामाचे आठ आणे अशाप्रकारे कामाचे दर ठरवलेले होते, मजुरीचे दर कमी अधिक असले तरी जेवण मात्र सर्वांना त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे मिळे. कामाचे उत्पन्न आणि जेवणाचा खर्च यांचा मेळ घातला जाई. कमी काम झाले की अर्धपोटी राहावे लागे. विनोबा आश्रमातील जेवणाच्या वेळी स्वत: वाढण्याचे काम करीत. वल्लभस्वामीचा धाकटा भाऊ भास्कर कधीकधी तक्रार करी इतरापेक्षा माझ्या कामाचे मूल्य कितीतरी अधिक असताना मात्र पोटभर जेवण मिळत नाही, तेव्हा सौम्यस्वरात विनोबा समजावत, ''आश्रमातील आपले जीवन सहयोगी जीवन असून प्रत्येकाने आपली पात्रता आणि शक्तीनुसार काम करावे आणि सर्वांचे मिळून आपल्या वाट्याला येईल त्यातच समाधान मानावे. हीच आश्रम जीवनाची पद्धती असते.''

साबरमती आश्रमाप्रमाणेच वर्धा येथे विनोबा संस्कृत शिक्षणासाठी संस्था पद्धतीचा अवलंब करीत. वर्गात दोन तीन विद्यार्थी असले तरी विनोबा मोठ्या आवाजाने शिकवीत. त्यांच्या मोठ्या बोलण्याने कधी कधी विद्यार्थी घाबरून जात, पण विनोबांच्या आंतरीक प्रेमामुळे विद्यार्थी पुन्हा त्यांच्याजवळ येत. विद्यार्थी शिक्षकांचा संबंध हा अध्यात्मिक संबंध असतो. वल्लभ हा त्यांचाच शिष्य जो पुढे वल्लभस्वामी बनला. कृष्णदास गांधी, सुतकताई आदी क्षेत्रातील नामवंत गणले जातात तर राधाकृष्ण बजाज हेही विनोबाचे शिष्य, ज्यांनी गोसेवा, खादी इत्यादी क्षेत्रात आपले जीवन घालवले. दुसरे शिष्य मनोहर दिवाण यांनी धोका पत्करून आयुष्यभर कुष्टरोग्यांची सेवा केली. अशी अनेक नावे देता येतील ज्यांनी वर्धा आश्रमाचे नाव अजरामर केले.

**महाराष्ट्र धर्म:** १९२१ ते १९२४ दरम्यान आश्रमाच्या दैनंदिन कामकाजाबरोबरच विनोबांनी एक नवा उपक्रम सुरू केला. जाने. १९२३ साली

'महाराष्ट्र धर्म' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. या मासिकातील बहुतेक लिखाण विनोबांचेच असे. दर महिन्याला वेगवेगळ्या विषयाच्या माध्यमातून विनोबा लोक प्रबोधनाचे काम करीत. ईश्वर निष्ठा, राजकारण आणि सर्व सावध वृत्ती ही महाराष्ट्र धर्माची व्याप्ती आणि धोरण असेल असे विनोबांनी जाहीर केले होते. या मासिकाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात सत्याग्रह आश्रम वर्धाची नियमावली देण्यात येई. हा आश्रम म्हणजे साबरमती आश्रमाची स्वतंत्र शाखा असून दोन्ही आश्रमाची कार्यपद्धतीही समान आहे असे सतत सांगितले जाई. चार अंकानंतर 'महाराष्ट्र धर्म' हे मासिक बंद पडले. कारण एप्रिल १९२३ मध्ये राष्ट्रीय ध्वजाच्या सन्मानासाठी नागपूरात झालेला झेंडा सत्याग्रह होय. सुरुवातीला विनोबांनी यात भाग घेतला नाही, परंतु घटना अशा घडत गेल्या की आपल्या सहकऱ्यासहीत त्यांना यात सहभागी व्हावे लागले. मुख्य म्हणजे झेंडा सत्याग्रहाचे संचलन विनोबांनी करावे असा सर्वांचाच आग्रह होता.

१३ एप्रिल १९२३ रोजी नागपूरला राष्ट्रीय झेंडा घेऊन एक मोठी मिरवणुक निघाली होती. पोलिसांनी ती अडवली आणि काही कार्यकर्त्यांना अटक केली. हा पहिला अखिल भारतीय स्वरूपाचा सत्याग्रह होता. विनोबांना या झेंडा सत्याग्रहात अटक होऊन एक वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली. १३ एप्रिल १९२३ रोजी विनोबांना झालेली शिक्षा ही पहिली शिक्षा व पहिला तुरुंगवास होय.

गांधीजींचे सचीव महादेव देसाई यांनी १९ जुलै१९२३ च्या 'यंग इंडिया'च्या अंकात विनोबावर एक लेख लिहीला होता. ते म्हणतात, ''विनोबा सत्याग्रह आश्रमात आले त्यावेळी आश्रम नुकताच सुरू झाला होता आणि झेंडा सत्याग्रहाच्या समयी ते वर्धा आश्रमाचे संचालक होते. आश्रमातील शारीरिक मेहनतीच्या कामाने आपल्या बौद्धिक शक्तीवर गंज चढेल असे त्यांना कधीही वाटले नाही. त्यांचे अनुशासन कठोर होते. त्यांना जेव्हा वसतिगृहाचा गृहपती नेमले गेले त्यावेळी सर्वांना धास्ती वाटत होती पण त्यांनी जेव्हा आश्रम सोडायचे ठरवले. तेव्हा विद्यार्थी त्यांच्या होणाऱ्या वियोगामुळे इतके रडले की त्यांचे सांत्वन करणे अवघड गेले...''

महादेवभाई पुढे लिहितात, विनोबांचा आत्मसंयम अद्‌भुत असून ब्रह्मचर्य, स्वाध्याय त्याचे संकल्प आहेत. धर्म आणि अध्यात्माबाबत सर्व वाङ्‌मयाचा त्यांनी अभ्यास केला आहे...''

पुढे विनोबांच्या विषयी लिहिताना महादेवभाईने लिहिले की, ''विनोबा उत्तम वक्ता, अप्रतिम लेखक, चांगले स्वयंपाकी, खेळाडू असलेले प्रसिद्धी आणि तथाकथित सामाजिक जीवनापासून ते अलिप्त आहेत...''

१८ जून १९२४ पासून 'महाराष्ट्र धर्म' मासिकाचे रुपांतर साप्ताहिकात करण्यात आले. मासिकाचे रुपांतर साप्ताहिकात झाले तरी त्यातील बहुतांशी लिखाण विनोबांचेच असे. उपनिषदासारख्या गंभीर विषयावर अत्यंत सोप्या भाषेत मांडणी असे. संतवाणीतून विविध संतांनी सांगितलेली वचने कुणी ही समजेल अशा भाषेत मांडली जात. 'उपनिषदाचा अभ्यास' हे पुस्तक आणि 'संताचा प्रसाद' हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्र धर्म या साप्ताहिकातून विनोबांनी केलेले लिखाण होय. महाराष्ट्र धर्म साप्ताहिकातील ठळक लेखाचा संग्रह मधुकर या नावाने प्रसिद्ध करण्यात आला. १९२४ ते १९२७ या काळातील विनोबाच्या लेखांचा हा संग्रह 'मधुकरचा उलगडा'या पुस्तकाच्या प्रस्तावनेत विनोबा लिहितात, 'महाराष्ट्र धर्म शब्दांचे संक्षिप्त रूप 'म. ध.' त्याला पणितीप्रमाणे 'उ' अनुवेध जोडून 'मधु' हा सांकेतिक शब्द साधला आहे. मधु म्हणजे महाराष्ट्र धर्मातून निवडलेले लिखाण...''

१९२७ साली शंकरराव देव आणि इतर मान्यवरांच्या कल्पनेवरून शि. म. परांजपे यांनी चालविलेल्या स्वराज्य पत्रात पुण्याची गांधी शिक्षणमाला आणि महाराष्ट्र धर्म हे साप्ताहिक समाविष्ट करण्याचे ठरवण्यात आले अशा रितीने 'महाराष्ट्र धर्म' हे साप्ताहिक ११ एप्रिल १९२७ ला बंद करण्यात आले.

वर्धा येथे जमनालाल बजाज यांचे लक्ष्मीनारायणाचे मंदिर होते. १९-७-१९२८ रोजी एका विशेष समारंभानंतर हे मंदिर विनोबांचे हस्ते दलितासाठी खुले करण्यात आले. देशातील कदाचित हे पहिले मंदिर असावे जेथे सर्वप्रथम दलितांना प्रवेश मिळाला. विनोबांच्या कार्यामुळे प्रभावित होऊन व आपल्या कार्यकर्त्यांशी परिचय व्हावा म्हणून वर्षातून एक महिना बापू वर्धा येथे येऊन राहात. विनोबाही वारंवार आपल्या कार्याची माहिती गांधींना देत. गांधीजीही त्यांना सतत प्रोत्साहन देत. एकदा एका पत्रात गांधींनी विनोबांना लिहिले, 'तुझ्या पेक्षा मोठा महान आत्मा मला कधीच आढळला नाही,' हे पत्र विनोबांनी वाचून त्वरीत फाडून टाकले. जमनलाल बजाज यांनी पत्राचे ते तुकडे एकत्र करून वाचले आणि विनोबांना प्रश्न केला, 'इतके अमुल्य पत्र आपण का फाडले?' तेव्हा विनोबांनी प्रश्न केला, 'मला महान आत्मा संबोधून गांधींनी चूक केली असे नाही वाटत? अशा पत्रामुळे मी अहंकारी बनेन म्हणून हे पत्र फाडून टाकले.'

**वायकोम सत्याग्रह:** त्रावणकोर संस्थानात वायकोम दलितांच्या मंदिर प्रवेशावरून सुरू झालेल्या वादाबाबत म. गांधींनी विनोबांना १९२४ मध्ये वायकोम गावी सत्याग्रहींना मार्गदर्शन करण्यासाठी पाठविले. वायकोम येथेच विनोबांनी नंबुदी ब्राह्मणांशी शास्त्रार्थ केला. अस्पृशाची सावली पडली तरी विटाळ होतो अशा

केरळी ब्राह्मणांना अस्पृश्यता शास्त्राविरुद्ध आहे हे पटवून दिले. कालांतराने म. गांधींही वायकोम गावी पोहोचले. म. गांधी आणि विनोबांच्या नेतृत्वाखाली एक वर्ष चार महिने हा सत्याग्रह चालू होता. शेवटी त्रावणकोर राज्याच्या अधिकाऱ्यांनी आपली हार कबूल केल्यामुळे अस्पृश्यतेचा प्रश्न सामोपचाराने सुटला. येथूनच म. गांधींचे सहकारी म्हणून विनोबांची संपूर्ण देशाला ओळख झाली.

नवा उत्साह आणि नव्या प्रेरणेसह विनोबा वर्धा आश्रमात परतले. यावेळी संपूर्ण आश्रमाच्या सफाईचे काम विनोबांनी स्वत:कडे घेतले. या दरम्यान १९४६ मध्ये विनोबा आजारी पडले. तेव्हा १९-२-१९२७ च्या पत्रात विनोबांना कळवले, 'जर आपल्यासारखा आजन्म ब्रह्मचारी आजारी होऊ शकतो, तेव्हा माझ्यासारख्याचा आजारी पडण्याचा हक्क अधिक वाढतो. आम्ही दोघांना विनोबा आणि गांधी- आजारी पडण्याचा हक्क सोडायचा आहे. खरा ब्रह्मचारी तो ज्याचे शरीर वज्रासारखे कठीण असते. आजारपण हे असंयमाचे चिन्ह नाही का?'

आश्रम जीवनात आश्रमवासियाचा परस्परावर विश्वास, प्रेम, आदर असावा, यावर विनोबांचा कटाक्ष असे. यासाठी विनोबा बुद्ध वंदनेतील त्रिसरणाचा सतत उल्लेख करीत.

बुद्धं सरणं गच्छामि
धम्मं सरणं गच्छामि
संघं सरणं गच्छामि

हा काळ विनोबांच्या तीव्र कर्मयोगाचा होता, १२ ते १४ तास विनोबा सतत कार्यमग्न असत. श्रमाधिष्ठित जीवनाचा प्रयोग याच काळात विनोबांनी केला. त्याचप्रमाणे सत्य, अहिंसा, असत्येय इत्यादी 'एकादश व्रतावर', 'एकादश व्रतमाला', 'विचार पोथी', इत्यादी ग्रंथही याच काळात आकारास आले.

❐

# गीताई-गीता प्रवचने

१९१५ साली बडोद्यात गीतेवर प्रवचने चालू होती. विनोबांची आई प्रवचनाला जात असे. दोन चार दिवसानंतर विनोबांची आई विनोबाला म्हणाली, ''विन्या, प्रवचन मला समजतच नाही. गीतेवरील एखादे मराठी सोपे पुस्तक आणून दे.'' विनोबांनी आईला द्रवीडशास्त्र्याचे मराठी गीतेवरील पुस्तक आणि वामन पंडितांच्या गीतेचा समश्लोकी अनुवाद आणून दिला. तरीही विनोबाच्या आईला समजेना, तेव्हा आई विनोबाला म्हणाली, ''विन्या तूच का करीत नाही माझ्यासाठी गीतेचा अनुवाद!'' आईचे हे बोल विनोबांच्या सतत ध्यानात येत. पण त्यांना ते काही जमलेच नाही. परंतु आईवरील श्रद्धेने त्यांनी कधीतरी हे काम करण्याचे मनाशी ठरवले होते. ज्ञानेश्वरी म्हणजे विस्तृत गीताच होय. तरीपण सामान्यांना समजावी अशी गीता लिहावी असा त्यांचा मानस होता.

**गीताई:** विनोबांनी ७ ऑक्टो. १९३० रोजी ब्राह्म मुहूर्तावर गीतेच्या पद्यानुवादाला सुरुवात केली. वर्धा महीलाश्रमाचे सर्व दैनंदिन व्यवहार सांभाळून दररोज रामप्रहरात विनोबा संस्कृतमधील गीता मराठीत आणण्याचेही काम करीत होते. ६ फेब्रु. १९३१ रोजी लिखाणाचे काम संपले या चार महिन्याच्या काळात विनोबा स्वत:मध्ये शिल्लक राहिले नव्हते. 'मी गीतामय झालो होतो' असे विनोबांनी सांगितले. याचे नाव गीता + आई = गीताई असे ठरले. भगवद्गीतेबाबत गाढ आदर आणि आईवरील अगाध प्रेम या दोहोंच्या संगमातून गीताईची निर्मिती झाली. ६-२-१९३१ रोजी विनोबांनी गीताईचे पुर्नलेखन केले. त्यात ९०० दुरुस्त्या केल्या.

गीताईचे लिखाणापूर्वी विनोबांनी दहा बारा वर्षे यावर चिंतन केले होते. गीतेवरील अनेकांची भाष्ये, थोर महात्म्यांच्या टीका, शंकराचार्याचे भाष्य, लोकमान्य टिळकाचे गीतारहस्याचे वाचन केले. विनोबा म्हणतात, ''ज्ञानेश्वरीचे

माझ्यावर फार उपकार आहेत. प्रत्यक्ष जगण्याशिवाय गीता कळायची नाही... आज गांधीजीचे जीवन हे त्यांचे प्रत्यक्ष उदाहरण आहे.'' असे विनोबांनी याबद्दल लिहिले आहे. तरीपण गीताईची छापील ५००० प्रतीची पहिली आवृत्ती १४ जुलै १९३२ रोजी विनोबा धुळे येथील तुरुंगात असताना प्रकाशित झाली.

विनोबांचे धाकटे बंधू शिवाजी भावे यांनी गीताईचा गावोगाव प्रचार केला. महाराष्ट्रातील सर्व गांधीवादी संस्थातून गीताई पाठ होत असत. देशातील बहुतेक समविचारी संस्थातून गीताई पाठ घेत. खुद्द बापूनींही सेवाग्राम आश्रमाच्या दैनिक प्रार्थनेत गीताईचा समावेश केला.

मराठीतील गीतेवरील तत्त्वज्ञानावर आधारीत 'गीताई' ह्या एकमेव पुस्तकाच्या २००५ पर्यंत २४३ आवृत्या निघाल्या असून आतापर्यंत ३७ लाखावर प्रतीचा खप झालेला हा मराठी पुस्तक क्षेत्रातील एक विक्रमच आहे. दुसरा विक्रम केला तो जमनालाल बजाज यांनी विनोबा जे जे लिखाण करतील ते सर्व प्रकाशित करावे अशी जमनालाल बजाजाची इच्छा होती. त्याप्रमाणे जमनालालजीच्या हयातीत प्रकाशीत झालेल्या सर्व आवृत्त्यावर प्रकाशक म्हणून जमनालाल बजाज यांचेच नाव आहे. कालांतराने शिवाजी भावेच्या मदतीने विनोबांनी गीताई शब्दकोश तयार केला. या कोशाचे स्वरूपही इतर कोशापेक्षा निराळे असून हा शब्दकोश म्हणजे गीताई वरचे भाष्यच आहे. गीताईतील एकूण एक सर्व शब्दाचा संग्रह, त्याच्या उल्लेखासह केलेला आहे. तसेच प्रत्येक शब्दाचे व विविध शब्दाचे अर्थही नमूद करण्यात आले आहेत. पुढे सामान्य वाचकाच्या दृष्टीने श्लोकाचे विवरण श्लोकाखाली देऊन अभ्यासाला अधिक सोयीचे व्हावे म्हणून 'गीताई-चिंतनिका' लिहिण्यात आली. गीताईच्या अभ्यासकांना गीताई चिंतानिकालाही तितकीच उपयुक्त ठरते.

१९३२ साली विनोबांचे जळगावात व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. शासनाने कॉंग्रेससह त्यांच्याही भाषणावर बंदी जाहीर केली होती. तरीपण विनोबांनी आपले भाषण सुरू केले तेव्हा पोलिसांनी त्यांना अटक करून त्यांची रवानगी सहा महिन्यासाठी धुळे येथील तुरुंगात करण्यात आली. या तुरुंगात जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, खंडूभाई देसाई, प्यारेलाल, बाळूभाई मेहता, गोपाळराव काळे, सानेगुरुजी, द्वारकानाथ हरकारे इत्यादी अनेक सत्याग्रही होते. तुरुंगाधिकाऱ्याने विनोबांना 'ब' वर्ग व इतरांना 'क' वर्ग दिला होता. तेव्हा विनोबांनी ब वर्ग नाकारून क वर्गातच राहणे पसंत केले.

एकदा सत्याग्रही आणि तुरुंगाधिकाऱ्यात मिळणाऱ्या सवलतीवरून भांडण झाले, तेव्हा काही सत्याग्रहींनी अन्नसत्याग्रह सुरू केला. त्यात विनोबाही सहभागी

झाले. जेलरने मागण्या मान्य करण्याचे आश्वासन देऊनही विनोबांनी उपोषण सोडण्यास नकार दिला. विनोबा म्हणाले, ''साधारणपणे मी एकादशी, शिवरात्रीलाही उपवास करीत नाही. आता सुरुवात केली आहे तेव्हा सत्याग्रहींच्या सगळ्या मागण्या मान्य झाल्याशिवाय मी उपोषण सोडणार नाही.'' शेवटी सत्याग्रहीच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतरच विनोबांनी उपवास सोडला.

**गीता प्रवचने:** धुळ्याच्या तुरुंगातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे दर रविवारी विनोबांची होणारी गीतेवरील प्रवचने. गीता प्रवचनाची सुरुवात २१ फेब्रु १९३२ रोजी झाली. आणि शेवटचे प्रवचन १९ जून १९३२ ला संपले. या चार महिन्याच्या प्रवचनातून विनोबांनी गीतेच्या प्रत्येक अध्यायावर सविस्तर विचार मांडले. सानेगुरुजींनी विनोबांच्या प्रत्येक व्याख्यानाचे सविस्तर टिपण लिहिले. सानेगुरुजींच्या या सविस्तर लिखाणातूनच 'गीता-प्रवचने' हे पुस्तक आकाराला आले.

या प्रवचनाची सुरुवात करतानाच पहिल्या प्रवचनातून विनोबांनी आपली भूमिका स्पष्ट केली. गीतेचा आणि त्यांचा संबंध त्यांनी या प्रवचनातून सांगितला. ते म्हणतात, ''...गीतेचा व माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझे शरीर आईच्या दुधावर पोसले आहे. त्यापेक्षा कितीतरीपट माझे हृदय आणि बुद्धीचे पोषण गीता दूधावर पोसले गेले आहे. मी सतत गीतेच्याच वातावरणात वावरत असतो. गीता हे माझे प्राणतत्त्व आहे...''

गीतेची पार्श्वभूमी सांगताना विनोबांनी पहिल्या प्रवचनात सांगितले, ''महाभारत हे व्यापक आहे. महाभारतात समाजातील सर्वच प्रश्नाचे चित्रण व्यासांनी केले आहे. युधिष्ठिर, भीम यांच्या गुणाबरोबरच दोषही आहेत. दुर्योधन, दु:शासन यांच्या दोषाबरोबर गुणही आहेत. अलिप्त राहून व्यासाने जगातील विराट संसाराचे छाया प्रकाशमय चित्र तुम्हा आम्हासमोर उभे केले आहे.''

गीता प्रवचनाचा समारोप करताना विनोबांनी फलत्यागाचा विचार मांडला असून त्याचे आठ पैलू मांडले आहेत.

१) राजस व तामस कर्माचा त्याग
२) फलत्यागाचा अहंकार नको
३) सात्विक कर्माच्या फलाचा त्याग
४) सात्विक कर्मे फल त्यागपूर्वक करीत राहायची.
५) सात्विक कर्म जे ओघप्राप्त आहे ते करायचे. ओघप्राप्त नाही त्याचा मोह नको.
६) क्रिया तर होतील, कर्म होतच राहिल.

७) फलत्याग पूर्वक कर्म केल्याने चित्त शुद्ध राहते.

८) सहजप्राप्त स्वधर्म बदलणारा व न बदलणारा असतो, वर्णधर्म बदलत नाही,

९) आश्रमधर्म बदलतो, स्वधर्मे बदलत राहावा त्यामुळे प्रकृती शुद्ध राहते.

या प्रवचनातून विनोबांनी गीतेला 'साम्ययोग' हे नाव दिले आहे. गीतेचे साम्ययोगावर विवरण गीता प्रवचनातून आले आहे. वेदोपनिषद,, ज्ञानेश्वर, तुकाराम, अरविंद, टिळक इ. लिखाणाचे प्रतिबिंब गीता प्रवचनातून पडलेले दिसते. त्यामुळे गीता प्रवचनाना व्यापकता आली असून देशातील बहुतेक भाषेत त्याचा अनुवाद प्रसिद्ध झाला आहे. सर्व सेवा संघाने गीता प्रवचनाची इंग्रजी, नेपाळी, डॅनिश आवृत्ती प्रकाशित केली. विनोबानीही आपली सर्वोत्तम कृती म्हणून गीता प्रवचनास वाखाणले आहे. गीता भाष्यावरील १५ लाख प्रती विकला जाणारा हा एकमेव ग्रंथ असावा.

**ग्राम सेवा मंडळ:** धुळ्याहून सुटका झाल्यानंतर विनोबा सरळ वर्ध्याला पोहोचले. १९३२ कायदेभंगाच्या काळात ब्रिटिश सरकारने आश्रमावर बंदी घातली होती. त्यावेळी जवळ जवळ दोन महिने कॉटन मार्केटजवळ काही खोल्या भाड्याने घेऊन विनोबा आपल्या सहकाऱ्यासोबत राहिले. कारावासाच्या दरम्यान विनोबांना मनातल्या मनात देशाच्या ग्रामीण भागाकडे लक्ष दिल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही याची जाणीव झाली होती. म्हणून वर्धा तालुका अंतर्गत येणाऱ्या गावांतून संघटनेचे काम त्यांनी सुरू केले. त्यासाठी 'ग्रामसेवा मंडळ' या संस्थेची स्थापना करण्यात आली. वर्ध्यापासून जवळच 'नाळवाडी' या गावी ग्राम सेवा मंडळाचे कार्यालय उघडण्यात आले. नाळवाडीचे वैशिष्ट्य असे की ८०० लोकांच्या वस्तीतील सर्वच दलित होते. २९-१२-१९३२ रोजी विनोबांनी गांधींना लिहिले, ''वर्धा आश्रमाला १२ वर्षे झाली. एक युग संपले. अनुभव चांगला आहे. कर्तेपणाची भावना लुप्त झाली. ईश्वरच आहे, याची प्रचिती आली. एक तप वर्ध्यात आपल्या आज्ञेनेच होतो....व्रताचे पालन करूनही स्वतःला अपूर्णत्वच भासते. ईश्वरावर माझी जितकी श्रद्धा आहे त्यापेक्षा कितीतरी अधिक ईश्वराची कृपा माझ्यावर असण्याचा अनुभव मला येत आहे.''

नाळवाडीला विनोबा सुरुवातीला एका साध्या झोपडीत राहत. कुणातरी नाळवाडीच्या रहिवाशाची ती झोपडी होती. तेथे स्नानही उघड्यावरच करावे लागे. जमीन मातीची असल्यामुळे सतत सारवावे लागे. काही दिवसानंतर स्वयंपाक घरासाठी म्हणून बाबूंची, कौले असणारी वेगळी झोपडी तयार करण्यात आली. काही दिवसांनी नाळवाडीतच सुतकताई आणि विणण्यासाठी आणखी एक झोपडी तयार केली गेली. येथेच विनोबांनी टकळीवरील सुत कातण्याचे अनेक प्रयोग केले. आठ तासाच्या कातकामानंतर दररोज दोन आणे मिळत.

याची माहिती नियमीतपणे पत्राने विनोबा गांधीजींना कळवीत. अशा एका पत्रापैकी एक पत्र तर १० पानी होते. त्यात विनोबांनी टकळीवरील सुतकताई आणि त्यावरील विविध प्रयोगाची माहिती दिली होती. चरख्यापेक्षा अधिक गतीने टकळीवर सुत कातता येऊ शकते हे विनोबांनी सिद्ध करून दाखविले होते.

नाळवाडीत विनोबांनी आणखी एक नवा उपक्रम सुरू केला होता. ज्यात कार्यकर्त्यांना महिन्यातील पंधरा दिवसात १४ दिवस आसपासच्या गावातून फिरून माहिती जमा करायची व पंधराव्या दिवशी आश्रमात अनुभवाची देवाण घेवाण करून दुसऱ्या पंधरवड्यात पदयात्रा काढून गावकऱ्यांशीसंपर्क वाढवायचा. याबाबत विनोबा म्हणत, ''गावातील जनता हाच आमचा ईश्वर आहे. त्याच्या दर्शनासाठी आपण वारंवार गेले पाहिजे त्याच्याशी तादात्म्य पावण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न केले पाहिजे. हाच ग्रामीण जनतेच्या सेवेचा मार्ग आहे.'' दोन वर्षाच्या अशा सतत संपर्कानंतर नाळवाडी आश्रमातील सर्व कार्यकर्ते आपापल्या इच्छित गावी विकास कामे करण्यासाठी रवाना झाले. प्रत्येकाने आपापल्या गावात एक स्वतंत्र आश्रम वसवावा, आश्रमाचे बांधकाम प्रत्येकाने स्वत:च करावे असा दंडकही पाळण्यात आला. अशा आश्रमात पुलगाव, देवळी, भिवापूर, जुनोना, सिंदी, रोहिणी आणि जामशी हे प्रमुख होत. आश्रमवासियांच्या जेवणाची व्यवस्था गावकऱ्यांनी केली. आश्रमवासी गावात सफाई टोळीची स्थापना, औषधाचे वितरण, प्रार्थनासभा, ग्रामीण रस्त्याची दुरुस्ती व देखभाल करीत. तसेच एखाद्याला टकळीवर सुत कातणे, विणकामही शिकवले जाई.

ग्राम सेवा मंडळाच्या कार्याचा ग्रामीण जनतेवर मोठा प्रभाव पडला. तेव्हा वर्धा तालुकातील सर्व गावे खादीमय व्हावी, गरजवंताला, बेकार माणसाला, दैनंदिन उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे, किमान कपड्याच्या बाबतीत स्वावलंबन निर्माण व्हावे ही ग्राम सेवा मंडळाची अपेक्षा होती. याच काळात विनोबा 'आश्रमवृत्त' हे मासिकही काढीत यातून नाळवाडी आणि परिसरातील आश्रमातील कार्यकर्त्याच्या कामाचा अहवाल आणि गांधी, विनोबा, जमनालाल बजाज करीत असलेल्या कामाची माहिती असे.

**नाळवाडीचा प्रयोग :** १९३६ मध्ये नाळवाडी आश्रमाजवळ टकळी आणि चरखा तयार करण्यासाठी एक कार्यशाळा सुरू करण्यात आली. तेथेच गोसंवर्धनसाठी गोशाळा आणि जनतेला दुध आणि दुग्धजन्य पदार्थ मिळावे यासाठी 'सहकारी गोरस भांडार' उघडण्यात आले. यातील महत्त्वाची आणि लक्षणीय गोष्ट म्हणजे १९३७ मध्ये गोपाळराव काळे आणि वाळूंजकरांच्या देखरेखीखाली नाळवाडीतच खादी ग्रामोद्योग आयोगाच्या मदतीने एक चर्मोद्योग

केंद्र 'चर्मालय' सुरू करण्यात आले. नैसर्गिकरित्या मृत्यू झालेल्या जनावरांच्या कातडीपासून चप्पल, बूट इत्यादीकातडी वस्तू या चर्मालयात तयार केल्या जाऊ लागल्या. आश्रमातील आणि गावातील लोकांना यामुळे रोजगार मिळू लागला. मनोहर दिवाण यांनी ग्रामसेवा मंडळामार्फतच कुष्ठरोग पिडीताचे कार्यही सुरू केले. सुरुवातीला काही आश्रमवासीयांनी मनोहर दिवाण यांच्या कामाला विरोध केला. मात्र विनोबांनी दिवाणांच्या कामाला प्रोत्साहन दिले. पुढे वर्धा-नागपूर रस्त्यावर दत्तपुर येथे १९३६ मध्ये 'महारोगी सेवा मंडळ' स्थापन करण्यात आले. उत्पादकता आणि स्वावलंबी असणारी अशी भारतातील ही एकमेव कुष्ठरोगी संस्था होती.

नाळवाडी येथे 'चर्मालय', 'महारोगी सेवा मंडळ' या दोन स्वायत्त संस्था असल्या तरी ग्राम सेवा मंडळाचे मार्गदर्शनाखाली त्या काम करीत. या सर्वांचा व्याप बराच वाढला होता. मनोहर दिवाणानी आपले सर्व आयुष्य महारोगी सेवा मंडळासाठी अर्पण केल्याने त्याचाही व्याप प्रचंड वाढला होता. त्यामुळे नाळवाडीतील जागा अपुरी पडू लागली. १९३२च्या सत्याग्रहानंतर ब्रिटिश सरकारने वर्धा येथील आश्रम बंद केला. एका वर्षानंतर त्याचा ताबा विनोबांकडे दिला. पण तेथे जाण्यास विनोबाचे मन तयार होईना. विचाराअंती आश्रम ग्राम सेवा मंडळ व इतर निवासी जागा आखिल भारतीय महिलाश्रमाला देण्यात आल्या. यापूर्वी या ठिकाणी कन्याशाळा आणि रचनात्मक कामाचे शिक्षण देणारे केंद्र, मुलींसाठी कन्याआश्रम चालवले जाई. म. गांधींनी ७ नोव्हेंबर १९३३ च्या हरिजन यात्रेची सुरुवातही याच ठिकाणाहून केली होती.

**सत्याग्रहाश्रम:** वर्धा सत्याग्रहाश्रमाची एक मोठी अडचण होती, ती जागा सामान्य माणसाच्या संपर्कापासून अत्यंत दूर होती. ग्राम सेवा मंडळाचे संघटन करताना स्वावलंबन आणि सहकार्य या तत्त्वावर भर देण्यात आला होता. ह्या तत्त्वांना यशही मिळाले होते. गोपुरी येथील कार्यशाळेत सुतकताई आणि चरख्याशी संबंधित सुटे भाग तयार केले जात. या कार्यशाळेसंबंधीचे निर्णय सर्वसंमतीने घेतले जात. त्याला जोडूनच एक सहकारी भांडारही होते. सुताच्या गुंड्या देऊन त्या बदलण्यात आवश्यक वस्तुंची देवाण घेवाण या सहकारी भांडारामार्फत होई.

खादी यात्रा हा ग्राम सेवा मंडळाच्या कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग होता. दरवर्षी विनोबा खादीयात्रा आयोजित करीत. खादी यात्रा म्हणजे खादी आणि इतर रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन होते. या निमित्त आसपासच्या गावातील लोक एकत्र येत. दोन दिवस भरपूर कार्यक्रम आयोजित

केले जात. भाषण, चर्चा, सुतकताई, खादी विणकाम स्पर्धा आणि खादी ग्रामोद्योग प्रदर्शन असे या खादीयात्रेचे स्वरूप होते. १९४१ पर्यंत अशी खादी यात्रा नियमितपणे आयोजित केली जाई. कार्यक्रमाच्या संख्येपेक्षा त्याची योग्यता आणि गुणाचा विचार विनोबा करीत म्हणून विनोबा म्हणत, ''सेवा व्यक्तीची आणि भक्ती समष्टीची (समाजाची)''

सत्याग्रह आश्रम आणि नाळवाडी या दोन्ही आश्रमात विनोबांनी योग्यता आणि गुणाबरोबरच भाषा शिक्षणाला अधिक महत्त्व दिले होते. शिक्षण, अभ्यास नियमित असावा. ज्याप्रमाणे घराची सफाई दररोज केली जाते तसेच अभ्यासाचे असते.

मार्च १९३० मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी दांडी पदयात्रेच्या सुरुवातीलाच गांधीनी ''स्वराज्य मिळाल्याशिवाय साबरमती आश्रमात परत येणार नाही'' अशी प्रतिज्ञा केली होती. साबरमती आश्रम सोडताना आश्रमाचे रुपांतर दलित शिक्षण संस्थेत केले होते. मिठाच्या सत्याग्रहाचा कार्यक्रम संपल्यानंतर गांधी अहमदाबादेस गेले असता साबरमती आश्रमाऐवजी गुजराथ विद्यापीठात थांबत. तेव्हा जमनालाल बजाज यांची म.गांधींना सुचविले की म. गांधींनी वर्ध्यालाच आपले केंद्र बनवावे, तेव्हापासून म. गांधींचे वर्ध्याला येणे जाणे वाढले. शेवटी ३० एप्रिल १९३६ रोजी म. गांधीजीं पायीच वर्ध्यापासून चार मैल अंतरावरील सेवाग्रामला पोहोचले आणि तेथेच राहू लागले.

**परंधाम-पवनार:** अत्याधीक श्रम, निकृष्ट आहारामुळे १९३८च्या सुरुवातीला विनोबाजींची प्रकृती एकदम खालावली. प्रकृती खालावण्याचे आणखी एक कारण असे होते की, नाळवाडी आश्रम वर्धा नागपूर रस्त्याला लागूनच असल्यामुळे वाहनाच्या धुळीचाही त्रास आश्रमाला होई. तेव्हा म. गांधींनी विनोबांना सुचविले की उंच डोंगरावर जाऊन विनोबांनी विश्रांती घ्यावी. त्यानुसार एक दिवस विनोबा पवनारला गेले. पवनार हे ठिकाण नागपूर रस्त्यावर वर्ध्यापासून सहा मैलावर आहे. जमनालाल बजाज यांनी धाम नदीच्या काठावर एक घर बांधलेले होते. विनोबांना ही जागा आवडली आणि हीच जागा त्यांनी क़ायम निवासासासाठी निश्चीत केली. येथेही विनोबांनी एक आश्रम सुरू केला आणि आश्रमाचे नाव निश्चित केले, 'परंधाम आश्रम'. धाम नदीकाठी असल्यामुळे परंधाम, पण याचा दूसराही अर्थ महत्त्वाचा आहे. परं म्हणजे श्रेष्ठ आणि धाम म्हणजे लोक निवास. श्रेष्ठ(दिव्य) लोक येथे आल्यानंतर विनोबांनी आरोग्य सुधारण्यासाठी प्रयत्न केले. विनोबा म्हणतात या ठिकाणी १५०० वर्षांपूर्वी २४ प्रदेशात पवन (म्हणजे वारा) राज्य होते. या पवनराज्याच्या राजधानीच्याच ठिकाणी आजचे पवनार वसलेले

आहे. विनोबांनी स्वत: शेतात श्रम करून उगवलेल्या भाजीपाला , भूईमूग, दूध आदी त्यांचा आहार होता. सहा महिन्यातच विनोबांचे वजन ९० पौंडावरून १२० पौंड वाढले. याबाबत विनोबा म्हणतात, ''मी माझ्या सर्व काळज्या ईश्वराधीन केल्या, जवळ कोणतेही पुस्तक नव्हते होती फक्त काही मराठी संताची भजने. याकाळात मी कोणतेच गंभीर विचार, वाचन, लिखाण केले नाही.''

परंधाम आश्रमातील विनोबांचे वास्तव्य म्हणजे, 'एकात्मिक जीवन' पद्धतीचे दिवस होते. या काळात विनोबांनी कुणाशीही फारसा संपर्क ठेवला नाही. एकाग्रपणे सूत कातणे हाच त्यांचा सततचा दिनक्रम होता. याच काळात आचार्य कृपलानी गांधींच्या सांगण्यावरून भेटायला आले असता विनोबांनी त्यांच्याकडे पाहिले न पाहिले केले. कृपलानीला वाटले ते ध्यानमग्न आहेत. पुन्हा कृपालीनी आवाज दिली तरीही विनोबांनी कोणताच प्रतिसाद दिला नाही. अर्ध्यातासानंतर कृपालनी निघून गेले आणि घडलेली घटना गांधींना सांगितली. तेव्हा गांधी म्हणाले ''ही एका आध्यात्मिक साधकाच्या ध्यानावस्थेची आदर्श अवस्था आहे.''

परंधाम आश्रमातच विनोबांनी पवित्र कुराणाचा अरबीमधून अभ्यास करण्यासाठी एका मौलवीची मदत घेतली. पवित्र कुराणाचा मूळात अभ्यास झाल्यानंतर त्यातील अत्यंत महत्त्वाच्या भागावर विनोबांनी एक पुस्तक लिहिले. सर्व सेवा संघाने या पुस्तकाच्या हिंदी, उर्दू आणि इंग्रजीतून अनुवाद प्रसिद्ध केला. हिंदी 'कुराणसार', उर्दूत 'रुहूल कुराण' आणि इंग्रजीतून 'The Essence of a cron' ही त्यांची नावे. मूळ अरबी भाषेतही विनोबाचे हे पुस्तक प्रकाशित झाले तेव्हा त्यांची विद्वत्ता अरबी मौलवीही मान्य केली . सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या पुस्तकामुळे कुराणातील प्रतिपादीत विषयाबाबत जे अनेक गैरसमज होते ते गैरसमज दूर करण्यात या पुस्तकांची फार मदत झाली.

आजही पवनार आश्रमात भरत-राम मंदिर आहे. त्याची मुहूर्तमेढही विनोबांनी याच काळात रोवली. जमनालाल बजाजाची इच्छा या ठिकाणी भरत राम मंदिर असावे अशी होती. योगायोगाची घटना अशी की शेतात खोदकाम करताना विनोबाना एक मोठी शिळा लागली. खोल खणून ती शिळा बाहेर काढता ती शिळा म्हणजे भरत-राम भेटीची कलात्मक मूर्ती होती. विनोबांनी त्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली, अशा प्रकारे भरतराम मंदिर स्थापनेची जमनालाल बजाजाची इच्छा पूर्ण झाली.

पवनारपासूनच तीन मैलावर सूरगाव आहे. विनोबा या गावी नियमित जात आणि सूरगाव स्वच्छ ठेवण्यासाठी साफसफाई करीत. पुरुष आणि स्त्रिया प्रातर्विधी उघड्यावरच करीत. विनोबांनी अनेक दिवस हा मैला साफ करण्याचे काम केले.

परिणामी सूरगाव ग्राम पंचायतीने स्त्रियांसाठी संडासचे बांधकाम केले. पुरुषाच्या सवयीत काहीच फरक पडला नाही तरी विनोबांनी आपला दिनक्रम अनेक दिवस चालूच ठेवला होता.

**कांचन मुक्ती**: परंधाम आश्रमाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या आश्रमात विनोबांनी केलेला 'कांचनमुक्ती'चा प्रयोग होय. १९४९ साली पैशासंबंधी विचार करताना त्यांना हा प्रयोग सूचला. विनोबांना सुरुवातीपासून संपत्तीबाबत उपेक्षाभाव, तिटकारा, अनिच्छा होती. पण पवनारमध्ये कधी कधी मजूरांना मजूरी देताना जेव्हा पैशाचा प्रश्न येई तेव्हा विनोबा विचार करीत मी दहा तास सूत कातती तेव्हा मला अधिकाधीक चार आणे मजूरी आणि माझा खर्च सहा आणे. यातूनच मजूराची मजूरी आणि त्यांचा खर्च यांची तोंड मिळवणी करण्यासाठी विनोबांनी मजूरांना सुचवले की सर्वांना मिळणारी मजुरी एकत्र करून त्याची समानवाटणी करावी. मजुरांनी त्याला समंती दिली. श्रमाची पूर्ण मजुरी म्हणजेच श्रमप्रतिष्ठा वाढवणे होते. हे यातून विनोबांच्या लक्षात आले. त्यातून पुढे कांचनमुक्तीचा प्रयोग सुरू झाला.

पैसा मानवाचे सामाजिक व सार्वजनिक जीवन दूषीत करतो. समाजात उत्पात आणि विषमता निर्माण होण्याचे मुख्य कारण पैसाच. म्हणून समाजातून पैशाचे अस्तित्वच संपवावे. अध्यात्मिक साधनेसाठी कांचनाचा निषेध केलेलाच आहे. आध्यात्मिक जीवनाबरोबरच व्यावहारिक जीवनातही निर्मळता आणण्यासाठी कांचनाचा निषेध आवश्यक आहे असे विनोबांना वाटले. म्हणून १ जाने १९५० पासून आश्रमाच्या व्यवहारात कांचनमुक्तीचा प्रयोग सुरू करण्याचे विनोबांनी जाहीर केले. कांचनमुक्तीतून स्वावलंबनाची सुरुवात आश्रमासाठी लागणारी भाजी विकत घेण्यापासून झाली. आश्रमास लागणारा भाजीपाला, धान्य आदीचे उत्पादन आश्रमातच सुरू करण्यात आले. शेतीचीही संकल्पना विनोबांनी वेगळ्या प्रकारे सांगितली आहे. हाताने शेती, यंत्राच्या मदतीने शेती आणि बैलाच्या मदतीने शेती अशा प्रकारच्या शेतीला विनोबांनी वेगवेगळी नावे दिली. ऋषिशेती (हाताच्या बळाने शेती करणे), वृषभशेती (बैलाच्या मदतीने शेती करणे), आणि इंजिनशेती (यंत्राच्या सहाय्याने शेती करणे) असे हे तीन प्रकार होतात. पाण्याची सोय असेल तर ऋषीशेती चांगल्या प्रकारे करता येते व उत्पन्नही चांगले मिळते. बैल हा आपल्या कुटुंबाचा घटकच असतो हे ध्यानात ठेवून त्याला शेतीत राबवले पाहिजे, त्यातून दीडपड उत्पन्न वाढवता येते. मर्यादित प्रमाणात आधुनिक सुधारलेली अवजारे यांचा उपयोग करण्यास हरकत नाही. असे विनोबांनी सुचवले होते. पवनार आश्रमातून ह्यापैकी तिन्ही प्रकारे शेती केली जात होती.

शेतीला जोडूनच एक गोशाला तयार करण्यात आली. कपड्याची गरज भागविण्यासाठी खादीचे उत्पादन वाढविण्यात आले. प्रवास, टपाल, तार, मीठ,रॉकेल आदीसाठी पैशाची गरज लागे, ती गरज भागविण्यासाठी एक छापखाना सुरू करण्यात आला. शेतीला पाणी पुरवठ्यासाठी विहीर खोदण्यात आली. विहीरीसाठी पैशाच्या मदतीऐवजी श्रमदानाची मागणी करत मदत उभी केली. विहिरीतून पाणी काढण्यासाठी बैलाची मदत नाकारून 'पार्शियन व्हील'चा वापर करण्यात आला. याच ठिकाणी सांयकाळी प्रार्थना होई. ही प्रत्यक्ष कर्मणा पूजा होती. या विशिष्ठ अशा प्रार्थनेमुळे जयप्रकाश नारायणांना विनोबांच्या शक्तीशाली व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण निर्माण झाले होते.

**ब्रह्मविद्या मंदिर**: लहानपणापासून विनोबांना ब्रह्मविद्येचे आकर्षण होते. यासाठी त्यांनी गृहत्यागही केला होता. ईश्वर प्राप्तीचा आपला अभिनव प्रयोगही विनोबांनी परंधाम आश्रम पवनार येथेच सुरू केला होता. ''आपल्या समाजात स्त्रियांची साधना नेहमीच दुर्लक्षित राहिली आहे. तिचा साक्षात्कार होण्याची आवश्यकता आहे. जगाच्या शांतीसाठी पुरुषाबरोबरच स्त्रीलाही समाज संचालनात सहभागी करावे हा एक विचार विनोबांच्या मनात कितीतरी दिवस होता. त्याची सत्यता ब्रह्मविद्या मंदिराने झाली. देशातील विभिन्न भागातील केवळ अविवाहित मुलीनाच येथे सामील करून घेतले जाई. त्याचे आयुष्य पूर्णत: स्वावलंबी करण्याकडे विनोबाचा कल होता. त्यासाठी त्यांचा स्वयंपाक, दैनंदिन कामे, शेती, संडास सफाई ही सर्व कामे त्यांनीच करावी असा दंडक होता. ब्रह्म विद्या मंदिरातच एक छापखानाही होता. तोही त्या मंदिरातील स्त्रियांतर्फेच चालवला जाई. सामुहिक साधना, धर्मनिष्ठा आणि ध्यान स्वाध्याय या तीन तत्त्वांना ब्रह्म विद्यामंदिरात प्राधान्य होते. विनोबांचा 'स्त्रीशक्ती' हा ग्रंथ म्हणजे स्त्रीशक्तीचे श्रेष्ठत्व दाखवणारा ग्रंथ होय. या पुस्तकात विनोबा म्हणतात, ''माझी तर अशी अपेक्षा आहे की स्त्री ही शास्त्र निर्माण करणारी घटक बनावी. भारतात पूर्वी स्त्री शक्तीचा प्रभाव समाजावर फार मोठ्या प्रमाणात पडलेला होता. तरीपण त्या शास्त्रकार नव्हत्या. पण ब्रह्मविद्येचे जे शास्त्र बनले आहे ते पुरुषांनी बनवल्यामुळे एकांगी आहे. त्याचे संशोधन होऊन खरी ब्रह्मविद्या जगासमोर यायला हवी. स्त्रिया जर ब्रह्मचारिणी असतील, तर जगाचे चित्र बदलून जाईल.'' पुढे विनोबा म्हणतात, ''मी जर स्त्री असतो तर माहिती नाही मी किती बंड केले असते! स्त्रियातर्फे बंड व्हायला हवे, अशी माझी अपेक्षा आहे.'' पुढे त्याच्या कल्पनेतील बंडखोर स्त्री कशी असावी याचेही चित्रण विनोबांनी केले आहे.

विनोबा पवनारला फार काळ राहू शकले नाही. पण येथील अल्पशा

वास्तव्यातही विनोबांनी नियमीत लिखाण केले आहे. या माध्यमातून आश्रमवासियांना विनोबांचे बौद्धिक मार्गदर्शन होत असे. पवनारात बाळकोबा सहा महिने राहत आणि तेथील कामकाज सांभाळीत उरलेले सहा महिने पुण्याजवळील उरुळीकांचन येथे निसर्गोपचार केंद्राचे काम पाहात.

याच काळात विनोबांनी आश्रमवासियांना गणिती चमत्काराचे दर्शन घडवले. ''शून्याला मोठ्यातल्या मोठ्या संख्येने गुणिले तरी उत्तर शून्यच येते. हा शून्याचा चमत्कार आणि रोचकता आहे. गणितातून जर शून्य काढून टाकला तर गणिताची अद्‌भूतता संपुष्टात येईल हे त्यांनी आश्रमवासियांना पटवून दिले.

❐

# बुनियादी तालीम

ऑक्टोबर १९३७ साली वर्धा येथे आश्रमाच्या शिक्षण मंडळाचा प्रमुख या नात्याने गांधींच्या स्वावलंबी शिक्षण विषयक विचार विनिमयासाठी शिक्षण परिषदेचे आयोजन विनोबांनी केले होते. काही दिवसापासून गांधीजीनी 'हरिजन' मधून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या मदतीने शिक्षण स्वावलंबी कसे होऊ शकेल या संबंधी लिखाण सुरू केले होते. भारतातील अनेक प्रांतातून १९३५च्या कायद्यानुसार मंत्रीमंडळे अस्तित्वात आली होती. या प्रांताच्या शिक्षण मंत्र्यासमोर व्यवहार्य अशी शिक्षणाची योजना सादर करावी असा गांधीजींचा मानस होता. ७ ते १४ वर्षे वयाच्या मुलाच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाविषयी वेगळी भूमिका असावी असे गांधीजींचे मत होते. प्रत्येक शाळेने त्याच्या खर्चासाठी विविध योजनातून पैसा उभा करावा असाही सल्ला गांधींना द्यावयाचा होता.

गांधीजींनी मांडलेल्या धोरणानुकुल आणि धोरणाला प्रतिकूल असे विचार या परिषदेतून मांडले गेले. सर्व संमत निर्णयासाठी एका समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने संबंधित शिक्षणाच्या धोरणाचा सर्वांगाने विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा असे ठरले. गांधीजींने या परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारून समितीच्या इतर सभासदांची नावाची यादीही गांधीजींनी स्वत:च तयार केली होती. विनोबांनी जामोया मिलीया इस्लामियाचे कुलगुरू डॉ. झाकिर हुसेन यांचे नाव या समितीच्या सभासदासाठी सुचवले आणि गांधींनीही त्याला लगेच मान्यता दिली आणि झाकीर हुसेन यांना उर्दूतून निमंत्रण पाठवले व त्यांनी ते लगेचच स्वीकारले.

**शिक्षण परिषद:** शिक्षण परिषदेतून डॉ. झाकिर हुसेन यांनी सामान्यपणे शिक्षण योजनेचे स्वागत केले, परंतु गांधीच्या स्वावलंबनाच्या विचारावर मात्र त्यांनी टीका केली. कारण झाकीर हुसेनच्या मते शाळेचा खर्च स्वावलंबनातून

निघावा या नावाखाली शिक्षक आपल्या पगारासाठी विद्यार्थ्यांकडून जबरदस्तीने जबरदस्त फी वसूल करण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. गांधीजींनेह्या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. या परिषदेतून खालील इतर निर्णय घेण्यात आले.

१) सात वर्षांपर्यंतच्या मुलामुलींना सक्तीचे मोफत शिक्षण असावे.
२) मातृभाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे.
३) गांधीजींची शिक्षणातून उत्पादकता आणि परिश्रमाची संकल्पना मान्य करण्यात आली. तसेच बुद्धी आणि योग्यतेच्या विकास त्यासाठी प्रशिक्षणाचा संबंध निर्माण व्हावा असेही मान्य झाले.
४) अशा पद्धतीच्या शिक्षण व्यवस्थेतून शिक्षकाचा पगार व इतर खर्चासाठी योग्य तो पैसा उभा केला जावा.

यानुसार या शिक्षण पद्धतीचा सविस्तर अभ्यासक्रम तयार करण्यासाठी डॉ. झाकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना करण्यात येऊन विशेष निमंत्रित म्हणून विनोबाचाही त्या समितीत समावेश करण्यात आला. या निमित्त डॉ. झाकिर हुसेन अनेकदा वर्ध्यास आले तसे या 'बुंनियादी तालिम' योजनेस व्यावहारिक स्वरूप देण्यासाठी विनोबांनी मदत करावी अशी विनंती डॉ. झाकिर हुसेन यांनी विनोबांना केली होती.

डिसेंबर १९३७ मध्ये या समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. हा अहवाल तयार करण्यात विनोबांची महत्त्वाची भूमिका होती. कारण सुतकताईविणकाम इत्यादीची शास्त्रीय माहिती असणारे तेच एकमेव सभासद या समितीत होते. याच विषयावर नंतर विनोबांनी एक क्रमिक पुस्तकही लिहिले होते. म्हणजे स्वावलंबी शिक्षणाचे गांधीजीं जरी जनक असले तरी त्या योजनेला मूर्त स्वरूप देण्याचे काम विनोबांनी केले होते. वास्तविक पाहता अशा प्रकारच्या स्वावलंबी शिक्षणाचा अवलंब विनोबांनी साबरमती आणि वर्धा आश्रमात या पूर्वीच केला होता, फक्त डिसें. १९३७ मध्ये त्याला रितसर 'बुनियादी तालीम' हे नाव मिळाले.

**बुनियादी तालीम-अर्थ:** या शिक्षण पद्धतीविषयी स्पष्टीकरण देताना विनोबा म्हणतात, "या शिक्षण पद्धतीत ज्ञान आणि काम वेगवेगळे नसून त्याला एकत्व प्राप्त झाले आहे. दोन्हीएक समान पुढे आले असून कामामुळे ज्ञान आणि ज्ञानामुळे उपयोगी काम आणि दोन्हीमुळे बुद्धी प्रत्यक्ष कामाची सुरुवात करत नाही, तोपर्यंत जिज्ञासा व ज्ञानाची भूक भागत नाही, आणि ज्ेव्हा एखादे ज्ञान जिज्ञासेशिवाय मानवावर लादण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा ते ज्ञान मानव स्वीकारत नाही, ग्रहण करीत नाही. पुस्तकातून ज्ञानाची प्राप्ती होतेच असे नसून त्यासाठी त्याची मानसिक तयारी हवी, त्याच्या चिंतन शक्तीचा विकास व्हावा

म्हणून शिक्षण हे नदीच्या प्रवाहासारखे नित्यनूतन असावे.''

प्रत्यक्ष कामातून शिक्षणाची पद्धती समजावून सांगताना विनोबा म्हणतात, ''वास्तविक पाहता शिक्षण हे प्रत्यक्ष कामाचे अनुषांगिक कल आहे. जो काही उपयोगी काम करतो. तेव्हा त्यातून त्याचे आपोआप शिक्षण होत जाते.'' शिक्षणाच्या विस्ताराऐवजी त्याचा खोलवर परिणामाचा विचार होणे अगत्याचे आहे, असे विनोबा म्हणतात. विद्यार्थी कसा असावा याबाबत विनोबा म्हणतात, ''विद्यार्थी नम्र असावा, त्याचबरोबर तो आपल्या उद्दिष्टाबाबत दृढ निश्चयी, धैर्यशाली असावा.''

'बुनियादी तालीम' फक्त ग्रामीण भागातून सुरू करावी हे एकदम चुकीचे आहे. संपूर्ण देशभर ही शिक्षण व्यवस्था अमलात आणावी. ग्रामीण भाग आणि शहरी भागातून वेगवेगळी शिक्षण पद्धती असू नये. खऱ्या अर्थाने नवी शिक्षण व्यवस्था त्यांचवेळी आस्तित्वात येईल तेव्हा संपूर्ण देशातील शिक्षण व्यवस्था 'नइ तालीम'च्या आधारावर उभी असेल.

बुनियादी तालीमच्या संबंधात धार्मिक शिक्षणाचा विचार करताना विनोबा म्हणतात, ''धार्मिक शिक्षण हितकारक ठरते हे निर्विवाद असले तरी आज आपण धर्माचा अर्थ अत्यंत संकुचित केल्याने धार्मिक शिक्षण नको असा विचार येत आहे.'' पुढे विनोबा म्हणतात, ''वास्तविक पाहता धार्मिक शिक्षण हा साहित्याचा विषय नाही. शुद्ध, उत्तम चरित्र, ईश्वरावर श्रद्धा, आत्मा, शरीर नाही. हा धर्माचा प्राण असतो, धार्मिक शिक्षण सत्संग आणि योग्य व्यक्तीच्या सहवासातून मिळत जाते. म्हणून चांगल्या शिक्षकाची नियुक्ती म्हणजेच धार्मिक शिक्षण होय.''

**पहिला सत्याग्रह :** आश्रम पातळीवर या घटना घडत असताना जगावर दुसऱ्या महायुद्धाचे ढग जमा होऊ लागले होते. हिटलरने पोलंडवर आक्रमण करून दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात केली होती. पोलंडशी असणाऱ्या अनाक्रमणाच्या करारामुळे ब्रिटनलाही युद्धात उतरावे लागले. ब्रिटन महायुद्धात पडल्यामुळे आपोआप भारतही महायुद्धाच्या गर्तेत सापडला. याप्रती आपला अहिंसात्मक निषेध व्यस्त करण्यासाठी गांधींनी सामुहिक सत्याग्रहाऐवजी व्यक्तिगत सत्याग्रहाचा मार्ग निवडला आणि पहिला सत्याग्रहीम्हणून विनोबांची निवड केली. १५ ऑक्टोबर १९४० रोजी पवनार येथे विनोबांनी आपलीभूमिका विषद केली. त्यानंतर यासंबंधी सुरगाव, सेलू, देवळी येथेही भाषणे केली. २१ ऑक्टोबर १९४० रोजी सरकारने त्यांना अटक करून युद्ध विरोधीभाषण केल्याचा आरोप ठेवून त्यांना तीन महिन्याची शिक्षा सुनावली. तीन महिन्याची शिक्षा संपताच त्यांनी पुन्हा सत्याग्रह केल्यामुळे सहा महिन्याची शिक्षा देण्यात आली. तिसऱ्या वेळी सत्याग्रह केल्यामुळे मात्र त्यांना

एक वर्षाची शिक्षा देऊन नागपूर जेलमध्ये ठेवण्यात आले.

नागपूर जेलमध्ये जेलर विनोबाकडे जातीने लक्ष देई. त्यांचे जेवण, अभ्यासाला लागणारी पुस्तके व इतर साहित्य त्यांना पुरवले जाई. वाचण्यासाठी खोलीत दिव्याची व्यवस्था करण्यात आली. या काळात विनोबांनी रामकृष्ण बजाज यांना संस्कृत शिकवले. या शिक्षेच्या काळातील त्याचे महत्त्वाचे कार्य म्हणजे 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकाचे लेखन. मुळात हे पुस्तक विनोबांनी मराठीतून लिहिले. अहिंसेवर आधारित राजकीय व्यवस्थेचे वर्णन 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकातून विनोबांनी केले. या पुस्तकात याच विषयावरील हॅरॉल्ड लास्कीच्या 'ग्रामर ऑफ पॉलिटीक्स' या ग्रंथापेक्षाही राज्यशास्त्राचा अधिक मूलगामी विचार विनोबांनी केलेला दिसतो. म्हणून भारतीय राजकारणाचे व्याकरण असेही स्वराज्यशास्त्र या पुस्तकास म्हणणे संयुक्तिक ठरेल. पन्नास पानाची ही पुस्तिका म्हणजे आधुनिक राज्यशास्त्राचा मुकुटमणी आहे. याच काळात डॉ. भारतन कुमारप्पा नागपूर जेलमध्ये होते. त्यांनी दादा धर्माधिकारी आणि गोपाळराव काळे यांच्या मदतीने 'स्वराज्यशास्त्र' या पुस्तकाचा इंग्रजी अनुवाद केला.

राज्यसरकार आणि स्वराज्याविषयी मत व्यक्त करताना विनोबा म्हणतात, ''राज्य किंवा सरकार ही एक वस्तू असून 'स्वराज्य' ही वेगळीच वस्तु आहे. सरकार किंवा राज्याची प्राप्ती हिंसेने करता येते परंतु स्वराज्याची प्राप्ती फक्त अहिंसेशिवाय असंभव आहे. विचार करणारे राज्याची मागणी न करता स्वराज्याची मागणी करतात, स्वराज्य हा वेदात वापरलेला शब्द असून त्याचा अर्थ होतो, 'प्रत्येकाचे राज्य'. असे राज्य जे प्रत्येकास आपले वाटते स्वराज्यात सतत विकास होतो. त्याच्या पद्धतीतही सतत बदल होत असतो.''

**शांतीसेना:** याच पुस्तकातून विनोबांनी गावाचे स्वावलंबन, स्वावलंबनाचे मार्ग आदीचेही स्पष्टीकरण केले असून अहिंसक समाज रचनेचेही समर्थन यातून केले आहे. बहुमताचे शासन, आत्ममनाचे रक्षण, निष्पक्ष आणि सुलभ न्याय पद्धती, सार्वजनिक शिक्षणाचे व्यवस्था इत्यादी स्वराज्याचे ध्येय असते, असहकार आणि प्रतिकाराचेही महत्त्व यात सांगितले आहे. अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी 'शांतीसेना' हा पर्यायही विनोबांनी सुचविला आहे. जे स्वराज्यशास्त्रात सांगितले आहे त्यातील तत्त्वानाच पुढे विनोबांनी परंपरागत राजकारणात 'लोकनीति' संबोधले असून लोकनीति संघटीत करून ती शक्तीशाली व्हावे असे पुढे म्हटले आहे. त्यामुळे शासनाचा व खऱ्या लोकमताचा पाया मजबूत होईल.

शांतीसेनेचे कार्य आणि अहिंसात्मक व्यवस्था निर्माण झाल्यानंतर परंपरागत

राजकारणाच्या ठिकाणी 'लोकनीती' संघटीत आणि सशक्त करण्याचे कार्य विनोबांनी केले आहे. ते म्हणजे 'शासनपद्धतीचा लोकमताचा आधार जितका बळकट असेल तितके त्या शासनाची सत्ता कमी कमी होत जाईल. अशावेळी समन्वय, सल्ला, मार्गदर्शन अशीच कामे सरकारला करावी लागतील. जगातील सर्व राजकीय सत्तेचे केंद्र गावागावातूनच असावे. गावाची व्यवस्था बहुमताऐवजी सर्वसंमतीने चालवले जाईल. विश्व लोकसभा ही सर्वात श्रेष्ठ सत्ता असेल. या मार्फत. आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमन आणि संचालन होईल. अशा व्यवस्थित जगातील विभिन्न राष्ट्राचे स्वरूप, विश्व.....तील प्रांतासारखे असेल; विविध देशाचे, विविध प्रदेशाचे स्वरूप जिल्ह्यासारखे आणि हे जिल्हे प्रशासनाचे एकक बनेल. अशा प्रकारे लोकनीतीतून आंतरराष्ट्रीय सहकार निर्माण होईल. जगात सुख शांतता नांदू लागेल. मानवाच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होऊन स्वतंत्र समाज आस्तित्वात येईल. अशावेळी समाजातून अन्याय आणि शोषणाचा नाश होईल.

याच पुस्तकातून विनोबांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याबाबत महत्त्वाच्या बाबींचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते 'संयुक्त राष्ट्रसंघाने सुरुवातीलाच घोडचूक केली. संयुक्त राष्ट्रसंघाने एकतर आपल्या सभासद राष्ट्रांना निःशस्त्र करून सर्व ऐक्य स्वतःजवळ ठेवणे किंवा फक्त नैतिक अनुशासनाच्या आधारावर काम करणाऱ्या शांतीसेनेची निर्मिती करणे, हेच योग्य ठरले असते. याशिवाय या पुस्तकात भारतातील निवडणूक पद्धती, मताधिकार अप्रत्यक्ष निवडणुका, ग्राम पंचायती इत्यादी बाबत आपली मते व्यक्त केली आहेत.

**भारत छोडो:** नागपूर कारागृहातून सुटका झाल्यानंतर विनोबा पवनारला पोहोचले. आणि पूर्ववत कामाला लागले. कैदेतील निवांतपणामुळे विनोबांनी बरेचसे चिंतन आणि मनन केले होते. त्यातून त्याच्या पुढील रचनात्मक कामाची दिशा ठरली. १९४२ च्या सुरुवातीला हिंदी प्रसारासाठी म्हणून विनोबाने दक्षिण भारताच्या प्रवासात असल्यामुळे जानेवारीतील काँग्रेस समितीच्या अधिवेशनास आणि फेब्रुवारीतील गोसेवा संमेलनास विनोबा हजर राहू शकले नव्हते. क्रिप्स मिशनचा अहवाल फेटाळल्यानंतर इंग्रजांविरुद्ध संघर्ष उभा करण्याशिवाय पर्याय नव्हता. ''देवाच्या भरवशावर सोडून ब्रिटीशांनी भारत सोडून जावा...'' असे आवाहन इंग्रजांना म. गांधींनी 'हरिजन'मधून केले होते. जून १९४२च्या काँग्रेस महासमितीची महत्त्वाची बैठक सेवाग्राम येथे झाली. त्यातच ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील बैठकीत 'करा किंवा मरा' अशा तीव्र संघर्षाला मान्यता मिळाली आणि म. गांधींनी ९ ऑगस्ट १९४२ रोजीचा आदेश ब्रिटिशाना दिला. हे आंदोलन यशस्वी होण्यासाठी म. गांधींनी सांगोपांग विचार करून कार्यक्रम ठरविला होता.

जेलमध्ये गेल्यानंतर एक प्रदीर्घ उपोषणाचा विचारही त्यांनी बोलून दाखवला होता. पवनार आश्रमात विनोबा शांतपणे आपल्या दैनंदिन कार्यक्रमात व्यस्त होते. सुरुवातीला त्यांना अटक करून नागपूरहून दक्षिण भारतात वेल्लोर येथील जेलमध्ये पाठविण्यात आले. पवनार, नाळवाडी, गोपुरी येथील आश्रमाना सील करण्यात आले. रामकृष्ण बजाज आणि इतरांवर राष्ट्रद्रोहाचा आरोप लावून अटक करण्यात आली. परंतु पुढे विनोबावरील आरोप सिद्ध न झाल्याने त्यांना सोडून देण्यात आले.

अटके दरम्यान म. गांधींना पुण्यातील आगाखान पॅलेसमध्येआणण्यात आले. येथून म. गांधींनी ब्रिटिश शासनाशी थेट पत्रव्यवहार केला, ज्यामुळे त्यांचा उपोषणाचा पूर्ण नियोजित कार्यक्रम लांबणीवर पडला. वेल्लोरला जेलमध्ये दाखल झाल्याबरोबर जेलरला विनोबा म्हणाले, ''मी आज तर जेवण घेतले परंतु उद्यापासून मात्र मी बेमुदंत उपोषण करणार आहे. कारण अटक झाल्याबरोबर म. गांधी उपोषण करणार आहे म्हणून मी पण बेमुदत उपोषणाला बसणार आहे.''

वेल्लोर जेलमधील विनोबाची महत्त्वाची उपलब्धी म्हणजे तामीळ, तेलगु आणि मल्याळी भाषाचा अभ्यास. डॉ. भारतन् कुमारप्पा त्यांना या भाषा शिकवीत असत. या मोबदल्यात विनोबांनी डॉ. भारतन् यांना तुलसी रामायण शिकवीले. या शिवाय सुतकताई आणि गीतेवरील प्रवचने हा या काळातील विनोबाचा दिनक्रम होता. याच काळात दक्षिण भारतीय भाषा-लिपी आणि देवनागरी लिपी यांचा संबंध निर्माण करणारी लोक नागरीलिपी विनोबांनी तयार केली. त्यांच्या मते टाईप रायटर आणि टेली प्रिंटर साठी ही लिपी सोयीचीआहे.

वेल्लोर जेलमध्ये एका साम्यवादी कार्यकर्त्याने विनोबांना साम्यवादी साहित्याचे वाचन करण्यास सुचवले. विनोबा म्हणाले, ठीक आहे. मी जेव्हा चरख्यावर सूत कातण्यासाठी बसेन त्यावेळी तुम्ही वाचायचे आणि मी ऐकायचे. अनेक दिवस कधी एक तास दोन तास हा कार्यक्रम चालू राहिला. एका वर्षानंतर विनोबा आणि इतर राजकीय कैद्यांना वेल्लोरहून मध्यप्रदेशात सिवनी येथे हलविण्यात आले. सिवनी येथील जेलमध्ये विनोबांनी जवळजवळ १५ महिनेकाढले. येथील वास्तव्यात 'स्थितप्रज्ञ दर्शन' या विषयावर त्यांनी १८ व्याख्याने दिली. गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञ लक्षणाच्या १८ श्लोकावर ही व्याख्याने होती. त्याचे फ्रेंच, इंग्रजी रुपांतर 'स्टेड फास्ट विसडम' या नावाने प्रसिद्ध झाले.

मे १९४४ मध्ये विनोबांचीसुटका झाली. सिवनीहून विनोबा थेट वर्ध्याला पोहोचले. गोपूरी आश्रमातून त्यांनी पुन्हा आपल्या कामाला सुरुवात केली. येथे त्यांनी सर्वोदयी तत्त्वाचा प्रयोग म्हणून सामुहिक भोजनालय सुरू केले. व कालातंराने विनोबा पवनारात परतले. याच काळात म. गांधींनी प्रचलित राजकारणातील भूमिका

ठरविण्यासाठी दिल्ली, सिमला येथे बैठका आयोजित केल्या होत्या, मात्र विनोबांनी आश्रम सोडायचा नाही असे ठरविले होते. आश्रमाची गरज भागविण्यासाठी पैसा न वापरता आश्रमाला कसे स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण करता येईल याचाच ध्यास त्यांना लागला होता. यातून त्यांना हे दाखवून द्यायचे होते की भारतातील खेडी स्वयंपूर्ण आणि स्वावलंबी झाली की भारताचे सर्व प्रश्न आपोआपच सुटतील. गावाच्या समस्या गावातच सुटतील तेव्हाच खेडी खऱ्या अर्थाने स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होतील. अशा वेळी शासनाचीही गरज भासणार नाही. यासाठी विनोबा प्रयत्नशील होते.

नोव्हेंबर १९४५ ते मे १९४६ या काळात विनोबांनी आपला धाकटा भाऊ शिवाजीच्या मदतीने गीताईच्या अभ्यासासाठी गीताई शब्दकोशाची निर्मिती केली. पवनार येथील आश्रमात बाबूराव देशमुखांनी वयाच्या पन्नासाव्या वर्षी इच्छा व्यक्त केली की उर्वरीत आयुष्य रचनात्मक कामासाठी देण्याची आहे. तेव्हा विनोबांनी त्यांना वानप्रस्थाश्रमाची विधीवत दीक्षा दिली. यातूनच अनेक कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळालेआणि त्यांनी रचनात्मक कार्यासाठी वानप्रस्थानाचा आनंदाने स्वीकार केला होता. या काळातील विनोबाचे ही दोन्ही कामे रचनात्मक कार्याच्या दृष्टीने मोलाची ठरली.

इकडे राष्ट्रीय पातळीवरील घटनाना वेग आला होता. १९४२ ला बंद पडलेले 'हरिजन' फेब्रुवारी १९४६ पासून पुन्हा सुरु झाले. मार्च १९४६ ब्रिटनचे पंतप्रधान ॲटली यांनी भारतीय स्वातंत्र्याबाबत संसदेत घोषणा केली. कॅबिनेट मिशन आणि व्हाईसरॉयने हंगामी मंत्रीमंडळाची घोषणा केली. मुस्लिम लीगने प्रत्यक्ष कार्यवाही दिनाची घोषणा करून गोंधळात भर घातली. त्यामुळे शेवटी २० फेब्रुवारी १९४७ रोजी पुन्हा एकदा पंतप्रधान ॲटली यांनी घोषणा केली की ब्रिटिश सरकार जून १९४८ पूर्वी भारत सोडील. म. गांधी बादशहाखान, पुरुषोत्तमदास टंडन इत्यादीच्या विरोधाला न जुमानता कॉंग्रेस महासमितीने विभाजनाला मान्यता दिली व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी सुद्धा विनोबा आपल्या आश्रमात नेहमीप्रमाणेच आपल्या कामात मग्न होते. वर्ध्याच्या काही संस्थांनी त्यांना सायंकाळी व्याख्यानाला बोलावले, तेव्हा विनोबांनी प्रश्न केला, ''स्वराज्य मिळाले? ब्रिटिशाचा ध्वज एक दिवसही सहन होणार नाही का?'' तेव्हा साहजिकच सर्वांनी नकारार्थी मान हलविली. तेव्हा विनोबा उद्‌गारले, ''ज्याप्रमाणे जुना ध्वज जुन्या सरकारचे चिन्ह आहे त्याचप्रमाणे जुनी शिक्षण पद्धती चालू ठेवल्याने जुने सरकार चालू ठेवण्यासारखे आहे, म्हणून ही शिक्षण पद्धती त्वरीत बदला. म. गांधींनी

राष्ट्रासाठी 'नइ तालीम' ही योजना पूर्वीच तयार केली आहे. आपण त्याचा स्वीकार का करीत नाही? माझ्या हातात सत्ता असती तर स्वराज्य प्राप्तीच्या आनंदासाठी मुलांना तीन महिन्याची सुट्टी दिली असती. त्यांना खूप खेळायला सांगितले असते. प्रकृती सुदृढ करण्यास सांगितले असते. आई वडिलांना त्यांच्या कामात मदत करायला सांगितले असते. या दरम्यान देशातल्या शिक्षणतज्ज्ञाकडून तीन महिन्यात नवी शिक्षण योजना तयार करवून घेतली असती, म्हणजे मुले तीन महिन्याच्या सुट्टीनंतर परतली की नव्या धोरणानुसार त्यांचे शिक्षण सुरू करणे सोपे झाले असते.''

**वडिलांचे निधन:** ऑक्टोबर १९४७ मध्ये विनोबांचे वडील आजारी पडले. विनोबांच्या आईच्या मृत्युनंतर ३० वर्षे त्यांचे वडील एकटेच बडोद्यास राहत होते. या काळात त्यांनी स्वत:ची कामे स्वत:च केली होती. याही वयात ते त्यांच्या आवडीच्या रंगछपाई इत्यादीवर संशोधन करीतच होते. संगीताची त्यांना साथ होती. आजार वाढला तेव्हा शिवाजी-धाकटा मुलगा त्यांना धुळ्यास घेऊन आला. मित्राच्या आग्रहावरून तब्बल १२ वर्षानंतर विनोबा वडीलांना भेटण्यासाठी धुळ्यास गेले. दुसऱ्याच दिवशी विनोबांच्या वडीलांचे निधन झाले.

प्रकृती अस्वास्थामुळे वडीलांच्या मृत्यूनंतरही विनोबा धुळ्यातच राहिले. तेथे त्यांनी गीतेवर प्रवचने दिली. प्रकृतीस आराम पडताच विनोबा पवनारला परतले. विभाजनामुळे देशात जी परिस्थिती निर्माण झालीहोती, त्याबाबत विनोबांनी 'हरिजन'मध्ये काही लिहावे अशी इच्छा व्यक्त केली होती म्हणून १६-२-१९४७ च्या 'हरिजन'च्या अंकात ''बाधा कहा है?'' (अडचण कोठे आहे?) हा लेख लिहिला. त्याकाळात मुंबई आणि अलाहाबाद येथे जातीय दंगलीमुळे कपड्यांच्या गिरण्यातील उत्पादन घटले होते. त्यामुळे कापड पुरवठ्यात शासनाने कपात सुचविली होती. विनोबांनी शासनाच्या या भूमिकेची कडक शब्दात टीका केली होती. 'पैसा नव्हे अन्न हवे' या लेखातून विनोबांनी ग्रामीण भागातील शेती आणि ग्रामोद्योग कसे वाढतील याचे अर्थशास्त्र समजावून सांगितले. तसेच शेतकऱ्यासाठी जोडधंदा म्हणून गोसंवर्धन योजना सविस्तर सांगितलीहोती. या लेखात विनोबा पुढे म्हणतात-

''दूधाचे उत्पादन वाढवण्यासाठी बाहेरच्या देशातून चांगल्या जातीच्या अधिक दूध देणाऱ्या गायी आयात कराव्यात असे सुचवले जाते. माझ्या मते याची गरज नसून आपण देशी गाईनाच प्राधान्य द्यावे. शेतकऱ्याकडे ज्या गायी आहेत त्याचीच निगा राखण्याचे त्यांना सांगितले पाहिजे. गाय दूध आणि शेतीसाठी बैल देते. दूधाबरोबर शेतीसाठी बलवान बैल या मुद्याचाही विचार व्हावा. शहराना दूध

पुरविण्याची गावाची जबाबदारी नाही. गावाची गरज भागल्यानंतरच उरलेले दूध शहरात पाठवावे. तसेच गोपालन, बैलघाणी (तेल उत्पादन) कातडी कमावणे आणि चांगल्या प्रतीचे खत तयार करणे ह्या सर्व बाबी उत्पादनाच्या एकाच अवस्थेत येतात. ग्रामोद्योगावर जास्तीत जास्त भर देण्यात आला पाहिजे.''

**हे राम :** १० जुलै १९४८ च्या बिर्ला हाऊसच्या एका बैठकीत म. गांधी विभाजनाबाबत म्हणाले होते, ''विनोबा दिल्लीस आले असते तर बरे झाले असते.'' पण विनोबा आणि म. गांधी यांची भेट व्हायची नव्हती. ३० जाने. १९४८ रोजी सायंकाळी गांधीची हत्या झाली. बातमी ऐकताच विनोबा सुन्न झाले. त्यांचा आवडता गुरू, सखा, मार्गदर्शक, आई नंतरची प्रिय व्यक्ती गमावल्याने विनोबांच्या दु:खाला सीमाच उरली नाही. ३१ जाने. १९४८ ते १२ फेब्रु. १९४८ पर्यंत सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी आपले मनोगत व्यक्त करण्यास विनोबा तयार झाले. पहिले प्रवचन परंधाम आश्रम पवनार येथे तर बाकीची सर्व प्रवचने गोपुरी वर्धा येथे झाली. आपल्या पहिल्याच प्रवचनात विनोबांनी ३० जानेवारी १९४८च्या घटनेची तुलना ५००० वर्षांपूर्वी घडलेल्या एका घटनेशी केली. जेव्हा एका व्याधाने हरिण समजून कृष्णाला बाण मारला. व्याधाला जेव्हा आपली चूक समजली तेव्हा त्याचेच सांत्वन करताना श्रीकृष्णाने म्हटले होते, 'मृत्यू कोणत्यातरी निमित्ताने होतोच, माझ्या मृत्यूस तू निमित्त झालास बस इतकेच?'' त्या वेड्या युवकाने गांधीजींवर गोळ्या झाडल्या तोही त्या व्याधाप्रमाणे अज्ञानी होता. पुढे विनोबा म्हणतात, ''जगात हिंदु धर्माचे नाव जर कुणी उज्ज्वल केले असेल तर ते म. गांधीनी. त्यांना हिंदु धर्माचा शत्रू समजणे सत्याचे विडंबन होय. त्यांच्या मृत्यूवर शोक करता कामा नये, कारण प्रार्थनेला जाताना म्हणजे तेव्हा गांधींचे मन ईश्वरमय झाले होते म्हणून त्यांचा मृत्यु भव्य समजला पाहिजे. अल्बर्ट आईन्स्टाईनचे मत याच प्रकारचे आहे. ''गांधींचा मृत्यु हा त्याचा सर्वात मोठा विजय आहे, म्हणून त्यांच्या मृत्यूचे दु:ख उगाळत बसण्याऐवजी सर्वांनी एकत्र येऊन गांधींच्या तत्त्वाप्रमाणे रचनात्मक कार्याला पुढे नेले पाहिजे.''

३ फेब्रुवारी १९४८ च्या व्याख्यानात विनोबा म्हणतात, ''गांधीनी जवळ जवळ १५ वर्षे वर्धा आणि सेवाग्राम येथे वास्तव्याला होते म्हणून गांधीच्या आत्म्यास क्लेश पोहोचतील असे कोणतेही काम आपण करता कामा नये. ११ फेब्रुवारी १९४८ रोजी जमनालाल बजाज यांची ७ वी पुण्यतिथी होती. १९४२ ला जमनालाल बजाजाचा अंत्यविधीगोपुरी येथे गांधी विनोबा यांच्या उपस्थितीत झाला होता. सहा वर्षानंतर त्याच दिवशी म. गांधीच्या अस्थी आश्रमात आणण्यात आल्या. त्या निमित्त विनोबा म्हणाले, ''जमनालाल बजाज गांधींच्या शिकवणुकीत तयार

झालेले खरे ट्रस्टी होते. त्यानी ज्या आस्थेने समाजाची सेवा केली तीच भावना आपण जपावी.''

१२ फेब्रुवारी १९४८ रोजी म. गांधींच्या अस्थी पवनार येथील धाम नदीत विसर्जित करण्यात आल्या. यावेळी विनोबांनी आपली भावना व्यक्त करीत म्हटले, ''एक पवित्र आत्मा परमात्म्यात लीन झाला. जो विचार गांधींच्या हृदयात असे तोच विचार आमच्या हृदयात प्रवेश करीत आहे. भविष्यात त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करावयाचा आहे.''

म. गांधींच्या निधनानंतर राजकीय परिस्थितीबरोबरच एकूण देशातील परिस्थितीचा विचार करण्यासाठी देशातील प्रमुख राजकीय आणि रचनात्मक कार्यकर्त्यांची एक परिषद ११ मार्च ते १४ मार्च १९४८ या काळात सेवाग्राम येथे बोलावण्यात आली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद या परिषदेचे अध्यक्ष होते. पं. नेहरू, अब्दुल कलाम आझाद, आचार्य कृपलानी, विनोबा, शंकरराव देव, काकासाहेब कालेलकर, जयप्रकाश नारायण, देवदास गांधी, किशोरीलाल मश्रुवाला, रंगनाथ दिवाकर, राजकुमारी अमृतकौर आदी महनीय व्यक्ती यावेळी हजर होत्या. त्याचप्रमाणे ओरिसा , मध्यप्रदेशचे राज्यपाल, मद्रास ओरिसा आणि मुंबई प्रांतांचे मुख्यमंत्रीही या चर्चेत सहभागी झाले होते.

परिषदेचे प्रास्ताविक करताना रघुनाथ धोत्रे यांनी सांगितले की, ''परिषदेच्या आयोजनाचा मुख्य हेतू वर्तमान परिस्थितीत काम करावे याचा विचार करण्याचा असून गांधीजींनी आपल्या मृत्यूपूर्वी लोक सेवक संघाचा पर्याय सुचवला होता, कार्यकर्तेही याचा विचार करू लागले होते. अहिंसेची शक्ती कशी वाढवावी हीच प्रमुख समस्या आहे.'' १३ मार्च रोजी नेहरूंनीही देशातील विविध रचनात्मक कार्य करणाऱ्या संघटनाशी कॉंग्रेसला संबंध टिकवून ठेवायचे आहे असे मत व्यक्त केले.''

विनोबांनी हलक्या स्वरात सुरुवात केली, ''माझ्या दृष्टीने नेहरू पंतप्रधान नसून ते गांधी कुटुंबाचे सभासद आहेत. नेहरूंच्या समस्या दूर करण्यासाठी आम्ही कोणत्या प्रकारची मदत करावी याबाबत त्यांचेच मार्गदर्शन आम्हाला हवे आहे.''

आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, ''गांधींनी आमच्यासमोर सतत अहिंसेचा मार्ग ठेवला आहे. त्यांची साधन शुचिता संकल्पना फक्त भारतासाठीच नव्हेतर संपूर्ण जगाला मार्गदर्शक ठरणारी आहे.'' शेवटी डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणाले, ''आपण मानवी मूल्याचे रक्षण करावे आपल्या ज्या नैतिक व आध्यात्मिक समस्या आहे याचे उत्तर आपण शोधले पाहिजे.'' यानंतर डॉ. राजेंद्र

प्रसाद यांनी अध्यक्षीय समारोपानंतर विनोबांनी परिषदेला पुन्हा एकदा मार्गदर्शन करावे अशी विनंती केली. तेव्हा विनोबा ठामपणे म्हणाले, ''मी फारसे काही सांगू शकेल असे नाही. पण गांधीजीबरोबर अनेक दिवस राहिल्यामुळे त्यांचा नम्र सेवक म्हणून एवढीच माझी पात्रता आहे. आपल्या सर्व प्रश्नांचा मध्यबिंदु साधन शुचिता असून त्याबाबत पं. नेहरूंनीच याबाबत जास्त मार्गदर्शन करावे असे मला वाटते.''

**सर्वोदय समाज:** विनोबांच्या आवाहनानंतर नेहरूनीही साधन हे साध्याप्रमाणेच शुद्ध असावे असे मत मांडले. त्यासाठी ह्या परिषदेत होणारे निर्णय मात्र मान्य असतील. नेहरू दिल्लीला परतल्यानंतर १४ मार्च १९४८ रोजी विनोबांनी परिषदेत 'सर्वोदयी समाज' स्थापनेचा विचार मांडला. साधनशुचितेवर विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यात बंधुभाव वाढीस लावणे हा एक प्रमुख उद्देश या मागे होता. विनोबा पुढे म्हणाले, ''सर्वोदय समाज ही संघटना नियमोपनियमात बंदिस्त न राहता समाज व्यवस्थेल्या मूलभूत तत्त्वाशी त्याचा सबंध असेल.'' विचार विनीमयानंवर परिषदेने खालील प्रमाणे प्रस्ताव तयार केला.

गांधीजींच्या सिद्धांतावर विश्वास असणाऱ्यांनी बंधुभाव निर्मितीचा निश्चय केला असून ही एक व्यापक संघटना असेल

संघटेनेचे नाव : सर्वोदय समाज

मुलभूत सिद्धांत :साध्याप्रमाणेच या संघटनेची साधने शूद्ध असतील

उद्देश : सत्य आणि अहिंसेवर आधारित समाज निर्मितीसाठी प्रयत्न करणे.

पहिल्या समितीत खालील मान्यवरांचा समावेश होता. रघुनाथराव धोत्रे, सुशीला पै, धीरेंद्र मुजुमदार, एफ. सत्यनारायण, रामदेव ठाकूर, ए वेदरलाम्, पिल्ले, मनमोहन चौधरी, तिमप्पा नाईक, महेशदत्त मिश्रा, काशिनाथ त्रिवेदी आणि श्रीमन्नारायण.

या समितीचे काम म्हणजे सर्व समाजसेवकाची यादी तयार करणे. ३० जानेवारी रोजी होणाऱ्या वार्षिक संमेलनाचे स्थळ निश्चित करणे. संमेलनाची तयारी करणे आणि संमेलनात मान्य झालेल्या ठरावाच्या अंमलबजावणीचा प्रयत्न करणेइत्यादी कामे या समितीकडे सोपविण्यात आली होती.

याचवेळी रचनात्मक कार्य करणाऱ्या सर्व संघटना एकत्रित करून त्यांची एक संयुक्त समिती बनवावी. यासाठी प्रा. जे. सी. कुमारप्पा यांना आवश्यक ती कार्यवाही करण्यास सांगण्यात आले. यातूनच पुढे सर्व सेवा संघाची एक संयुक्त संघटना बनविण्याचे ठरले. कालांतराने सर्व रचनात्मक कार्य करणाऱ्या सर्व संघटनाचे विलीनकरण सर्व सेवा संघात झाले. असे असले तरी मूळ उद्देश सफल होत नव्हता म्हणून ११ एप्रिल १९४८च्या 'हरिजन'मध्ये विनोबांनी 'सर्वोदय का

प्रारंभ' या नावाचा एक लेख लिहिला होता. विनोबा लिहितात, ''अलीकडे रचनात्मक कार्य करणाऱ्या संघटना स्वतंत्रपणे एकमेकांपासून स्वतंत्र काम करताना दिसतात, त्याच्यात काही बाबतीत सहकार्य असले तरी मात्र त्यातून अहिंसक प्रभाव पडताना दिसत नाही. त्यासाठी कार्यकर्त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील कार्यक्रमाचेही एकीकरण व्हावे यासाठी प्रत्येकांनी खालील सात बाबींचा अवलंब करावा.

१) प्रत्येक कार्यकर्त्याने दररोज सुत कातावे.
२ त्याने खादी विशेषत: स्वत; कातलेल्या खादीच्या वस्त्राचा वापर करावा.
३) ग्रामोद्योगातीलच वस्तू वापराव्या.
४) गायीचेच दूध घ्यावे.
५) महिन्यातून एकदा ग्राम सफाई व मैला सफाईचे काम करावे
६) शक्य असेल तर आपल्या मुलांना 'बुनियादी तालीम' द्यावी.
७) कार्यकर्त्याने देवनागरी, उर्दू, कोणतीही एक दक्षिण भारतीय भाषा शिकण्याचा प्रयत्न करावा.

सर्वोदय समाजाचे पहिले अधिवेशन मध्यप्रदेशात इंदोर जवळ राऊ येथे पार पडले होते. पूर्वीच ठरल्याप्रमाणे सर्वोदय समाजाचे दुसरे अधिवेशन एप्रिल १९५० मध्ये ओरिसात अनगल या ठिकाणी झाले. काही कारणाने विनोबा या अधिवेशनाला हजर राहू शकले नाही. तिसरे अधिवेशन हैदराबादपासून चार मैलावर शिवरामपल्ली येथे एप्रिल १९५१ मध्ये घेण्याचे ठरले. ६ मार्च रोजी सर्व सेवा संघाची बैठक असल्यामुळे या अधिवेशनाला येण्याची इच्छा नव्हती. परंतु सर्व सेवा संघाच्या बैठकी दरम्यान शंकरराव देव यांनी या अधिवेशनाला येण्याचा खूप आग्रह केला. 'सर्वोदय समाज' ही विनोबाचीच निर्मिती असल्यामुळे, 'तुमच्याशिवाय अधिवेशनाचा हेतू साध्य होणार नाही, नसता अधिवेशन रद्द करण्यात येईल.' असे शंकरराव देव म्हणाले,. शंकरराव देवाच्या विनंतीला मान देऊन विनोबांनी अधिवेशनाला पायीच जाण्याचे ठरले.

विनोबांनी ८ मार्चला पवनार आश्रम सोडला. सोबत महादेवीताई, श्रीमन्नारायण यांच्या पत्नी मदालसादेवी आणि सचीव दामोदरदास मूंदडा, दत्तोबा दास्ताने आणि भाऊ पानसे होते. या पूर्ण पदयात्रेत त्यांचे सामान एका बैलगाडीत होते. या पदयात्रेत विनोबा दररोज १० ते १२ मैल चालत. प्रवासात येणाऱ्या गावात सकाळी जात. गावकऱ्यांच्या समस्या ऐकत. सायंकाळी पाच वाजता सामुहिक प्रार्थना व नंतर गीतेवर प्रवचन देत. गावकऱ्यांना स्वावलंबनाचा धडा मात्र विनोबा आवर्जून देत. या यात्रेतील प्रवचनाचे एक पुस्तक 'सर्वोदय यात्रा' वर्धा येथील भारत जैन महामंडळाने प्रकाशित केले होते.

३१५ मैलाचा प्रवास करून सर्वोदय संमेलनाच्या एक दिवस आधी म्हणजे ७ एप्रिल रोजी विनोबा शिवरामपल्ली येथे पोहोचले. या अधिवेशनाला विनोबाच्या जीवनात फार महत्त्वाचे स्थान आहे. कारण या अधिवेशनानंतरच्या घटनामुळे भूदान यज्ञाची सुरुवात केली.

❒

# भूदान

शिवरामपल्ली येथील सर्वोदय समाजाचे अधिवेशन संपल्यानंतर तेलंगणातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी विनोबांनी १५ एप्रिल १९४१ रोजी पदयात्रा सुरू केली. शासनाने देऊ केलेले पोलीस संरक्षण नाकारून विनोबांनी रस्त्यात असणाऱ्या तुरुंगातील कम्युनिस्ट पुढाऱ्यांना भेटण्याची परवानगी मिळविली. दोन तास त्यांच्याशी चर्चा केली. चर्चेअंती विनोबांनी कम्युनिस्ट पुढाऱ्यांना समजावले की, ''आपली समतेची मागणी सर्वांना मान्य असली तरी कोणताही समाज आजपर्यंत तो दावा पूर्ण करू शकलेला नाही, आणि तो केव्हा पूर्ण होईल याचा भरवसाही नाही, पण यासाठी आपला जो हिंसेचा मार्ग आहे तो आपण थांबवावा.''

१८ एप्रिलला विनोबा पोचमपल्ली या गावी पोहोचले. हे गाव कम्युनिस्ट चळवळीचे केंद्र समजले जाई. गावात गेल्याबरोबर गावातील ४० दलितांनी त्यांना प्रार्थना केली की, ''जर आम्हाला थोडीसी जमीन मिळाली तर आमचा उदरनिर्वाह चालू शकेल.'' काही काळ विनोबा अस्वस्थ झाले. त्यांच्या दु:खाचे निवारण कसे होईल? शासनाकडून जमीन मिळवून द्यावी, असाही विचार क्षणभर त्यांच्या मनात आला. पण दुसऱ्याच क्षणी त्यांना त्यांच्यासमोर असणाऱ्या श्रोत्यांनाच आवाहन केले की या श्रोत्यात कोण असा व्यक्ती आहे जो या दलिताची गरज पूर्ण करू शकेल? असा प्रश्न विनोबांनी करताच एक तरुण उभा राहिला आणि हात जोडून विनोबांना म्हणाला, ''मी शंभर एकर देण्यास तयार आहे.'' त्या तरुणाचे नाव होते रामचंद्र रेड्डी. सायंकाळाच्या सभेत विनोबांनी सद्गतीत होत पहिल्या भूदानाची घोषणा केली. या घटनेविषयी विनोबा सांगत, ''मी जमीन मागितली आणि मला जमीन मिळाली यात मला ईश्वरी संकेत आढळून आला. त्या दिवशी मी झोपू शकलो नाही, पण ईश्वराकडून मला संकेत

मिळाला, अहिंसा मूलक श्रद्धा असेल तर तुला संधी मिळाली आहे तू मागत जा तुला जमीन मिळेल, माझ्या लक्षात आले की देवाचे काम अपूर्ण नसते तो बाळाच्या पोटात भूक तर आईजवळ दूध देतो, जो मला दान मागण्याची प्रेरणा देतो तो इतराना मला दान देण्याची प्रेरणा देईल.''

विनोबा पुढे म्हणतात, ''हवा, पाणी, प्रकाशाची निर्मिती ज्याप्रमाणे देवाने केली आणि त्यावर जसा सर्वांचाच अधिकार आहे, त्याचप्रमाणे ही जमीनही देवानेच निर्माण केलेली आहे, ती आपणा सर्वांची माता आहे. आपण तिचे मालक होऊ शकत नाही, म्हणून भूमिसमस्या सोडवण्यासाठी सर्वांनी सहभागी व्हावे, ही एक जागतिक समस्या आहे. भूदान यज्ञ भारतीय संस्कृतीला अनुसरून आहे.''

पुन्हा एकदा विनोबा प्रकाश झोतात आले. पं. नेहरूंनी लोकसभेत विनोबांचा गौरव करताना म्हटले, ''एका किरकोळ प्रवृत्तीच्या माणसाने तेलंगणात अहिंसेच्या जोरावर शांती आणि व्यवस्था निर्माण केली जे पोलिसांनाही शक्य झाले नसते.''

न्यूयॉर्क टाईम्सचा विशेष प्रतिनिधी राबर्ट ट्रम्बल यांनी विनोबांचा उल्लेख 'प्रेमाने लुटणारा' आणि 'जमीन वाटप करणारा देव' असा केला तर प्रसिद्ध टाईम मासिकाने 'गांधीचा सच्चा चेला' म्हणून विनोबांचा गौरव केला. राष्ट्रपती राजेंद्रप्रसादांनी ''जीवनाच्या स्वप्नातील समाज निर्मितीची सुरुवात'' असे म्हटले होते. डॉ. राधाकृष्णन् यांनी'राष्ट्रीय प्रतीक' म्हणून विनोबाच्या भूदान चळवळीची महती सांगितली.

तेलंगणाच्या दोन महिन्याच्या पदयात्रेत १२ हजार एकराचे दान मिळाले. तुम्ही पाच भाऊ असाल तर मी सहावा, मी दरिद्री नारायणाचा प्रतिनिधी गरीबांच्या वतीने न्याय्य हक्क मागतो आहे, दान म्हणजे भिक्षा नव्हे, दान म्हणजे सम विभाजन. देशावर संकट आले की यज्ञ करण्याची भारताची परंपरा आहे. आजच्या संकटातून मुक्त होण्यासाठी भूदान यज्ञात जमीन अर्पण करा. लोकांना हे विचार पटत आणि ते जमीनीचे दान करीत. कम्युनिस्टांच्यावतीने शहरात पळून गेलेल्या जमिनदारांना ते सांगत, 'भूमिहीन तुमचेच भाऊ आहेत त्यांना जमीन देऊन त्यांची दु:खे दूर करणे तुमचे काम आहे, तुम्ही त्यांना प्रेमाने आपलेसे करा, तुम्हाला भीतीने शहरात जावे लागणार नाही.'' कम्युनिस्टांना ते म्हणत, ''असे रात्री बेरात्री येऊन काय लुटता माझ्यासारखे दिवसाढवळ्या प्रेमाने लुटायला शिका.'' सरकारच्या सैनिकांना सांगत, 'कम्युनिस्ट काही वाघ नाही. बंदुकीने वाघाची शिकार करता येते, पण कम्युनिस्ट तर चिंतन शूर आहे, त्यांच्याजवळ एक विचार आहे, विचाराचा मुकाबला विचारानेच होऊ शकतो, गरिबांना सांगत, 'कत्तलीने

कधी कुणाचे भले झालं का? अहिंसेने आपला न्याय हक्क मिळवा.''

तेलंगाणाहून पवनाराला परत जाताना विनोबांनी वरोरा येथील आनंदवनात बाबा आमटेंची भेट घेतली. ''कुष्ठरोग्यांच्या जीवनात आनंद निर्माण केला म्हणून 'आनंदवन' हे नाव सार्थ आहे.'' असे मत आनंदवनाबाबत व्यक्त केले. २५ जून १९५१ रोजी विनोबा सेवाग्राममध्ये दाखल झाले. १२ सप्टेंबर १९५१ रोजी विनोबा पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या संदर्भात विचारविनिमयासाठी दिल्लीला रवाना झाले. या पदयात्रेतही विनोबांना पहिल्या सात दिवसात एकशे दहा मैलाच्या पदयात्रेत दोन हजार एकर जमीन मिळाली. २ ऑक्टोबर रोजी विनोबा सागर (मध्यप्रदेश) येथे पोहचले. तेथील एका व्याख्यानात त्यांनी सांगितले की, ''देशात एकूण एक कोटी भूमिहीन आहेत. प्रत्येकाच्या कुटुंबात पाच जण गृहीत धरले तर पाच कोटी जनतेसाठी तितकेच एकर जमीन आवश्यक आहे.'' पुढे उत्तर प्रदेशातून दिल्लीकडे जाताना त्यांनी उत्तर प्रदेशाच्या जनतेच्या भावनेला हात घातला. उत्तर प्रदेशच्या हृदयावर तुलसी रामायणाचीच सत्ता चालते हे ओळखून तुलसीदासाच्या 'सबै भूमि गोपालकी' ह्या वचनाची आठवण त्यांनी जनतेला करून दिली. भूमी समस्या सोडविण्याचे तीनच मार्ग आहेत असे विनोबा सांगत, कत्तल, कायदा, करुणा. कत्तलीचा मदतीने रशिया व चीन या देशांनी जमीनीची समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. अद्यापतरी त्यांना यश मिळाले नाही. प्रतिहिंसा मात्र त्यातून सुरु होते. कायद्याच्या मदतीने हा प्रश्न सोडवल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण होतील म्हणून करुणेच्या मार्गाने जमीनीचे व प्रेमाचे वाटप होऊ शकेल. परिणामी उत्तर प्रदेशाच्या वास्तव्यात त्यांना एकूण एकोणीस हजार एकर जमीन भूदानात मिळाली.

**पहिली पंचवार्षिक योजना:** १३ नोव्हेंबर १९५१ रोजी विनोबा दिल्लीला पोहोचले. दिल्लीत त्यांचा मुक्काम राजघाटावर होता. योजना आयोगाच्या सभासदाशी त्यांनी सतत तीन दिवस चर्चा केली.पण ती चर्चा निष्फळ ठरली.

कारण विनोबांच्या मते पंचवार्षिक योजनेत खालील पाच गोष्टींना प्राधान्य असले पाहिजे.

१) प्रत्येकास काम देण्याची हमी, त्यांचा उदरनिर्वाह व काम या दोन्ही देणारी व्यवस्था नियोजनातून निर्माण व्हावी.

२) अशी व्यवस्था अस्तित्वात येईपर्यंत ग्रामोद्योगाचे अस्तित्व मान्य करून त्याला प्रोत्साहन मिळाले.

३) अन्नधान्याची आयात थांबवून त्या बाबतीत स्वावलंबी होण्यासाठी शेती सुधारणा व्हावी. शेती सुधारणा म्हणजे शेतीचे एकत्रीकरण किंवा शेतीचे

राष्ट्रीयीकरण नव्हे. जमीनीच्या लहान लहान तुकड्यामुळे उत्पादनात वाढ होत नाही हे सिद्ध करून द्यावे लागेल.

४) गोवंश हत्याबंदी अमलात आली पाहिजे.

५) मूलभूत (बुनियादी) शिक्षण पद्धतीचा स्वीकार करण्यात आला पाहिजे.

ज्या काही अपेक्षासह विनोबा दिल्लीला आले होते त्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत म्हणून विनोबांनी पुन्हा आपले लक्ष भूदानाकडे वळविले.

२४ नोव्हेंबर १९५१ रोजी विनोबांनी दिल्ली सोडली व २ डिसेंबर रोजी देवबंद येथे पोहचले. तेथील उलेमानी विनोबांचे कुराणाचे आणि अरबी भाषेचे ज्ञान पाहून तोंडात बोटे घातली. अशातच पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीची धामधुम सुरू झाली. या काळात विनोबांनी एकाच ठिकाणी थांबावे अशी सूचना त्यांना करण्यात आली होती. पण त्यांनी त्याला नकार दिला. मुरादाबाद बालिया मार्गे विनोबा १२ एप्रिल १९५२ रोजी वाराणसीला पोहचले. वाराणसीपासून १४ मैल अंतरावरील सेवापुरी येथे त्यांनी मुक्काम केला. सेवापुरी येथे गांधी आश्रम आणि गांधी स्मारक निधी उत्तर प्रदेशाची शाखा असून त्याच्यातर्फे १३ एप्रिल ते १६ एप्रिल या काळात चौथ्या सर्वोदय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

येथे त्यांनी सर्व सर्वोदयी कार्यकर्त्यांना भूदान कार्यक्रमाबाबत आवाहन केले की, 'आपल्या सर्वांना विनंती आहे की, मी आरंभलेल्या प्रजासूय यज्ञात तुमच्यापैकी प्रत्येकाना आपला वाटा उचलून हे सिद्ध करून दाखवावे की अहिंसात्मक मार्गाने समाजात परिवर्तन घडून आणता येते. परिवर्तनाचा हाच मार्ग योग्य आहे याची तीन कारणे आहेत.

१) हा मार्ग भारतीय परंपरानुरूप आहे. २) यात धार्मिक आणि सामाजिक परिवर्तनाची बीजे आहेत. ३) जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी या मार्गाची मदत होऊ शकते.

**लोहियाची टीका:** भूदानाची लोकप्रियता वाढत असतानाच देशातील काही स्तरावर भूदानाला विरोधही होत होता. विनोबा उत्तर भारतात पदयात्रेवर असतानाच शेतकरी कामगार पक्षाचे नेते उद्धवराव पाटील यांनी भूदानावर व्यावहारिक पातळीवरून टीका केली तेव्हा मात्र विनोबांनी त्याची दखल घ्यावी लागली. लोहियाचे मत होते, ''भूदानाचा कार्यक्रम फार चांगला आहे. पण फार चांगला असला तरी अव्यवहार्य असून तो ३०० वर्षात पूर्ण होईल.'' यावर विनोबांचे उत्तर फारच मार्मिक आहे. ते म्हणतात, ''बाबा सुद्धा करतो. पाच कोटी एकर जमीन मिळवायची आहे. समजा दरसाल एक लाख एकर जमीन मिळाली तर हा कार्यक्रम ५०० वर्षात पूर्ण होईल. आता लोहियाचे म्हणणे आहे, ''हा

कार्यक्रम ३०० वर्षात पूर्ण होईल तेव्हा हे जाहीरच झाले की त्यांची आणि त्यांच्या सहकाऱ्यांची मदत या कामात मिळेल. म्हणून वेळ कमी लागणार आहे.''

सेवापुरी येथील अधिवेशन संपवून विनोबा लखनौला पोहोचले. तो दिवस होता बुद्धपौर्णिमेचा. बुद्धाचा संदर्भ लक्षात घेऊन विनोबांनी म्हटले, ''बुद्ध भगवानाचे धम्म चक्र परिवर्तन' हे परिवर्तनाचे काम मी पुढे चालवीत आहे.

**ग्रामदानाची सुरुवात:** २३ मे १९५२ रोजी विनोबांनी हमीरपुर जिल्ह्यातील इटौलिया गावात प्रवेश केला. भूदान चळवळीतील क्रांतीकारक असा हा दिवस. इटौलियापासून मंगरोठ हे गाव दोन मैलावर. गावातील १०१ एकर जमीन गावकऱ्यांनी भूदानात दिली. तेथील जमीनदार दिवाण शत्रुघ्न सिंहानी सायंकाळच्या सभेत आपली सर्व जमीन दानात देण्याची घोषणा केली. त्यातून ग्रामदान आस्तित्वात आले. मंगरोठ हे देशातील पहिले ग्रामदानी गाव म्हणून ओळखले जाऊ लागले. विनोबाला याचा खूप आनंद झाला. सर्वोदय सिद्धांताप्रमाणे ग्रामरचना अस्तित्वात आणण्यासाठी विनोबांनी बाबा राघवदास आणि इतर कार्यकर्त्यांची नेमणूक केली.

मंगरोठ गावातील एकूण १०७ कुटुंबापैकी फक्त ६५ कुटुंबाकडेच जमीन होती. ग्रामदान घोषणेनंतर गावातील जमीनीची मालकी सर्व गावाकडे आली. सर्वांनी एकत्र काम करून सहकारी भांडाराची सुरुवात करण्यात आली. गावातील दारुचे दुकान बंद करण्यात आले. ग्रामोद्योगामार्फत चप्पल इत्यादी उत्पादन सुरू करण्यात आले.ग्रामीण विकासासाठी स्वतंत्र कोषाची निर्मिती करण्यातआली. दिवाण शत्रुघ्नसिंहाच्या मार्गदर्शनाखाली मंगरोठ या गावाने थोड्याच दिवसात नेत्रदिपक अशी प्रगती केली. गावच्या पूर्ण समस्या सुटल्या नसल्यातरी अहिंसेच्या मार्गाने गावात सामाजिक आर्थिक क्रांती घडवून आणता येते हे सिद्ध झाले. याचा परिणाम असा झाला की थोड्याच काळात एक लाख साठ हजार ग्रामदाने घडून आली.

९ सप्टेंबर १९५२ ला ज्येष्ठ गांधीवादी किशोरीलाल मश्रुवाला यांचा मृत्यू झाला. महात्मा गांधी नंतर 'हरिजन'ची संपूर्ण जबाबदारी किशोरीलालवर होती. 'हरिजन'च्या माध्यमातून भूदान-ग्रामदानाला भरपूर प्रसिद्धी होती. 'हरिजन'च्या माध्यमातून भूदान-ग्रामदानाला भरपूर प्रसिद्धी मिळत होती. ११ सप्टेंबर १९५२ ला विनोबांचा अठ्ठावण्णावा वाढदिवस होता. या दिवशी विनोबांनी जाहीर केले की देशात अहिंसेच्या माध्यमातून जो पर्यंत जमीनीच्या समस्या सुटत नाही तोपर्यंत परंधाम आश्रम पवनारला परत येणार नाही. आणि ते भूदानयात्रेला निघाले. १४ डिसेंबर १९५२ रोजी विनोबानी कर्मनाशा नदीवरील पूल ओलांडून बिहार राज्यात प्रवेश केला. १४ डिसेंबर १९५२ ते ३१ डिसेंबर १९५२ या काळात विनोबा संपूर्ण

बिहार राज्यात फिरले. ''बिहार हा प्रदेश जेथून गौतम बुद्धाने जगाला अहिंसेचा मार्ग दाखविला म्हणून मीही असा निश्चय केला की देशात आर्थिक, सामाजिक क्रांतीचे साधन म्हणून भूदान प्रयोगासाठी प्रयोगशाळा म्हणून बिहार राज्याचा वापर करावा.'' असे विनोबांनी जाहीर केले.

**संपत्तीदान:** २४ ऑक्टोबर १९५२ या दिवशी विनोबांनी संपत्तीदानाची घोषणा केली. त्यांचे मत होते की, ज्यांच्याजवळ जमीन नाही त्यांना या क्रांतीत सहभागी होण्यासाठी त्यांचा उत्पन्नाचा सहावा भाग मागावा व ज्यांची इच्छा असेल त्यांनी तितका भाग घ्यावा. एका आठवड्यानंतर विनोबांनी गया जिल्ह्यात प्रवेश केला. टाटानगर मुक्कामी विनोबांना एकाएकी ताप आला. तो मलेरिया असल्याचे निदान झाले. तरीपण तेथून चालत चालत विनोबा चांडोल येथे पोहोचले. त्यांची प्रकृती अधिक नाजूक झाली. तरीही त्यांनी औषध घेण्यास नकार दिला. पं. नेहरू, राजेंद्रप्रसाद, बिहारचे मुख्यमंत्री श्रीकृष्ण सिन्हा यांच्या आग्रहाखातर त्यांनी एक गोळी घेतली, आणि त्यांना लगेच आराम पडला पण अशक्तपणामुळे चांडोल येथे तीन महिने त्यांना थांबावे लागले. त्यामुळे सर्वोदय समाजाचे पाचवे संमेलन चांडोल येथेच घेण्याचे ठरले. ७, ८, व ९ मार्च १९५३ दरम्यान हे अधिवेशन झाले. या अधिवेशनाला राजेंद्र प्रसाद, दिवाकर, काकासाहेब कालेलकर, जयप्रकास नारायण, जे. सी. कुमारप्पा, शंकरराव देव, धीरेंद्र मुजुमदार इ. हजर होते. ''जनतेत स्वावलंबन शक्ती निर्माण करण्यासाठी स्वावलंबन शक्तीत वाढ करावी'' असेठरले. या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे जयप्रकाश नारायणांनी उर्वरीत आयुष्य भूदानासाठी देण्याचे जाहीर केले.

**श्रमदान :** १२ मार्च १९५३ पासून विनोबा पुन्हा बिहार यात्रेला निघाले. भूदान, ग्रामदानाला आता विनोबांनी श्रमदानाची जोड दिली. दररोज १५ मिनिटे माती खणून विनोबांनी श्रमदानाची सुरुवात केली. दररोज एकेक मिनिटांची वाढ करून दररोज एक तास श्रमदान करण्यास विनोबांनी सुरुवात केली. या कार्यक्रमात गावकरीही मोठ्या संख्येने सहभागी होत. १९ सप्टेंबर १९५३ रोजी संथाल परगण्यात वैद्यनाथाश्रमाचे तीर्थस्थळ असून या मंदिराच्या मंहताने विनोबांना मंदिर भेटीचे निमंत्रण दिले. विनोबाचे विनंती मान्य करीत म्हटले, माझ्याबरोबर दलितही असतील. दुसऱ्या दिवशी विनोबा मंदिरात पोहोचले. तेव्हा 'धर्म की जय हो', 'अधर्मका नाश हो' अशा घोषणा देत काही जणांनी त्यांच्यावर अचानक लाठीहल्ला केला. विनोबासह काहीजण गंभीर जखमी झाले. दर्शन न घेताच विनोबा परतले. विनोबांच्या कानावर जोरदार फटका बसला. त्यांचा तो कान कायमचा अधू झाला. तरीपण कुणालाही शिक्षा करायची नाही असे विनोबांनी जाहीर केले.

अज्ञानातून हे कृत्य घडले असे त्यांनी जाहीर केले. पुढे ते म्हणतात, ''ज्याच्या चरणाचा दास मी म्हणवतो, त्या गांधीप्रमाणेच मलाही या मंदिरात मार खावा लागला याला मी माझे भाग्य समजतो.'' तेथून विनोबा पूर्णिया सरसहा, मुजफरपूरला भेटी देत. १० जानेवारी १९५४ रोजी पाटण्याला पोहचले. येथे त्यांना पाच लाख जमीन भूदानात मिळाली.

**जीवनदान** : १८ ते २० एप्रिल १९५४ दरम्यान बोधगया येथे सहावे सर्वोदय संमेलन घेण्यात आले. विनोबाच्या विनंतीला मान देऊन पं. नेहरू आपले नित्याचे कार्यक्रम बाजूला ठेवून बोधगया येथे पोहोचले. विमानतळावर श्रीमन्नारायण आणि उपराष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांचे स्वागत केले. दोन दिवस बोधगया येथे राहून नेहरू परतले. या संमलेनाचे वैशिष्ठ म्हणजे सेवापुरी येथील सर्वोदय संमेलनात २५ लाख एकर जमीन भूदानात मिळविण्याचे लक्ष या संमेलनापूर्वी ओलांडलेहोते. या संमेलनाचे आणखी एक वैशिष्ट्ये म्हणजे जयप्रकाश नारायण यांनी भूदान कार्यासाठी 'जीवनदान' ही घोषणा होय. या घोषणेमुळे प्रेरीत होऊन विनोबांनी आपले उर्वरित आयुष्य भूदान मूलक ग्रामोद्योग प्रधान अहिंसक क्रांतीसाठी प्रदान केल्याची घोषणा केली. संमेलनाध्यक्ष आशादेवी यांनी विनोबा आणि जयप्रकाशाच्या लिखीत घोषणा वाचून दाखवल्या. संपूर्ण संमेलनात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि कार्यकर्त्यांनीच अधिवेशनात भूदानासाठी जीवनदानाची घोषणा केली.

या प्रसंगाची आठवण म्हणून बोधगया येथे एका आश्रमाची स्थापना करण्याचा निर्णय झाला. या आश्रमातून हिंदू धर्मातील औपनिषदीक तत्त्वज्ञान, बुद्धविचार, यांच्या समन्वयात्मक अभ्यास करण्याची, संशोधन करण्याची व्यवस्था असावी असे ठरले. महत्त्वाचे म्हणेज बोधगया येथील शंकरमठाच्या प्रमुखांनी या आश्रमासाठी पाच एकर जागा देण्याचेही कबूल केले. गौतमबुद्धाच्या महाबोधी वृक्षाजवळ ही जागा आहे. 'समन्वय आश्रम' असे नामकरण या नव्या आश्रमाचे करण्यात आले. आता बोधगया येथील समन्वय आश्रम हा एक नावाजलेला आश्रम म्हणून परिवारात ओळखला जातो. तेथे गांधीविचाराने सर्व साहित्य आणि सर्व साधने अभ्यासकाला उपलब्धं करून दिले जाते.

❐

# बंगाल-ओरिसा-पदयात्रा

बिहारची पदयात्रा संपवून विनोबांनी १-१-१९५५ रोजी बंगालमध्ये प्रवेश केला. ''तुझ्या हातात नव आशा आकांक्षाचे खड्ग आहे'' या रविंद्रनाथांच्या गीताने विनोबांचे स्वागत करण्यात आले. रामकृष्ण परमहंसांनी विष्णुपूर येथे समाधीचा आनंद घेतला. त्याच विष्णुपूरात समाधीचा सामुहिक आनंद घ्यावयाचा आहे असे विनोबांनी जाहीर केले आणि ज्या ठिकाणी विवेकानंदांनी 'दरिद्रीनारायण ' हा शब्द उच्चारला अशा बनसुरीयालाही विनोबा गेले. कारण विवेकानंदांची 'दरिद्री नारायण' ही संकल्पना पुढे गांधीनी पुन्हा मांडलीहोती. कलकत्याच्या आपल्या एका भाषणात विनोबांनी सांगितले की, 'बंगालचा अहिंसक कर्मयोग, जीवनासाठी अत्यावश्यक असतो. त्याला क्रियाशीलतेची जोड आवश्यक असते. असे न झाल्यामुळे येथे हिंसक स्वरूपाची क्रियाशीलता आली. वैष्णवाच्या भक्तीभावाने कार्यसाधत नाही असे दिसल्याबरोबर बंगालचा तरुण हिंसेकडे वळला त्यातून हिंसेचे राज्य आस्तित्वात आले.'

बाकुदा येथील प्रवचनात विनोबांनी 'रचनात्मक श्रद्धा' हा नवा शब्द वापरला. त्याचा संदर्भ अहिंसेशी जोडताना विनोबा म्हणतात, 'अहिंसेचा अर्थ हिंसा न करणे इतकाच होत नाही. त्याचे तीन अर्थ होतात. अहिंसा म्हणजे निर्भयता, अहिंसा म्हणजे प्रेम आणि सहकार्य आणि अहिंसा म्हणजे रचनात्मक कार्यावर विश्वास ठेवणे होय. रचनात्मक कार्याला रचनात्मक कार्यानेच जिंकावे लागेल. यासाठी रचनात्मक श्रद्धा आवश्यक असते. निर्भयता, प्रेमपुण्य सहकार्य व रचनात्मक श्रद्धा या तिन्ही गोष्टी एकत्र आल्याने अहिंसेची शक्ती आपोआप वाढेल.'

२६ जानेवारी १९५५ रोजी ''ज्या भूमीने सम्राट अशोकाला अहिंसेची दिक्षा दिली आणि सम्राट अशोकाने रूपांतर धर्म अशोकात परिवर्तन केले अशा

भूमीत प्रवेश करताना मला अती आनंद होत.'' असे म्हणत ओरिसाच्या भूमीत विनोबांनी प्रवेश केला. २२ फेब्रुवारीला विनोबांच्या ग्रामदानात आणखी एकाची भर पडली. कटक जिल्ह्यातील 'बरी' हे नाव. गोपबंधु चौधरी आणि रमादेवी या दाम्पत्याच्या रचनात्मक कार्याचे केंद्र होते. येथून जवळच मानपूर हे गाव होते. चौधरी दाम्पत्याच्या पुढाकाराने मानपूर हे दुसरे ग्रामदानी गाव ठरले. मानपूर येथील ५७५ एकर जमिनीचे दान व पुनर्वितरण बुद्ध जयंतीचा योग साधून ठेवण्यात येऊन त्याचे व्यवस्थापन सर्वोदय मंडळाकडे सोपविण्यात आले.

२१ मार्च १९५५ रोजी विनोबा जगन्नाथपुरीला पोहचले. २५ मार्च ते २७ मार्च या काळात पुरी येथे सर्वोदय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. २२ मार्च विनोबा जगन्नाथाच्या मंदिरात दर्शनासाठी गेले असता, विनोबासोबत असणाऱ्या फ्रेंच महिलेपुढे पुजाऱ्यांनी विनोबांनाही प्रवेश नाकारला. तेव्हा बाहेरून नमस्कार करून विनोबा परतताना म्हणाले, ''चारशे वर्षांपूर्वी गुरु नानकासोबतही असेच घडले होते. या युगात प्रत्येक राष्ट्र, प्रत्येक धर्माची कसोटी होईल आणि असेच जर आपण स्वत:ला चार भिंतीत बंदिस्त करणार असू तर आपली प्रगती खुंटल्याशिवाय राहणार नाही. व्यापक दृष्टीकोन ही जी हिंदू धर्माची विशेष ओळख आहे तीही संपल्याशिवाय राहणार नाही. आपली मंदिरे आणि धर्मग्रंथ सर्व श्रद्धाशीलांसाठी खुली असावीत, मंदिराचा तुरुंग होता कामा नये.''

१८ एप्रिल १९५५ रोजी भूदान कार्यक्रमाला चार वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्त देशभर विशेष कार्यक्रम व्हावे असे ठरवण्यात आले. या निमित्त सेवाग्राम आश्रमातील आश्रमवासियांनी निश्चय केला की दोन वर्षे सेवाग्राम आश्रम बंद ठेवून सर्व आश्रमवासी देशभरात भूदान-ग्रामदानासाठी खास प्रयत्न करतील. रविशंकर महाराज आणि बाबा राघवदासांनी घोषणा केली की ते गुजराथ आणि उत्तर प्रदेशात भूदान-ग्रामदानाचे कार्य करतील.

विनोबांनी राष्ट्रीय कॉँग्रेसच्या महासभेत यावे अशी इच्छा श्रीमन्नारायण यांनी कॉँग्रेस अध्यक्ष यु. एन. ढेबर आणि पंतप्रधान नेहरू यांचे जवळ व्यक्त केली. त्यासाठी महासभेची बैठक मे १९५५ मध्ये ओरिसात घेण्यात यावी. ज्यामुळे ओरिसात पदयात्रेत असणारे विनोबा महासमितीच्या बैठकीला हजर राहू शकतील. त्यानुसार ओरिसा कॉँग्रेसने गंजाम जिल्ह्यात बरहामपुर येथे कॉँग्रेस महासमितीची बैठक बोलावली. विनोबांनी त्याला त्वरीत मान्यता दिली. या कॉँग्रेस महासमितीच्या बैठकीत विनोबा म्हणाले, ''आपल्या देशातील

शेतजमीनीचे वाटप अन्यायपूर्ण आहे असे सामान्यपणे दिसून येते. माझ्या मते हवा, पाणी आणि सूर्यप्रकाशाप्रमाणे जमीनीची उपलब्धता सर्वांना खुली असावी. शेतजमीनीची व्यक्तिगत मालकी असता कामा नये. ही समस्या शांततेच्या मार्गाने जर सुटत असेल तर आपल्या अहिंसक शक्तीत वाढ होईल. आणि जर आपण जमिनीच्या फेरवाटपाचा पुन्हा प्रयत्न केला तर काही नव्या समस्या निर्माण होतील ही समस्याच सोडवण्याचा विचार मी सद्या करीत आहे...''

११ सप्टेंबर १९५५ रोजी विनोबाच्या षष्ठ्याब्दीपर्यंत कोरापुट येथील ग्रामदानाची संख्या ४६९ झाली. यानिमित्त गुणपूर या गावी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विनोबांनी यावेळी ग्रामदानाचे महत्त्व सांगताना त्याच्या सात मूलभूत उद्देशाचे वर्णन केले १) गरीबी संपवणे २)जमिनीच्या मालकीतून द्वेषाऐवजी स्नेहभावना वाढीस लावणे ३) जमीन वाटपावरून वर्ग विद्वेष संपवून परस्पर सहयोगाची भावना वाढवणे ४) यज्ञ, दान आणि तपावर आधारित भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन करणे, सुदृढ बनवणे ५) श्रमाची प्रतिष्ठा अपरिग्रह, सहकार आणि स्वावलंबनावर आधारित समाज रचना निर्माण करणे ६) देशातील सर्व राजकीय पक्षाना एकाच व्यासपीठावर आणून पक्षिय कटुता दूर करणे ७) जागतिक शांतता निर्माण करण्यास मदत करणे.

कोरापूट जिल्ह्यात विनोबांचा मुक्काम चार महिने होता. त्यांच्या उपस्थितीत ग्रामदानाच्या कार्याला चांगलीत गती मिळाली. ३० सप्टेंबर १९५५ रोजी विनोबांनी ओरिसाची यात्रा संपवली. ज्यावेळी एकट्या कोरापूट जिल्ह्यातील ग्रामदानाची संख्या ८१२ असून भूदानात एकूण दोन लाख सत्तावन्न हजार तीनशे एकर जमीनीचे दान मिळाले होते.

**पुन्हा आंध्रप्रदेश** : २ ऑक्टोबर १९५५ रोजी विनोबांचे चार वर्षानंतर पुन्हा आंध्रात आगमन झाले. आंध्र हे राज्य नव्यानेच निर्माण करण्यात आले होते. पहिल्या तीन महिन्यात विनोबांनी श्रीकाकुलम, विशाखापट्टनम्, पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, कृष्णा आणि गुंडूर जिल्ह्यात पदयात्रा काढली. सेवाग्राम आश्रमाचे जुने कार्यकर्ते श्री. प्रभाकरजी सतत त्यांच्याबरोबर असत. तर प्राध्यापक राम चंद्रराव (गोरा) सहकुटुंब या आंदोलनात सहभागी झाले. गोरा विचाराने नास्तिक असले तरी त्यांचा गांधीच्या विचारावर आणि चळवळीवर विश्वास असल्यामुळे संपूर्ण आंध्र राज्याच्या प्रवासात त्यांनी विनोबाला साथ केली. आपल्या आठ महिन्याच्या काळात विनोबांना ६३ हजार एकर जमीन भूदानात मिळाली. सर्वधर्म समभाव, एकादश व्रते यावर व्याख्याने दिली. मौन

प्रार्थनेचा प्रकारही यावेळी विनोबांनी सुरू केला; मौन ही सर्वोत्तम भाषा आहे. मौन राखून ईश्वराचे ध्यान ही सर्वोत्तम प्रार्थना आहे. सर्वच धर्मात सत्य प्रेम करूणा सांगितली आहे. विनोबांच्या मौनाचा ह्या नव्या उपक्रमाला बरेच यश मिळाले.

१३ मे १९५५ रोजी विनोबांनी तामीळनाडूत प्रवेश केला. एव्हाना विनोबाच्या भूदानाची किर्ती जगभर पसरत चालली होती. परदेशातून लोक भूदान कार्य पाहण्यासाठी येऊ लागलेहोते. विनोबाशी चर्चा करीत एका डच माणसाने गांधीजींचा प्रभाव नष्ट होत चालल्याचे विचारल्याबरोबर विनोबा म्हणाले, 'देशातच नव्हेतर जगात गांधीचा प्रभाव वाढत आहे, कारण भारताने परराष्ट्रीय धोरणात तटस्थता स्वीकारण्यात आली आहे. भूदानाची चर्चा जागतिक पातळीवर होऊ लागली हे सर्व काही गांधीच्या प्रभावाचे लक्षण आहे.' तामीळनाडूतील सात महिन्याच्या पदयात्रेत विनोबा मदुराई, पांडेचेरी, तंजावर, पलानी, कांचीपूरम करीत १६ एप्रिल १९५७ रोजी कन्याकुमारीला पोहोचले. विवेकानंदांनी ज्या शीळेवर बसून ध्यान केले होते, त्याच शिळेवर विनोबांनी प्रतिज्ञा केली, ''भारतात ग्राम स्वराज्याची स्थापना होईपर्यंत माझा संचार चालूच राहील आणि यासाठी सतत काम करीत राहीन. यासाठी हे ईश्वरा मला शक्ती दे.''

१८ एप्रिल, १९५७ ला विनोबांनी केरळ राज्यात प्रवेश केला. केरळचे मुख्यमंत्री नंबुद्रीपाद यांनी त्यांचे स्वागत केले. कम्युनिस्टानी निवडणुकाच्या माध्यमातून सरकार हातात घेणारे केरळ हे जगातील पहिले राज्य ठरले. केरळविषयी बोलताना विनोबा म्हणतात, ''या भागावर राज्य आहे शंकराचार्यांचे ज्यांनी अभेद शिकविला. जेथे अभेद येतो तेथे मानवता विरून जाते. या भागावर राज्य आहे प्रभु येशूच्या शिष्याचे. आपल्यावर जितके प्रेम कराल तितकेच शेजाऱ्यावर करा'' असे सांगून विनोबांनी या प्रदेशात आपले कार्य केले.

**शांतीसेना:** १९३५ साली अपूर्ण राहिलेली विनोबांची इच्छा ७ मे १९५७ ला पूर्ण झाली. वायकोम मंदिर सत्याग्रहाच्या वेळी इच्छा असूनही विनोबा शंकराचार्यांचे जन्मस्थान कालडीला जाऊ शकले नव्हते. या वेळी मात्र ९ व १४ मे १९५७ च्या सर्वोदय संमेलनाच्या निर्मात्याने विनोबा कालडीला गेले. कम्युनिस्टाचा प्रभाव असूनही विनोबांचा संचार राज्यभर अवैध चालू होता. संमेलनाच्या निमीत्याने केलेल्या भाषणात विनोबा म्हणतात, 'ग्रामदानाचा अर्थ आहे साम्ययोग अथवा समविभाग. ग्रामदान म्हणजे व्यक्ती आणि समष्टीचे

पारस्परीक तादात्म्य. ग्रामदानात जमीनीचे मालक जमीन देतील. कामगार श्रम देतो, बुद्धीवंत बुद्धीदान करतात यातूनच समानयुक्त समाज निर्माण होऊ शकेल.' साम्यवाद्यांनाही हेच हवे आहे. केरळातील परिस्थितीचा संदर्भ डोळ्यासमोर ठेवून विनोबा म्हणतात, ''हिंसेचा प्रतिकार करण्यालाही विनोबांनी शांतीसेनेची कल्पना मांडली. शांतीसेना म्हणजे हिंसेचा प्रतिकार करून शांततेसाठी सर्वस्वाचे समर्पण करणारी सेना होय. पाच हजारांच्या सेवेसाठी एक शांती सैनिक असे त्याचे प्रमाण असेल. केलप्पन यांच्या सेनापती पदाखाली कोलीक्कड येथे ११ जुलै १९५७ रोजी शांतीसेनेची स्थापना करण्यात आली. यावेळी विनोबांना म. गांधीजींची आठवण झाली. कारण शांतीसेनेची मूळ कल्पना म. गांधीजींची होती. त्यांच्या आत्म्याने या कार्याला चैतन्य प्राप्त झाले. थोर माणसाच्या आत्म्याचा असा ही उपयोग होतो'' असे विनोबांनी म्हटले होते.

शांतीसैनेची अनिवार्यता सांगताना विनोबा म्हणतात, 'ग्रामसमाजाशिवाय कोणतीच गोष्ट साकार होणार नाही. जसे यु. एस. ए. (युनायटेड स्टेस्ट ऑफ अमेरिका) आहे आणि दुसऱ्या बाजूने यू. एस. एस. आर. (युनायटेड सोविएत सोशॅलिस्ट रिपब्लिक-रशिया) आहे. तसेच आम्हालाही प्रत्येक गावाला सर्वोदय रिपब्लिक बनवायाचे आहे आणि त्यासाठी गावोगाव युनायटेड स्टेटस ऑफ सर्वोदय रिपब्लिक व्हायला हवे. असे केले तरच 'पीस पोटेन्शीयल (शांतीबळ) प्रगट होईल.

बैद्यनाथ धाम, पुरीप्रमाणेच गुरुवायुर मंदिरातही विनोबांना प्रवेश नाकारण्यात आला. म. गांधींनी उपवास करण्याचा निर्धार व्यक्त केल्यामुळे गुरुवायुर मंदिर अगोदरच दलितांना खुले करण्यात आले होते. यावेळी विनोबांबरोबर काही ख्रिश्चन सहकारी होते. त्यांना प्रवेश मिळेल का? असे विनोबांनी नम्रपणे विचारल्यानंतर नकार मिळाला. विनोबांनी दर्शन घ्यावे अशी विनंती विनोबांना करण्यात आली तेव्हा विनोबा म्हणाले, ''माझा नाईलाज आहे. जर माझ्या मित्रांना सोडून मी देवळात गेलो तर मला तेथे देव दिसणार नाही.'' यावरून विनोबांना केरळातील सामान्य नागरिकांचा मोठा पाठिंबा मिळाला.

**ग्रामदान परिषद:** भूदान, ग्रामदान आणि शांतीसेना अशी प्रगती करीत. सर्वोदय समाज कसा असतो, हे कर्नाटकाने दाखवून द्यावे असे आवाहन करीत २४ ऑगस्ट १९५७ला विनोबांनी भूकूर्ग मार्गेकर्नाटकात प्रवेश केला. २१ व २२ सप्टेंबर १९५७ रोजी येलवाल येथे ग्रामदान परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व सेवा संघाच्या निमंत्रणावरून देशातील प्रमुख नेते या परिषदेत सहभागी झाले होते. पं. नेहरू, मोरारजी देसाई, नंबुद्रीपाद, जयप्रकाश नारायण

आणि राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांची उपस्थिती प्रामुख्याने होती.

सामाजिक, आर्थिक प्रश्नाबाबत, विशेषत: जमिनीच्या प्रश्नासंबंधीचे समाधान प्राप्त व्हावे म्हणून कशा प्रकारे अहिंसक पद्धतीने कार्य केले गेले, याची माहिती विनोबांनी दिली. भूदानापासून ग्रामदानापर्यंत झालेल्या प्रगतीचे विवेचन केले. परिषदेला उपस्थितांनी ग्रामदान आंदोलनाचे स्वागत केले. परिषदेला हजर केंद्रीय व राज्य सरकारच्या सदस्यांनी ग्रामदान आंदोलनाला सर्वोपरी सहकार्य देण्याचे आश्वासन दिले. सरकारच्या पंचवार्षिक योजनेलाही या कार्याने मदत होईल. सहकारी विकास खंड योजना आणि ग्रामदान चळवळ यांच्यात घनिष्ट सहकार्य प्रस्थापित्त होणे गरजेचे आहे. असे सर्वात शेवटी प्रतिपादन करण्यात आले.

याच परिषदेने ग्रामदान चळवळीने दोन प्रमुख आक्षेप घेतले जात त्याची उत्तरे विनोबांनी दिली. पहिला आक्षेप भूदान व ग्रामदान आंदोलन गांधींच्या विश्वस्त संकल्पनेच्या विरोधी आहे, कारण यात मालकी हक्काचे विसर्जन आहे. या आक्षेपाला उत्तर देताना विनोबा म्हणतात, ग्रामदानातून प्रत्येकाला जबाबदारीचे शिक्षण मिळणार आहे. दुसरा आक्षेप भूदान ग्रामदानातून जमीनीचे लहान लहान तुकड्यात विभाजन होणार आहे. विनोबा म्हणतात, ''जमिनीच्या तुकड्यापेक्षा मी मानवाच्या मनाच्या तुकड्याची चिंता करतो. मनामनाला जोडणारे हे आंदोलन आहे. माणसाची मने जोडली गेली की आपोआपच जमिनीच्या तुकड्यांची समस्या मिटेल.''

याच काळात संयुक्त कर्नाटक राज्याचा पहिला वर्धापन दिन आला. या निमित्ताने विनोबांनी 'जय जगत' या नव्या मंत्राची घोषणा केली. 'बाबा साऱ्या जगाचे हित चिंतितो' अशी त्यांची यावेळी सर्वांना प्रार्थना होती. सर्वांनी जगाच्या कल्याणार्थ कंबर कसली पाहिजे. येथून पुढे जेथे जेथे विनोबा जात तेथे तेथे जय जगतचाच घोष केला जाई.

**सर्वोदय पात्र:** १ फेब्रुवारी १९५८ रोजी धारवाड येथे विनोबांनी 'सर्वोदय पात्रा'ची संकल्पना मांडली. शांतीसेनेची स्थापना झाल्यापासून विनोबांना शांतीसेनेच्या अस्तित्वाचा प्रश्न भेडसावीत होता. शांतीसेनेचा खर्च कसा भागवायचा? शांतीसेनेच्या कार्यासाठी देणग्या, अनुदानाची कल्पना विनोबांना रुचली नाही. शांतीसेनेचा खर्चही जनतेने स्वच्छेने उचलावा या दृष्टीने विचार करताना विनोबांनी 'सर्वोदय पात्रा'ची कल्पना मांडली. ज्यांचा शांतीसेना विचाराला पाठिंबा आहे अशा कुटुंबाने आपल्या घरी मातीचे वा दुसरे कोणतेही भांडे ठेवावे. त्यात रोज मूठभर धान्य टाकावे आणि शेवटी हे धान्य

सर्वोदयासाठी किंवा शांतीसेनेच्या उपजिविकेसाठी वापरावे असा यामागचा विचार होता. यालाच विनोबा 'संमतीदान'ही म्हणतात. एखाद्या कुटुंबाने सर्वोदय पात्र आपल्या घरी ठेवले म्हणजे त्या कुटुंबाची सर्वोदय संकल्पनेले संमती आहे, तो शांततेचा समर्थक आहे असे गृहीत धरून त्याचे मूठभर धान्य स्वीकारले जाईल. कारण या मूठभर धान्यातून मोठी जनशक्ती निर्माण करता येईल असे विनोबांचे मत होते.

दक्षिण भारताची पदयात्रा संपवून विनोबा निपाणी मार्गे २३ मार्च १९५८ रोजी महाराष्ट्रात पोहचले. यावेळी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन जोमात चालू होते. विनोबांनीही संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाला पाठिंबा द्यावा अशी मागणी जनतेने केली होती. अर्थात यावर विनोबांनी कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. विनोबाचे मत होते, ''मी माझी सर्व शक्ती जमीनेचे प्रश्न सोडविण्यावर खर्च करीन. कोणंत्याही राजकीय वादाच्या भोवऱ्यात मला पडायचे नाही. माझा कोणंत्याही राजकीय संस्था किंवा राजकीय पक्षांशी संबंध नसून विशुद्ध रचनात्मक कार्य करणाऱ्या संघटनेशीही मी संबंधीत नाही तेव्हा जनतेने मात्र इतर वादात गुंतवू नये.''

कोल्हापूर रत्नागिरी जिल्ह्याची पदयात्रा संपवून विनोबा ३० मे १९५८ रोजी पंढरपूरला पोहोचले. विठ्ठल मंदिराच्या विश्वस्तांनी विनोबांना आपल्या सर्व शिष्यास सर्वधर्मियांनी मंदिरास भेट देण्याची विनंती केली. विनोबा आपल्या सर्व सहकाऱ्यासह विठ्ठल मंदिरात गेले. त्यांच्या शिष्यात जर्मन, मुस्लिम, पारसी, आणि काही दलित सभासदांचा समावेश होता. ही फार महत्त्वाची घटना होती. हिंदू धर्माने मंदिर इतर धर्मियांना खुले होते.विनोबा म्हणतात, ''आजचा दिवस माझ्यासाठी भाग्याचा दिवस आहे. या घटनेचा माझ्या मनावर मोठा प्रभाव पडला. आज महाराष्ट्राने मला एक मोठे दान दिले आहे. सर्वोदयाप्रती हे दान फार मोलाचे आहे.'' ३० मे १९५८ रोजी पंढरपुरात सर्वोदय संमेलन सुरू झाले. या संमेलनातील विनोबाचे भाषण खूप गाजले. कारण या भाषणात त्यांनी आंतरराष्ट्रीय प्रश्नावर आपली मते व्यक्त केली. ते म्हणाले, ''अमेरिकेकडे भारतापेक्षा बारापट जमीन आहे. याचा अर्थ जर आमच्या जवळ असणाऱ्या जमीनीपेक्षा बारापट जमीन उपलब्ध झाली तर भौतिकदृष्ट्या आम्ही अमेरिकेची बरोबरी करू शकू. पण आपण एक लक्षात घेतले पाहिजे की हिंसेच्या क्षेत्रात आपण कधीही कोणत्याही बड्या शक्तीची बरोबरी करू शकणार नाही. तेव्हा आपणासमोर दोनच पर्याय आहे पूर्ण अहिंसक होऊन नैतिकतेचा विकास करणे अथवा हिंसेचा अवलंब करून सर्वनाश ओढवणे.''

आपल्या पदयात्रेत विनोबा साहित्यिकांच्या भेटी घेत. औरंगाबाद येथील साहित्यिकांच्या सभेत विनोबा म्हणाले, ''मी साहित्यिक नाही, साहित्यिकांचा भक्त आहे.'' असे म्हणत त्यांनी साहित्यिकांना 'आम्ही घरी' धन शब्दाचीच रत्ने शब्दाचीच शस्त्रे जतन करू.' असे सुचवले. नेवाश्याच्या भेटीत शंकराचार्य, ज्ञानेश्वर आणि गांधी यांचा ऋणयुक्त उल्लेख केला. चाळीसगावच्या सर्वसेवा संघाच्या बैठकीत त्यांची कृपालानीशी भेट झाली. चाळीसगावहून धुळ्याला जाताना जुन्या कारागृहाच्या आठवणी सांगत विनोबांनी अक्राणीमहाला तालुक्याकडे प्रयाण केले. स्वातंत्रदिनाच्या मुहूर्तावर अक्राणी तालुका 'ग्रामदानी' म्हणून घोषित करण्यात आला. देशातील 'अक्राणी' हे पहिले 'तालुकादान' होय. (१५-८-१९५८)

**गुजराथ-राजस्थान:** २२ सप्टेंबर १९५८ रोजी विनोबांनी गुजराथ राज्यात प्रवेश करताना ''म. गांधींच्या दर्शनानेमला जो आनंद होत आहे तोच आनंद मला आज होत आहे.'' असे म्हटले. सुरत, बार्डोली, बेडणि, बडोदा, पंचमहाल खेडा असा त्यांचा मार्ग होता. बेडणि येथील सभेत विनोबा म्हणाले, ''कल्याणकारी राज्याचा अर्थ समाजवाद होऊ शकत नाही. कारण समाजवाद सर्वकाही राज्याच्या सत्तेवर निर्भर असते. सर्वकाही सरकारात केंद्रीत होते आणि सरकारचा प्रमुख आधार असतो. राज्य जोपर्यंत शस्त्र बळावर चालेल तेथे खऱ्या अर्थाने लोकशाही निर्माण होऊ शकत नाही. मी तर निवडणुकीला उभे राहायचे ठरवले तर माझ्या निवडणुकाचा जाहीरनामा असेल १)सशस्त्र सैन्याचे विसर्जन २)भंगी मुक्ती ३)कापड गिरण्याची कायद्याने बंदी. या जाहीरनाम्यावर मला कुणीही मतदान करणार नाही, तरीपण हे मुद्दे महत्त्वाचे आहेत यासाठी लोकमत बनवावे लागेल.''

बडोद्याला विनोबाच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. वयाच्या १०व्या वर्षापासून ते २२ वर्षांपर्यंत विनोबाचे शिक्षण बडोद्यात झाले. त्यांची साधना या ठिकाणी झाली. समविचारी मित्रही त्यांना बडोद्यातच मिळाले. अशा सर्व समविचारी मित्रांचे एक संमेलन विनोबाच्या उपस्थितीत झाले. 'मी मैत्रीचे नाते सर्वश्रेष्ठ मानतो.' असे या प्रसंगात विनोबा म्हणाले. ज्या घरात आईसोबत त्यांनी बालपण घालवले होते त्या घरालाही भेट दिली. बडोद्यानंतर विनोबा खेडा जिल्ह्यात पोहोचले. तेथून भावनगर, राजकोट, जामनगर आणि सुरेंद्रनगरलाही त्यांनी भेटी दिल्या. राजकोट मुक्कामी विनोबांनी म. गांधीजींची मोठी बहीण रलियान बेन उर्फ फईबा यांची भेट घेतली. राजकोटच्या सायंकाळच्या सभेत विनोबांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले की, 'गांधीचे अहिंसक समाजाचे स्वप्न

पूर्ण करण्यासाठी अहिंसक शांतीसेनेची गरज आहे म्हणून शांतीसेनेचे संघटन मजबूत करावे.'

जानेवारी १९५९ मध्ये विनोबांनी राजस्थानच्या पदयात्रेला प्रारंभ केला. राजस्थानविषयी ते म्हणतात, ''राजस्थान शूरभूमी व संताची भूमी आहे. मात्र राजस्थानकडून शांतीसेनेसाठी संख्यायुक्त व गुणयुक्त शांतीसैनिक हवे आहेत. मीराबाईच्या भूमीत जमीनीची समस्या प्रेम, करुणा आणि भक्तीच्या माध्यमातून सुटावी. पण आम्ही भक्तीपासून लांब असल्यामुळे आत्मविश्वास गमावला आहे. हा आत्मविश्वास मिळविण्यासाठी मीराबाईंचा आदर्श स्वीकारावा.'' विनोबा मीराबाईना बंडखोर संत म्हणत.

**जय जगत** : सर्वोदय समाजाचे ११ वे अधिवेशन अजमेर येथे फेब्रुवारी १९६९ मध्ये आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात अध्यक्ष होते केलप्पन. काँग्रेस अध्यक्षा इंदिरा गांधी, मास्टर तारासिंह या संमेलनाला हजर होते. उद्‌घाटनाच्या भाषणात विनोबा म्हणतात, ''शांतीसेना ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्वरूपाची आहे. वर्तमानकाळात सर्वच प्रश्नाचा विचार आंतरराष्ट्रीय पातळीवरून करावा. म्हणून आपण सतत घोषणा दिली पाहिजे 'जग जगत'.'' याचवेळी विनोबांची अजमेरच्या ख्वाजा मोइनद्दीन चिश्ती यांच्या दर्ग्यालाही भेट दिली. दर्ग्यात मुसलमानासोबत नमाजमध्ये भाग घेतला. मशिदीत स्त्रियांना प्रवेश नव्हता पण विनोबांबरोबर अनेक स्त्रियांही तेथे गेल्या. सर्वांनी मिळून सर्वधर्म प्रार्थना म्हटली. येथील संदेशात विनोबा म्हणतात, 'इस्लामचा संदेश अत्यंत पवित्र असून त्यात गरीब श्रीमंत असा भेदभाव नाही. म्हणून मी जाहीर करतो की, मी हिंदू बरोबर मुसलमान आणि ख्रिश्चनही आहे.''

२ मार्चला शांतीसेनेच्या एका पथकाने अजमेर-जयपूर मार्गावर गंगवाना या गावात समतेची यात्रा काढली. या यात्रेत जयप्रकाश नारायण, केलप्पन, रविशंकर, अप्पा पटवर्धन इ.सामील झाले होते. अमेरिकेचे निग्रो नेते मार्टीन ल्यूथर किंग हेही थोडावेळ या समता यात्रेत सहभागी झाले होते. मार्टीन ल्यूथर किंग आणि त्यांची पत्नी कोरेटा किंग यांनी विनोबांची भेट घेतली. नि:शस्त्रीकरणासह अनेक आंतरराष्ट्रीय प्रश्नावर चर्चा केली. अणुयुगात सत्याग्रहाचे स्थान सांगताना विनोबा म्हणाले, ''अणुयुगात मानसिक वृत्तीचे संघर्ष कायम ठेवून आपण पुढे जाऊ शकत नाही. अण्वस्त्रामुळे या जगाचा नाश ठरला आहे. मानसिक स्तरावर विचार करण्यापेक्षा आणि मानसिक स्तरावर जाऊन विचार करण्याची वेळ आली आहे. अनेक संघर्ष मानसिक स्तरावर निर्माण होतात, पण अतिमानसिक स्तरावरून या संघर्षाचे निराकरण केले

पाहिजे. माझ्या मते अणुयुगाबरोबरच अतिमानसिक युगाचाही प्रारंभ होत आहे. आणि सत्याग्रहाचा अर्थ सत्याला आपले काम करू द्या, आपण आपला आत्मा सत्याच्या आड येऊ न देणे महत्त्वाचे आहे.''

मार्टीन ल्यूथर किंग यांनी विचारणा केली की, ''शांतीसेना भारतीय सेनेला पर्याय होऊ शकेल का?'' विनोबांनी उत्तर दिले, ''प्रश्न अवघड आहे. परंतु शांतीसेनेची वाट न पाहताच भारतीय सैन्याचे विसर्जन करून टाकावे. शस्त्रत्याग, कल्पनाशक्ती व साहस असेल तर कोणताही देश सैन्याचे विसर्जन करील. भारत एकटाच शस्त्र संन्यासाची सुरुवात करू शकतो कारण ती भारतीय परंपरा आहे.''

दुसरे दिवशी १३ मार्च १९५९ रोजी जमनालाल बजाजच्या काशी-का-वास या जन्मगावी विनोबांनी राजस्थानातील सर्व गोसेवकांची भेट घेतली. त्यांना मार्गदर्शन करताना विनोबा म्हणाले, ''भारताचा एक स्वत:चा असा समाजवाद असून गाय ही एक कुटुंबाचा घटक मानला गेला आहे. म्हणून गाईइतकेच इतरावरही प्रेम करा.'' या समयी ब्रह्मविद्या मंदिराची स्थापना केल्याची घोषणा विनोबांनी केली. या ठिकाणी स्त्रियांना उद्देशून विनोबा म्हणाले, ''ज्याप्रमाणे पुरुषांना ब्रह्मचर्यापासून संन्यासापर्यंत सर्व अधिकार आहे, तेच अधिकार स्त्रियांनाही मिळावे.''

**पंजाबात:** राजस्थानचा आपला कार्यक्रम आटोपून १ एप्रिल १९५९ ला विनोबांनी पंजाबात प्रवेश केला. राज्यपाल न. वि. गाडगीळ आणि मुख्यमंत्री प्रतापसिंग कैरा यांनी त्यांचे स्वागत केले. या निमित्ताने 'बुनियादी तालीम' परिषदेचे आयोजन राजपुरा या गावी करण्यात आले होते. यावेळी विनोबा म्हणाले, ''शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक आहेत. मात्र हे बदल वर्तमान काळाची गरज भागविणारे असावेत.''

भाक्रानान्गल धरणाला भेट दिल्यानंतर विनोबा म्हणाले, ''भाक्रा नान्गलला पं. नेहरूंनी नव्या योजनेतील मंदिर म्हटले होते यांना मी मंदिर तेव्हाच म्हणेल जेव्हा या धरणाच्या पाण्याखालील शेतीचा सहावा भाग भूमीहीनाना मिळेल. या धरणाचा फायदा किती गरीबांना होतो हे मला बघायचे आहे.''

एका आठवड्यानंतर होशियापूर येथे शिरोमणी अकाली दलाचे प्रतिनिधी विनोबांना भेटले. विनोबांनी त्यांना सुचविले की, ''आपल्या संघटनाच्या निवडणुका घेणे थांबवून सर्व संमतीवर आधारीत कार्य पद्धतीचा स्वीकार करावा. गुरुद्वाराच्या पवित्र भूमीत प्रवेश करताना राजकारणाचे जोडे बाहेरच काढून ठेवणे इष्ट आहे.''

२२ सप्टेंबर १९५९ ला पठाणकोट येथे सर्व सेवा संघाच्या नवीन शाखेची सुरुवात करण्यात आली. त्याला जोडूनच भारतीय शांतीसेना मंडळाची स्थापनाही करण्यात आली. याचवेळी आवाहन करण्यात आले की सर्व राजकीय पक्षांनी आपापली आचारसंहिता लोकशाही तत्त्वानुसार तयार करावी. हिमाचल प्रदेशात दोन आठवड्याचा वास्तव्यानंतर विनोबा अमृतसरला आले.

अमृतसर येथे देशभरातून आलेल्या लेखक, कवीचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. यावेळी विनोबांनी लेखक आणि कवींनी जनतेला लोकनीतिचे शिक्षण देण्यासाठी लिखाण करण्याचे आवाहन केले.

**काश्मीरात:** काश्मीरमध्ये घडणाऱ्या घटनामुळे विनोबा चिंताग्रस्त होते. या काळात त्यांनी काही निश्चित भूमिका ठरविली होती. पं. नेहरूंशी त्यांनी याबाबत चर्चाही केली होती. पण तेथील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचा प्रत्यक्ष तेथे जाऊन अभ्यास करावा असे त्यांनी ठरविलेहोते. मे १९५८च्या पंढरपूरातील सर्वोदय संमेलनही त्यांनी काश्मीरला जाण्याची इच्छा व्यक्त केली होती. २२ मे १९५९ रोजी विनोबांनी काश्मीरात प्रवेश केला.

विनोबांच्या काश्मीर यात्रेबाबत देशीविदेशी पत्रकार, राजकारण्यांनी वेगवेगळी मते व्यक्त केली होती. काश्मीर प्रश्नावर विनोबा कोणता तोडगा सुचवतात याकडे नेहरूसह सर्वांचे लक्ष लागून राहिले होते. लखनपूरच्या पहिल्या सभेत विनोबांनी जाहीर केले, ''माझ्याजवळ अशी कोणतीही योजना नसून माझी ईश्वरावर पूर्ण श्रद्धा आहे. ईश्वराच्या इच्छेशिवाय इकडची गवताची काडी तिकडे होत नाही. डोळे उघडे ठेवून पाहण्यासाठी ऐकण्यासाठी मी आलो आहे. सर्वांच्यासाठी प्रेमाचा उपहार मी आणला आहे. माझ्या भाषणावर विश्वास नाही. मनातून केलेली प्रार्थनाच कामी येते, परिणामकारक ठरते.''

विनोबांच्या काश्मीर यात्रेच्यापूर्वीच दोन महत्त्वाच्या घटना घडून गेल्या होत्या. एकतर सरकारनेच जमीनीची कमाल धारणा ठरवून भूमीहीनासाठी जमीन वाटपाचे काम सुरू केले होते. दुसरी बाहेरच्या राज्याच्या रहिवाशावर काश्मीरात ज्या काही मर्यादा होत्या त्या शिथील करण्यात आल्या होत्या. या दोन्ही घटनामुळे काश्मीरात भूदान ग्रामदानास अनुकूल वातावरण निर्माण झाले. काश्मीरचे पंतप्रधान बख्शी गुलाम मोइमंदानी विनोबाच्या पहिल्या भेटीतच जाहीर केले की, ''राज्यातील सर्व जमीन या भूदान आंदोलनास दिली जाऊ शकते.'' पंतप्रधान बख्शी गुलाम महोम्मदांच्या घोषणेचे स्वागत करीत विनोबांनी म्हटले, ''पंतप्रधानानी व्यक्त केलेली आकांक्षा व्यावहारिक असून काश्मीर हे एक आदर्श सर्वोदयी राज्य बनावे आणि त्याने उरलेल्या भारताला आदर्श घालून

द्यावा.'' विचारा आणि या प्रती आपली तीव्र भावना व्यक्त करण्यासाठी विनोबांनी आत्मशुद्धीसाठी सकाळचे भोजन सोडले. काश्मीरभेटीपासून प्रवासात काही सामान पाठीवर घेण्याचीही सुरुवात त्यांनी केली. भारताच्या संपूर्ण प्रवासात विनोबांना मेजर जनरल यदुनाथ सिंह यांनी साथ दिली. यदुनाथ सिंहनी राष्ट्रपती राजेंद्रप्रसादांचे सैनिकी सचीव म्हणून काम केले होते.

काश्मीर प्रश्नाविषयी चर्चा करताना एके ठिकाणी विनोबा म्हणालें, ''काश्मीरच्या समस्या राजकारणातून सुटणार नाहीत. त्या सोडविण्यासाठी अध्यात्मिक पद्धतीने प्रयत्न व्हायला हवेत आणि अध्यात्मिकता म्हणजे परस्पर सद्‌भाव आणि सर्व संमती.''

''काश्मीरचा संबंध भारत, पाक, अफगाणीस्तान, चीन, रशिया आणि अमेरिकेशी येतो. अमेरिकेशी संबंध पाकीस्तानमुळे येतो. म्हणून काश्मीरी जनतेने अतिमानस भूमिका स्वीकारून जागतिक दृष्टीने विचार केला पाहिजे. ऋग्वेदात 'विश्वमानुष' हा विचार आहे. 'विश्वमानुष' म्हणजे जगाचा नागरिक. अशा उदात्त दृष्टीकोनामुळेच आपल्या समस्या सुटतील.'' तेव्हा एका सैनिकाने उठून जगजगतची घोषणा केली. त्यावेळी विनोबा म्हणाले, ''जगजगत म्हणजे स्वत: कुणाला भ्यायचे नाही आणि कुणाला घाबरावयाचे नाही. आज भारत पाकिस्तानला आणि पाकिस्तान भारताला घाबरवतो आहे म्हणून दोन्ही राष्ट्राचा शस्त्रास्त्राचा खर्च वाढत आहे. ही वेडी स्पर्धा थांबली नाही तर सर्वनाश अटळ आहे'' असे मत त्यांनी व्यक्त केले.

काश्मीरच्या यात्रेत रोज दुपारी अकरा वाजता कुराण पठणाचा कार्यक्रम विनोबांनी सुरू केला. मुस्लीम मोठ्या संख्येन हजर राहत. आधी मुस्लिमांना कुराण म्हणायला सांगत आणि नंतर विनोबा स्वत: कुराण म्हणत. विनोबांचे कुराणाचे ज्ञान, उच्चार, आदी बारकावे पाहून काश्मीरीनी आश्चर्य व्यक्त केले. कुराणाची वचने सांगून झाल्यानंतर विनोबा म्हणत, ''जमीनीचा मालक अल्ला आहे, जो माणूस स्वत:ला जमीनीचा मालक म्हणवतो, तो खरा मुस्लिम नसतो. जमिनीची मालकी सोडून ग्रामदान करणाराच सच्चा मुसलमान आहे. पैगंबराचा आदेश आहे की अल्लाने जी थोडी बहुत भाकरी दिली आहे त्यातील एक हिस्सा दान केला पाहिजे. तेव्हा जमीन असणाऱ्यांनी थोडी बहुन जमीन भूदानात द्यावी.'' या पदयात्रे दरम्यान सीमा रेषे जवळून विनोबा जात युद्ध बंदी रेषेच्या दोन्ही बाजूला तैनात सैनिक बघून विनोबा म्हणाले, ''ही सीझफायर (सीमा रेषा) नसून रेडी टू फायर आहे. शांतता प्रश्नाची ही फार मोठी चेष्टा आहे.''

२ ऑगस्ट १९५९ ला विनोबा श्रीनगरला पोहचले. तेथे त्यांचा पाच दिवस

मुक्काम होता. तेथून त्यांनी शंकराचार्य टेकडीलाही भेट दिली. शेख अब्दुल्लाची भेट घेतली. एका आठवड्यानंतर विनोबा पहलगामला गेले. तेथून अमरनाथ ९६ मैलावर होते. तेथे भेट देण्याविषयीविचारलेअसता विनोबा म्हणाले, ''मी दररोज अमरनाथ दर्शनाचा लाभ घेतो आहे. माझ्या दृष्टीने देशातील दीन दु:खी हेच माझे कुटुंबीय आहे.'' येथीलच एका सभेत विनोबांनी विज्ञान आणि आत्मविज्ञानाची दोन समीकरणे मांडली.

१) राजकारण + विज्ञान = सर्वनाश २) अध्यात्मिकता + विज्ञान = सर्वोदय. अध्यात्मिकता धर्मापेक्षा भिन्न आहे. देशपरत्वे धर्म भिन्न असू शकतो परंतु अध्यात्मिकता सत्य, प्रेम, करुणेप्रमाणे सार्वत्रिक व समान आहे. राजकारण मात्र मानवाला एकत्र आणण्याऐवजी त्याच्यात भेद वाढवते. हे विज्ञान युगात अत्यंत घातक आहे. म्हणून अध्यात्मिकता आणि विज्ञान एकत्र येणे गरजेचे आहे.

काश्मीरमधून जम्मूला परतताना विनोबा पीरपंजाल टेकड्या उतरून उधमपूर, गढी, कटरा मार्गे जम्मूला पोहोचले. वाटेत तिबेट मधून शरणार्थी म्हणून आलेल्या तिबेटींशीही त्यांनी संवाद साधला. ते म्हणाले, ''चीनशी आपले संबंध दहा हजार वर्षा इतके जुने आहेत. त्यामुळे तिबेटी लोकांना आश्रय दिला. हे काही चूकीचे नाही. पण काहींना ते आवडले नाही. तिबेटींशी आमचे संबंध प्रेमाचे असताना तिबेटींना आश्रय न देणे अमानवी ठरले असते.'' काश्मीरची यात्रा संपल्याच्या दिवशी ते म्हणाले, ''काश्मीर प्रश्नाची सोडवणूक घटनात्मक चौकटीतच होऊ शकते.'' स्वतंत्र काश्मीर हा विचार अव्यावहारिक आहे. पण भारत सरकारने काश्मीरला अधिकाधिक स्वायतत्ता बहाल करावी.'' काश्मीर पदयात्रेत त्यांचा शेवटचा मुक्काम कथुआ येथे पडला. येथील नागालोकांशी संवाद साधताना विनोबा म्हणाले, ''येथील जनतेने स्वत:ला जागतिक नागरिक समजून येथे सर्वोदयी व्यवहार निर्माण करण्याचा प्रयत्न करावा.''

याच भागात राहणाऱ्या चीनी नागरिकाशीही त्यांनी संवाद साधला. त्यांना उद्देशून विनोबा म्हणाले, ''तुमचे आमचे संबंध दहा हजार वर्षांपासूनचे आहेत. असंख्य वंश, जाती आणि लोक येथे आले अजूनही येताहेत. अलीकडेच तिबेटमधून काही निर्वासित भारतात आले, भारताने त्यांना आश्रयही दिला. त्यांच्या राजकारणाशी आमचा काही संबंध नाही. त्यांना आश्रयाची गरज होती आम्ही त्यांना आश्रय दिला. हा आमच्या आत्मसन्मानाचा भाग आहे.या देशात गौतमबुद्धाचा जन्म झाला. हा देश कुणालाही शत्रू मानीत नाही. तसेच जनतेशी

आमचे प्रेमाचे संबंध शतकानुशतके आहेत, तसेच आजही असतील. अशावेळी निर्वासित तिबेटीना आम्ही तर आश्रय दिला नाही तर ते आमचे अध:पतन ठरेल.''

भारतात परतल्यानंतर विनोबांना जम्मू काश्मीरबद्दल विचारणा केली असता विनोबा म्हणाले, ''सांप्रदायिकतेच्या आधारावर काश्मीरचे विभाजन अनुचित, बुद्धीशून्य आणि आत्मघातकी ठरेल. हिंदु मुस्लिम बहू मतावर आधारीत जर राज्याचे विभाजन केले तर संपूर्ण देशात याची हिंसात्मक प्रतिक्रिया उमटेल, ज्यामुळे कोट्यावधी मुस्लीमाचे जीवन धोक्यात येण्याची शक्यता आहे. फाळणीनंतरही भारतीय नेत्यांनी आणि जनतेने द्वी राष्ट्रवादाचा सिद्धांत पूर्णत: स्वीकारलेला नाही. या उपर जर साप्रंदायिक तत्त्वावर काश्मीरची फाळणी केली तर परिस्थिती हाताबाहेर जाईल व पुन्हा हिंसा भडकेल.'' म्हणून विनोबांनी सुचवले की, ''काश्मीर हे मिळते जुळते राज्य बनावे आणि धर्मनिरपेक्षतेच्या आदर्श खऱ्या अर्थाने निर्माण व्हावा.''

❑

# चंबळच्या खोऱ्यात

विनोबा काश्मीरमध्ये असतानाच त्यांना चंबळ खोऱ्यातील प्रसिद्ध डाकू मानसिंहचा मुलगा तहसिलदारसिंह याचे पत्र मिळाले. त्या पत्रात त्याने लिहिले होते की, मला फाशीची शिक्षा झाली आहे. परंतु फाशीला जाण्यापूर्वी तुमच्यासारख्या संताचे दर्शन घेण्याची इच्छा आहे. या पत्राप्रमाणे विनोबांनी मेजर जनरल यदुनाथसिंह यांना अलाहाबाद येथील नैनी सेंट्रल जेलमध्ये तहसीलदारसिंह यांची भेट घेण्यासाठी पाठवले. मेजर जनरल यदुनाथसिंह यांना अलाहाबाद येथील नैनी सेंट्रल जेलमध्ये मानसिंह दलाच्या इतर डाकूंचीही भेट घेतली. मेजर जनरल यदुनाथसिहांनी विनोबाला सुचविले की, काश्मीरमधून परतताना विनोबांनी चंबळ खोऱ्यातील डाकूंची भेट घेतल्यास त्यापैकी काही आत्मसमर्पणास तयार होतील. विनोबांनी हा प्रस्ताव लगेच स्वीकारला. अहिंसात्मक मार्गाने जर डाकू सर्वसामान्य जीवन जगण्यास तयार होत असतील तर प्रयोग करण्यास काय हरकत आहे असा विचार विनोबांनी केला. त्यासाठी डॉ. कैलासनाथ काटजू यांनी त्वरीत विनोबांना चंबळ खोऱ्याच्या भेटीचे निमंत्रण ही पाठवले.

पंजाबमार्गे विनोबा मे १९६० च्या पहिल्या आठवड्यात उत्तरप्रदेशात आग्रा येथे दाखल झाले. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि राजस्थान या तीन राज्याशी ही डाकू समस्या संबंधीत होती. केंद्रीय गृहमंत्री गोविंदवल्लभ पंत आणि त्यांचे साथीदार बी. एन. दातार यांनी आग्र्याला येऊन विनोबांची भेट घेतली. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री संपूर्णनंदानीही यात सहभागी होण्यास मान्यता दिली. विनोबांनी डाकूंना त्यांची पारंपारिक पद्धती सोडून आत्मसमर्पण करणे कसे योग्य आहे हे समजून सांगण्याचे ठरवले. म्हणून तिन्ही राज्याचा पोलीस प्रमुखानाही डाकूशी चर्चेची दरम्यान त्या भागात कायदा आणि शांतता राखून सर्वोदयी प्रक्रिया सुरू करून मदत करण्याची विनंती विनोबांनी केली.

७ मे १९६० रोजी डाकूचे आत्मसमर्पण आणि शांती प्रक्रिया निर्माण करण्याच्या दृष्टीने विनोबानी मेजर जनरल यदुनाथसिंह यांच्यासह चंबळ खोऱ्यातील डाकूच्या वस्तीमध्ये प्रवेश केला. मध्य प्रदेशातील भिंड मुरैना राजस्थानमधील धौलपूर जिल्ह्याचा काही भाग आणि उत्तर प्रदेशातील आग्रा व इटावा जिल्ह्यातील काही गावात ही डाकूची वस्ती होती. स्वातंत्र्य पूर्वकाळापासून डाकूच्या समस्येची सोडणवूक न झाल्यामुळे सर्वांचे विनोबांच्या या कृतीकडे लक्ष लागून राहिलेहोते.

विनोबांनी आपल्या कार्याची सुरुवात प्रार्थनेने केली. प्रार्थनेनंतर विनोबांनी डाकूशी संवाद साधताना सांगितले, ''परमेश्वरच फक्त या डाकूंना ओळखतो, कारण ते कोण आहे, कसे आहे ही सगळी सत्य माहिती परमेश्वराला माहिती आहे. काही व्यक्ती डाकू या नावाने विनाकारण बदनाम आहेत. काही व्यक्ती समाजात डाकू म्हणून अन्याय करतात पण त्यापेक्षाही अधिक भयानक अन्याय व अत्याचार समाजात काही लोक करतात. परमेश्वराचा एक सेवक म्हणून मी आपणासमोर उभा आहे. आपली सेवा करण्याचा आदेश मला त्यानेच दिला आहे.''

चंबळ खोऱ्यात एकूण पंचवीस हजार पोलीस तैनात करण्यात आले होते. विनोबांनी पोलीस अधिकाऱ्यांना समजावले की, 'कोणतीही व्यक्ती जन्मतः डाकू नसते. समाजातील शोषण, क्रूरता आणि हृदयहीनतेतून डाकू निर्माण होतात. डाकूमध्येही धार्मिक वृत्ती असते.त्यांच्या कामाचे क्षेत्र बदलले तर ते मोठ्यातले मोठे काम सहज करू शकतील. ही समस्या पोलीस सोडवू शकत नाही. पोलीस एकत्र आले की डाकूही एकत्र येतील त्यातून द्वेष, शत्रूत्व, तिरस्कारात भर पडेल हे सर्व आणि वंशपरांपरागत चालेल.''

मध्यप्रदेशचे राज्यपाल एच.व्ही. पाटसकर, मुख्यमंत्री कैलासनाथ काटजू यांनीही विनोबांची भेट घेतली. त्यांना शांतता निर्मितीसाठी हवे ते सहकार्य देण्याचीतयारी दाखविली. एके दिवशी कुविख्यात डाकू लच्छी ज्याच्यावर पाच हजाराचे बक्षिस होते विनोबा समोर येऊन उभा राहिला व आपला परिचय देत म्हणाला, ''मी मुंबईत होतो. आपण चंबळ खोऱ्यात डाकू लोकांना आत्मसमर्पणाबाबत व पश्चातापाबाबत सांगत आहात असे मी वर्तमानपत्रात वाचले, मलाही मनोमन आपली भेट घ्यावी, चूकीची माफी मागावी. चूकीच्या मार्गाचा त्याग करून चांगले जीवन जगावे या हेतूने मी माझ्या कुटुंबासह आपल्या स्वाधीन होत आहे.'' क्षणभर विनोबांना काहीच सुचेना. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. प्रभावीत होत विनोबा उद्गारले, ''मला तर साक्षात देवाचे दर्शन झाल्यासारखे झाले आहे. ही व्यक्ती मुंबईहून आत्मसमर्पणासाठी येथे आली आहे, हे ईश्वराच्या प्रेरणेनेच झाले आहे. अडीच हजार वर्षांपूर्वी अंगुलीमाल नावाचा डाकू बुद्धाच्या

स्पर्शाने साधु बनला होता. लोक म्हणतात कलीयुगात हे अशक्य आहे, ईश्वराचा चमत्कार बघा, कलीयुगातही आत्मसमर्पण करणारे डाकू आहेत हे सिद्ध झाले आहे.

१९ मे रोजी प्रार्थनेनंतर ११ डाकूचा प्रमुख डाकू लुक्काने विनोबाला आपली शस्त्रे अर्पण केली. प्रार्थना सभेतील सर्व लोक आश्चर्याने दंग झाले. मेजर जनरल यदुनाथसिंहाने सर्वांना एका रांगेत उभे करून प्रत्येकाची नावे घेतली तेव्हा सर्व सभेने तोंडात बोटे घातली कारण एकापेक्षा एक कुख्यात टाकू प्रत्यक्ष दिसत होते, त्यांना पाहण्यासाठी गर्दी झाली. दुसऱ्या दिवशी आपल्या प्रवचनात विनोबा म्हणाले, ''या ठिकाणी डाकूची समस्या आहेअसे म्हणतात, पण या समस्येच्या मूळ कल्पनांचा कुणी विचार करीत नाही. गरीबी, व्यक्तीगत वैमनस्य आणि पोलिस हे या समस्येतील प्रमुख मूळ आहे. या समस्येचे राजकारण हेही एक कारण विनोबांनी व्यक्त केले. पक्षीय राजकारण आणि निवडणूका ही कारणे संपवली की, डाकूची समस्या आपोआपच मिटेल.'' या प्रवचनानंतर आणखी तिघांनी आत्मसमर्पण केले.

२२ मे १९६० जेलमध्ये जाण्यापूर्वी या डाकूंना पदयात्रेतील स्त्रियांनी राखी बांधली, ओवाळले आणि भावपूर्ण नेत्रांनी त्यांना निरोप दिला. जाताना जेव्हा त्यांनी विनोबांना साष्टांग नमस्कार केला तेव्हा त्यांना आशिर्वाद देत विनोबा म्हणाले, ''ईश्वराची भक्ती करा आणि मनात सदैव पवित्र भावना राखा.'' विनोबांनी या सर्व डाकूची आत्मसमर्पण आणि पश्चातापाची भावना मेजर जनरल यदुनाथसिंहांमार्फत पं. नेहरू पर्यंत पोहोचवली. दुसरे दिवशी विनोबांनी भिंडच्या कारागृहात सायंकाळीप्रार्थना केली. त्यात २०० आत्मसमर्पित डाकूनीही भाग घेतला. प्रार्थनेनंतर विनोबा म्हणाले, ''मी वेगवेगळ्या जेलमध्ये पाच वर्षे काढली. कैद्यांसमोर गीतेवर प्रवचने दिली, जे काम आम्हाला दिले जाई ते निष्ठेने केले. कारण मेहनतीशिवाय कोणतेच काम चांगले नसते. समाजावर ओझे म्हणून जगण्यापेक्षा समाजाला देत जगणेचांगले, जेल म्हणजे आश्रम समजून त्याला स्वच्छ ठेवा.''

प्रेम, करुणा यांच्या माध्यमातून डाकूंच्या हृदयपरिवर्तनाचा प्रयोग बघून पोलीस अधिकारी प्रभावित झाले. काही पोलीस अधिकाऱ्यांनी विनोबांना विनंती केली की त्यांनी पोलीसांना मार्गदर्शन करावे. विनोबा म्हणाले, ''हे जे काम होत आहे ते कुणा एकाचे काम नसून ते ईश्वराचे काम आहे. त्याचे सर्व श्रेय ईश्वराला आहे. आपण सर्व त्याच्या हातातले बाहुले आहोत. डाकूंनी स्वत: निर्णय घेऊन विनार्शत आत्मसमर्पण केले. कायद्याने त्यांना शिक्षा होईल याची जाणीवही त्यांना देण्यात आली होती. फक्त माझ्यामुळे त्यांचा छळ होणार नाही. ते सर्वजण स्तुतीस पात्र

आहेत, त्यांच्या प्रती आपलीही भूमिका समंजसपणाची आणि मानवतेची असावी, यामुळे मोठी समस्या आपोआप लहान होईल.''

''विनोबांच्या पदयात्रेमुळे पोलीसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण झाले आहे'' असे उद्‌गार मध्यप्रदेशाचे इन्स्पेक्टर जनरल के. एफ. रुस्तुमजी यांनी काढल्यामुळे थोडी खळबळ माजावी. रुस्तुमजीचा गैरसमज झाला होता की या डाकूना शिक्षेत सवलती दिल्या जातील. याबाबत विनोबानी म्हटले की ईश्वर प्रत्येकाला त्याच्या कुवतीप्रमाणे भासतो. डाकूना कोणतेच आश्वासन दिले नाही. शिक्षा करणे हे न्यायालयाचे काम आहे. आत्मसमर्पण करणाऱ्या डाकूना जेलमध्ये पाठवणे काही सर्वोदयी कार्यकर्त्यांना आवडले नाही. त्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवून आत्मसमर्पण केले.त्यांच्या शिक्षेचा फेरविचार व्हायला हवा होता असे विनोबांच्या अनेक शिष्यांना वाटत होते. समजावण्याच्या सुरात विनोबा म्हणाले, ''काहीच्या मते आत्मसमर्पण करणाऱ्या डाकूना मीच कैदेत पाठवले आणि मी हे काही बरोबर केले नाही. या बाबतीत मी हे स्पष्ट करू इच्छितो की यापेक्षा वेगळा पर्यायच नव्हता. कारण बेकायदेशीर असे मी काहीच करू इच्छित नाही. आत्मसमर्पण करणाऱ्यासाठी मी फक्त एवढेच करू शकतो की त्यांना न्याय मिळावा त्यांना योग्य कायदेशीर मदत मिळावी आणि शक्यच झालेतर आपल्या कुटुंबियासोबत सुखी समाधानाने आयुष्य घालवावं. मुख्य म्हणजे आत्मसमर्पण करणाऱ्या डाकूनाही क्षमेची भीक नको आहे. त्यांनी आत्मसमर्पण केलेले नाही. त्यांनाही मी आवाहन करतो की, त्यांच्याच हितासाठी त्यांनी पश्चाताप करीत आपले जुने आयुष्य सोडून नव्या मार्गाचा शोध घ्यावा.'' परिणामी या डाकूनी आपला गुन्हा भिंड येथील न्यायालयात कबूल करीत सतत सत्याचाच स्वीकार करण्याचे वचन दिले. त्यामुळे विनोबांना खूप आनंद झाला ते म्हणाले, ''मी डाकूंना वाईट मार्गाचा त्याग करून सत्याच्या मार्गाचा स्वीकार करीत गुन्हा कबूल करावा. त्याप्रमाणे ते वागले हा इतिहासातील मोठा चमत्कार आहे.''

७ जून १९६० ला विनोबांची शांतीयात्रा ग्वाल्हेरला समाप्त झाली. डाकूंच्या आत्मसमर्पणासाठी विनोबा २५ गावातून फिरले. मानसिंह- सपन यांच्या टोळीतील २० डाकूचे आत्मसमर्पण त्यांनी (घडवून आणले ह्या सर्वांवर २०,००० चे इनाम होते.)

चंबळ, भिंड परिसरातील बदललेल्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी विनोबांनी 'चंबळ घाटी शांतता समिती' स्थापन केली. ज्या डाकूवर खटले होते त्यांना मदत करण्याचेही काम ही समिती करीत होती. तसेच या डाकूच्या कुटुंबाना मदत करण्यासाठी चंबळ खोऱ्यात काही जमिन खरेदी, ग्रामोद्योग, गृहउद्योगाचे

प्रशिक्षण डाकूंच्या समस्या इत्यादी सोडवण्याचा प्रयत्नही चंबळघाटी शांतता समिती करीत होती.

ऑगस्ट १९६० मेजर जनरल यदुनाथ सिंहाच्या अकाली निधनामुळे डाकूच्या पुनर्वसनाच्या कामात अडथळे निर्माण झाले, तरीपण डाकूची समस्या पोलीसी पद्धतीऐवजी रचनात्मक पद्धतीमुळे लवकर सुटेल यावर विनोबांनी विश्वास व्यक्त केला.

उत्तर प्रदेशाच्या विकासासाठी विश्वबँकेने जेव्हा मदत देण्याचे मान्य केले. यामुळे या भागाच्या समस्या लवकर सुटतील असे विनोबांनी म्हटले होते.

**इंदोर-सर्वोदयनगर**: राजस्थनची पदयात्रा आटोपून विनोबा २४ जुलै १९६० ला इंदोरला पोहोचले. इंदोरच्या सर्वोदय वानप्रस्थ मंडळाचे उद्‌घाटन करताना विनोबा म्हणाले, ''इंदोर हे सर्वोदय नगर व्हावे यासाठी प्रत्येक गल्लीची सफाई आणि सर्वोदय पात्र यासारखे रचनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करावे.'' १५ ऑगस्ट १९६० रोजी स्थानिक सर्वोदयी कार्यकर्त्यांनी दुसरे नवे केंद्र सुरू केले. त्याने नामकरण विनोबांनी 'विसर्जन आश्रम' असे केले. सर्वसभासदांनी आपल्या जुन्या मूल्याचे विसर्जन करून नव्या मूल्याचे सर्जन करावे. तरच विसर्जन आश्रम सार्थक ठरेल. शांतीसेना, नगर सफाई, आपसातील भांडणे आपसात मिटवणे आणि नगरपालिकेतून राजकीय पक्षाचे उच्चाटन असा चार कलमीकार्यक्रम आखून देण्यात आला.

सिनेमा टॉकीजसमोर आणि शहरात अश्लील पोस्टर लावू नयेत, लावली असतील तर ती त्वरीत काढून टाकावी, कोणी काढीत नसल्यास सत्याग्रह करावा, नगरपालिकेच्या लोकांना त्यांनी सुचवले की, आपल्या शहरातील घाणेरड्या गोष्टी हलवा. महिलाश्रमाच्या बैठकीत विनोबा म्हणाले, ''आमच्या मायबहिणीची अश्लील चित्रे जागोजागी वाईट रितीने लावलेली आहेत. देशाच्या शील रक्षणाची जबाबदारी आता भगिनी वर्गानेच स्वीकारावी.'' अश्लील पोस्टर विरोधी इंदोरमधील आंदोलन हळूहळू संपूर्ण देशभर पसरले. परिणामी काही ठिकाणी आंदोलना पूर्वीच अश्लील पोस्टर हलविले गेले.

**आसाम-भाषिक दंगल** : ३० सप्टेंबर १९६० रोजी विनोबांना पं.नेहरूचे पत्र मिळाले. आसामात भाषिक दंगली सुरू झाल्या आहेत म्हणून शांती स्थापण्यासाठी विनोबांनी तिकडे जावे. त्याप्रमाणे विनोबांनी पायीच आसामला जाण्याचा निश्चय केला. २५ डिसेंबर १९६०ला विनोबा वाराणसी मार्गे पं. बंगालमधून ५ मार्च १९६० ला आसामात ग्वालपाडा या ठिकाणी पोहोचले. आपल्या पहिल्याच भाषणात विनोबांनी जनतेला आपल्या प्रदेशाचे स्वरूप समजून घेण्याचे आवाहन

केले. आसामी बंगाली बरोबरच अनेक बोली भाषा असणारा हा प्रदेश असून भारतातील अनेक भाषिक लोक या भागात वास्तव्यास आहेत. त्यात व्यापारी व कामगार आहेत. त्या प्रत्येकाची आपापली भाषा आहे. यात हिंदू मुस्लीम आणि ख्रिश्चन आहेत. म्हणून परस्पर विश्वास निर्माण करून प्रेम वृद्धींगत करावे.'' ग्वालपाड्यात विनोबांनी दंगलग्रस्त भागाला भेट दिली. उपद्रवग्रस्ताना दिलासा मिळाला. स्त्रिया व मुलांचे सांत्वन केले. ''गावातील लोक सरळ असतात, शहरातील राजकारणी त्यांच्या मनात विष पेरतात. अशा समस्याला पोलीस किंवा सैन्य सोडवू शकत नाही, यासाठी प्रत्येकाने आपल्यातील नैतिक शक्ती आणि अध्यात्मिक मूल्यांचा विकास केला की आपोआपच प्रेम आणि एकता निर्माण होऊन शांतता प्रस्थापित होईल.

८ एप्रिल रोजी सकाळी विनोबा गोहाटीला पोहचले. गोहाटी येथे त्यांचे अतिभव्य असे स्वागत झाले. स्वागताला उत्तर देताना विनोबांनी, '' तुम्ही तुमच्या समस्या कायद्याच्या ऐवजी करुणा धारण करून सोडविण्याचा प्रयत्न करावा. मी आसामात भाषणे करण्यासाठी आलो नसून आपल्या ज्या काही समस्या आहेत आपल्या ज्या काही अपेक्षा आहेत त्या ऐकण्यासाठी आलो आहे. माझी इच्छा आहे की या लहानशा प्रदेशातून देशासाठी प्रेमाचा संदेश मिळावा.''

१२ मे रोजी विनोबांनी लखीमपूर जिल्ह्यात पदयात्रा सुरू केली. विनोबा येण्याच्या पूर्वी काही ग्रामदानाची घोषणा झाली होती. संपूर्ण जिल्ह्यात ग्रामदान व्हावे म्हणून या ठिकाणी वर्षभर मुक्काम करण्याचे विनोबांनी ठरवले. मुख्यमंत्री बी. पी. चालीहा आणि विधानसभेच्या सर्व सभासदांनी विनोबांना आश्वासन दिले की पक्षापक्षातील भेद दूर ठेवून त्यांच्या कार्याला मदत करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या समोर मनोगत व्यक्त करताना विनोबा म्हणाले, ''येथील भाषीक उपद्रवासंबंधी ऐकून मात्र अत्यंत वाईट वाटले, अशा प्रकारची हिंसा संकुचिता वाढवते. विज्ञान युगात अशा संकुचित समस्या असू शकतात हे पाहून आश्चर्य वाटते. आपण सर्व तरुण आहात आपण भूतकाळाचे गुलाम बनण्याऐवजी उज्ज्वल भविष्याचे अग्रदूत बनावे. आपण जय जगतच्या भाषेत विचार करायला शिकले पाहिजे.''

साहित्यिकाच्या मेळाव्यात साहित्यिकांशी चर्चा करताना विनोबा म्हणाले, ''सत्य, संयम आणि समतेतून एका विशिष्ट प्रकारच्या साहित्याची निर्मिती होते. त्यातून लेखक जनतेच्या हृदयात प्रवेश करू शकतो. हे फक्त अहिंसेच्या मार्गानेच शक्य आहे. अहिंसा खऱ्या कलेची जननी आहे. साम्यवादात करुणा आहे परंतु सर्वांना हृदयाशी कवटाळणारी सत्याची भावना त्यात नाही. म्हणूनच सर्वोदय हीच सर्वोच्च शक्ती आहे; कारण एकता आणि सेवेचा विचार त्यात आहे.''

आसामच्या वास्तव्यात विनोबा सोबत अमलप्रभादास होत्या. त्यांच्या आणि हजर महिलाच्या सहकार्याने जवळ जवळ १००० गावाचे ग्रामदान होऊ शकते. तेव्हा आपल्या कामासाठी पुरुषाचा सहभाग मिळत नाही. याबद्दल विनोबांनी खेद प्रकट केला. याचवेळी लखीमपूर जिल्ह्यातील एका सभेत भारत सरकारसमोर संकट उभे राहणार नसेल तर मी नागालँडमध्ये माझ्या कार्याची सुरुवात करीन.'' असे जाहीर केले. याबाबत विनोबांनी पं. नेहरूंशी चर्चा केली. पं. नेहरूंच्या मते विनोबांना नागाप्रदेशात भूमिगत नागा बंडखोराकडून उपद्रव होण्याची शक्यता असल्याने विनोबांनी नागालँडात जाऊ नये. त्याऐवजी विनोबांनी पूर्व पाकिस्तानात जावे त्यासाठी योग्य तो पत्रव्यवहार करणयाचे आश्वासन देण्यात आले. सुरुवातीला पाकिस्तान सरकार अनुकूल नव्हते. पण भारत सरकारने पाकिस्तानचे अध्यक्ष अय्युबखानाला विनंती केल्याने विनोबांना पूर्व पाकिस्तानात प्रवेशास संमती देण्यात आली. पूर्व पाकिस्तानला रवाना होण्यापूर्वी विनोबांनी उत्तर लखीमपूर येथे एक नवा आश्रम स्थापन करून त्याला 'मैत्री आश्रम' असे नाव दिले. विनोबा सोबत असणाऱ्या श्रीमती कुसुम देशपांडे यांना मैत्री आश्रमाची जबाबदारी सोपवून विनोबा पुढील पदयात्रेस रवाना झाले.

**पूर्व पाकिस्तानात:** ५ सप्टेंबर १९६२ ला विनोबांनी पूर्व पाकिस्तानात प्रवेश केला. विनोबा सर्वप्रथम सोनारहाट या गावी पोहोचले. विनोबांच्या आगमनाची बातमी पसरल्याबरोबर विनोबा थांबले होते. त्या ठिकाणी गर्दीच गर्दी झाली. विनोबा त्यांच्यासमोर हिंदीत बोलले त्यांचा बंगला अनुवाद आशादेवी यांनी केला. पूर्व पाकिस्तान मधील आपल्या पहिल्याच भाषणात विनोबा म्हणाले, ''पाकिस्तानान मला फिरण्याची संमती पाकिस्तान सरकारने दिली मी त्यांचा आभारी आहे. पाकिस्तानी जनतेप्रती असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठीच मी येथे आलो आहे... मला येथे भारत आणि पाकिस्तान यात काहीच फरक वाटत नाही. तीच जमीन, तीच हवा, तीच प्रेमयुक्त लोकांची मने. भारत व पाकिस्तानात एकच असल्यासारखे वाटते. तसे तर मला सर्व जग एक वाटते. म्हणून मी जगजगत ही घोषणा देतो.'' सोनारहाटहून विनोबा भंरुगमारी या गावात पोहोचले. भारतीय आणि पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. येथील सायंकाळच्या सभेत विनोबांनी मत व्यक्त केले की, ''मागील अकरा वर्षापासून भारताच्या गावागावातून मी पायी फिरत आहे, पायी फिरण्याचा एक फायदा प्रत्येक गावातील जनतेशी संपर्क येतो. मी गरीबाचा सेवक आहे. जेथे जेथे मी जातो तेथे तेथील गरीबांचे प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न मी करतो. भूदानात मिळालेल्या ४० लाख एकर जमीनीतून १० लाख एकर जमीनीचे वाटप भूमीहीनाना करण्यात आले. मी येथे रिकाम्या हाताने आलोआणि रिकाम्या हातानेच

जाऊ इच्छितो. पण येथेही गरीब मजूरासाठी काही जमीन मिळाल्यास मला आनंद होईल. कारण सर्व धर्मात भाकरी वाटून खाण्याचे समर्थन केले आहे. इस्लाममध्येही हीच शिकवण आहे. म्हणून मी आपणास विनंती करतो की येथेही मला थोडी जमीन भूदानात द्यावी.'' क्षणभर सभेत स्तब्धता पसरली. एका म्हाताऱ्या मुस्लीम गृहस्थाने आपल्या चार एकर जमीनीतील एक बीघा जमीन देण्याची इच्छा व्यक्त केली. दानपत्र करताना मात्र त्याने एक बीघा ऐवजी एक एकर असे लिहून दिले. पूर्व पाकिस्तानच्या भूमीवरील हे पहिले भूदान होते. त्या गृहस्थाचे नाव होते अब्दुल खलिफ मुन्शी. अब्दुल खलिफ मुन्शी हा पूर्व पाकिस्तानमधला रामचंद्र रेड्डी झाला. विनोबांच्या पूर्व पाकिस्तानच्या प्रवासात १७५ बीघे जमीन भूदानात मिळाली ती तेथे हिंदु मुस्लिमात वाटू देण्यात आली.

११ सप्टेंबर १९६२ हा विनोबांचा ६०वा वाढदिवस. या निमित्त पूर्व पाकिस्तानच्या गव्हर्नरने त्यांचे तारेने अभिनंदन केले. तेथे गीता, कुराण पाठ, रविंद्रनाथ टागोरांची गीते, मराठी भजनाचा कार्यक्रम झाला. शेवटी विनोबांनी भूदान आंदोलनाची माहिती श्रोत्यांना दिली. १४ सप्टेंबर १९६२ रंगपूर या गावी विनोबांनी पाकिस्तानी साहित्यिकांची भेट घेऊन मूलभूत (बुनियादी) लोकशाही संबंधात काही शंका विचारल्या. तेव्हा विनोबा म्हणाले, ''जर युनियन कौन्सिलानी प्रेम करुणा यांच्या आधारावर ग्रामीण पुनर्निर्मितीचे काम सुरू केले की खरी लोकशाही निर्माण होण्यास मदत होईल. संकटाच्या वेळी लोकशाही खुद्द स्वत:लाच गमावून बसते. पण अहिंसेशिवाय खरी लोकशाही निर्माणच होऊ शकत नाही. हिंसेवर आधारित लोकशाहीत कोणतेच विधायक कार्य होत नाही.'' साम्यवादाविषयी प्रश्न विचारला असता विनोबा म्हणाले, ''साम्यवादाची शक्ती करुणा आहे मात्र मार्ग हिंसेचा आहे. साम्यवाद फक्त 'नाहीरे' वर्गाचेच दु:ख दूर करण्याचा प्रयत्न करतो...''

अहिंसक क्रांती कशी घडवता येईल या प्रश्नाच्या उत्तरात विनोबा म्हणाले, ''अहिंसक सामाजिक क्रांतीसाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे. पद जितके लहान तितकी सत्ता अधिक, जस जसे पद मोठे (वरीष्ठ) होत जाईल तस तसा अधिकार कमी होत गेला की यातून सहकारी समाजव्यवस्था उदयाला येईल आणि सर्वात शेवटी त्यातून व्यक्ती विकासास पूर्ण संधी मिळेल. अंतत: समाजहीत म्हणजे स्वहीत हा दृष्टीकोन निर्माण होईल.''

या सर्व व्यवस्थेत भूदानाचे स्थान काय? असा प्रश्न विचारला असता विनोबांनी उत्तर दिले की, अहिंसक समाज रचना हे जसे अंतिम ध्येय आहे तसेच त्याचा आधार ग्रामदान असेल. ग्रामदानातून अहिंसक सामाजिक क्रांती आस्तित्वात येईल.

पूर्व पाकिस्तानात विनोबा आणि त्यांच्या विचाराला बरीच लोकप्रियता मिळाली. ''बहुत बडा फकीर भारतसे आया है।'' किंवा ''म. गांधींका अनोखा चेला'' अशी त्यांची ओळख झाली. एका पत्रकाराने विनोबांना अडचणीत टाकणारा प्रश्न विचारला, ''पूर्व पाकिस्तानात जमीन कमी आहे. पूर्व पाकिस्तानला काही जमीन देण्यासाठी आपण भारत सरकारला राजी करू शकाल का?'' विनोबांनी न अडखळता उत्तर दिले, ''भारताचीही हीच समस्या आहे. जमीन वाटप ही प्रत्येक देशाची समस्या आहे. प्रेम आणि सहकार्यानेच हा प्रश्न सुटू शकतो. भारत आणि पाकिस्तान यांनी एकत्र येऊन शेवटी सर्व राष्ट्राचे मिळून एक संघराज्य करावे आणि सर्वांत शेवटी सर्व राष्ट्रांचे मिळून एक लोकसंघराज्य निर्माण करावे म्हणजे सर्व प्रश्नाचा हळूहळू विलय होईल.''

रंगपूर, दिनाजपूर मार्गे विनोबा पूर्व पाकिस्तानच्या सीमेवर येऊन पोहोचले. दोन्ही देशाच्या अधिकाऱ्यांची त्यांना अभिवादन केले. जगजगत म्हणत विनोबांनी पूर्व पाकिस्तानचा निरोप घेतला आणि भारतात पुनर्प्रवेश केला.

**प. बंगालमध्ये** : पूर्व पाकिस्तानातून विनोबांनी भारतात प. बंगालच्या दिनाजपूर या गावी प्रवेश केला. त्यांनी जाहीर केले की, ''जितके दिवस येथे माझी गरज असेल तितके दिवस मी या ठिकाणी मुक्काम करीन.'' यापूर्वी विनोबा प. बंगालमध्ये आले होते. मात्र यावेळी प. बंगालच्या सर्वच जिल्ह्यातून त्याची पदयात्रा केली व ग्रामदानाचे कार्य अधिक बळकट कसे करता येईल याची आखणी केली. प. बंगालचा संदर्भ घेऊन जेव्हा साम्यवादाविषयी आपली मते काय? असा विनोबांना प्रश्न केला असता आणखी एक नवा अर्थ विनोबांनी सांगितला. साम्यवादाचा मूळ उद्देश चांगला आहे, परंतु तो उद्देश अमलात आणण्याच्या मार्गामुळे जगाचे विभाजन दोन गटात होण्याची शक्यता मात्र निर्माण होणार आहे. साम्यवाद हा सिन्थीसीस नसून अँटीथिसीस आहे. सिन्थीसीसमुळे प्रेम आणि करुणा या माध्यमातून व्यक्ती आणि समाज दोहोत बदल करता येतो. अँटीथिसीसमुळे शक्य नाही.''

प. बंगालच्या पदयात्रेतील महत्त्वाची घटना म्हणजे 'प्लासी'या गावाचे ग्रामदान. या निमित्ताने विनोबाने सांगितले, ''प्लासी हे तेच ऐतिहासिक गाव आहे जेथे लॉर्ड क्लाईव्हने नबाब सिराजुद्दौलाचा १७५७ साली पराभव करून ब्रिटिश साम्राजाचा पाया घातला होता. दोनशे वर्षानंतर याच प्लासी गावाने सर्व संमती आणि पारस्परिक सहकार्यावर आधारित एका कुटुंबासारखे राहण्याचा निश्चय केला.''

**चीनी आक्रमण:** ऑक्टोबर-नोव्हेंबर १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले. चीनच्या या कृतीचा विनोबांना धक्का पोहोचला. आपल्या २४ ऑक्टोबरच्या भाषणात विनोबांनी चीनच्या या हल्ल्याचा निषेध केला, ''... भारताने

नेहमीच चीनशी प्रेमाचे संबंध ठेवले असताना विनाकारण चीनने ही आगळीक केली आहे. ३००० मैल लांब सीमेचे संरक्षण ही अत्यंत अवघड बाब असल्यामुळे जनतेच्या सहकार्य आणि एकात्मतेतूनच मात्र हे सहज शक्य आहे. डोळ्यात तेल घालून आम्ही सावध राहू तेव्हाच हे शक्य आहे.'' पुढे विनोबा म्हणाले, ''चीनी आक्रमणाचा उद्देश फक्त आमच्या देशाची काही हजार चौरस मैल प्रदेश, हड़पणे हा नसून हे दोन विचारधारेतील युद्ध आहे. चीन भारतावर साम्यवादी विचार लादू इच्छित आहे. जर हे आक्रमण असेल तर आपण ही सर्वोदयी विचार घेऊन त्याचा सामना केला पाहिजे...''

कटीहार येथील सभेतही चीनी आक्रमणासंबंधी आपले मत व्यक्त केले. ''चीनी आक्रमणामुळे देशातील जनतेत जी जागरुकता निर्माण झाली आहे अशी पूर्वी कधीही जाणवली नाही. यातूनच देशाची शक्ती आणि हार्दिक एकात्मतेची ओळख होते. या एकात्मतेचा उपयोग समाजातील 'आहेरे' आणि 'नाहीरे' वर्गात एकात्मता निर्माण करण्यासाठी व्हावा. चीनशी सामना फक्त सैन्याच्या जोरावर होऊ शकत नाही हा सामना सामाजिक आणि धार्मिक स्तरावर ही करावा लागणार आहे.''

दुसऱ्या एका भाषणात विनोबा म्हणतात, ''चीनचे हे आक्रमण म्हणजे विस्तारवादाचे स्पष्ट उदाहरण होय. हा साम्यवाद नाही. आपल्या वृत्तीचे समर्थन करण्यासाठी चीन साम्यवादाचा आधार घेत असला तरी विस्तारवादाचे अंतिम स्वरूप सर्वनाशच असतो. पंचशीलला मान्यता देऊनही चीनची ही कृती निंदनीय असून आक्रमकाची आहे. म्हणून जगाच्या हितासाठी चीनने परत जावे कारण शस्त्राने संघर्ष नष्ट होत नाही संघर्ष वाढतो. म्हणून मी कोणत्याही प्रकारच्या संघर्षाच्या विरुद्ध आहे. भारताने तर युद्धाचा विचारही मनात आपला नव्हता. भारताने नेहमीच शांततापूर्ण विचारविनिमयाची भूमिका केलेली आहे. चीनचे आक्रमण साम्यवादाच्या दृष्टीनेही अनुचित असून जयजगत यावर विश्वास ठेवणाऱ्या विश्व नागरिक या नात्याने मी चीनला पुन्हा विनंती करीन की त्यांनी परत जावे.''

याच काळात विनोबांनी भारतीय जनतेने एकता आणि खंबीरपणाने प्रसंगाला सामोरे जावे असे आवाहन केले.''आक्रमणातच एकत्र येण्याची वाट न पाहता सर्वांनी एकत्र येऊन एक समान कार्यक्रम तयार करावा ज्यामुळे आपण आपल्या पूर्ण शक्तीचे प्रदर्शन करू शकू.'' यासाठी शांतीसैनिकांनी देशभर फिरून जनतेत एकता सहकार्य आणि सामाजिक खंबीरपणा वाढवण्यासाठी प्रचार करावा. भारतावर हे युद्ध लादले गेले असले तरी भारताने द्वेषाची अथवा शत्रुत्वाची भावना बाळगू नये. भारताने आपली पारंपारिक शांतता आणि मैत्रीचे धोरण न सोडता उभे

राहावे असा सल्लाही विनोबांनी भारतीय नेत्यांना दिला.

चीनी आक्रमणाचा सामना करण्यासाठी शांतीसैनिकांनी सीमेवर जावे का? असा प्रश्न केला असता विनोबा उतरले, ''असे करणे मूर्खपणाचे ठरेल. कारण आक्रमण करणारे माणसे नसून ते यंत्रवत आहेत. व्यक्तीचे कोणतेही लक्षण त्याच्यात नाही. मालकाने आदेश दिला आणि नोकराने- शिपायाने त्याच्या आदेशाचे पालन केले. शांतीसैनिक, सर्वोदय कार्यकर्ते जर सीमेवर गेले तर त्यामुळे सरकार अडचणीत येईल अशावेळी शांतीसेनेने आणि सर्वोदयी कार्यकर्त्यांनी आपली शक्ती अंतर्गत शांतता निर्माण करण्यात खर्च करावी. देशपातळीवर यश आल्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर यश मिळाल्याशिवाय राहणार नाही.''

अण्वस्त्र बंदी संबंधात राजगोपालाचारी, यु. एन. ढेबर यांनी केनेडी आणि क्रुश्चेव्ह यांची भेट घेतली. या संबंधी मत देताना विनोबाने स्पष्ट केले की वारंवार भेटी घेऊन विचाराचे आदान प्रदान केल्याने एकमेकांची भूमिका कळण्यास मदत होते. परंतु जोपर्यंत आपली नैतिक शक्ती प्रबळ होत नाही तोपर्यंत अशा भेटींना काही अर्थ नसतो. आम्ही देशांतर्गत नैतिक शक्तीचा विकास करू शकलो नाही म्हणून आम्हाला आमच्या संरक्षणासाठी सैन्याची गरज भासते. आम्ही जर आमच्या नैतिक शक्तीचा विकास करून सैन्याऐवजी शांतीसैन्य स्थापन करू शकलो तर आपोआपच आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याला पाठिंबा मिळेल.

डिसेंबर १९६२ मध्ये कलकत्ता पत्रकार परिषदेत विनोबांनी शस्त्राचा सामना शस्त्रानी करण्याचा विचार खोडून काढीत म्हटले, ''चीनचे आवाहन जितके शस्त्राचे आहेतितकेच वैचारिकही आहे. चीनचा साम्यवाद आणि भारताचा लोकशाही समाजवाद असा हा वैचारिक संघर्ष आहे. मूळ प्रश्न आहे या दोन विचारांपैकी कोणता विचार गरीबाचे प्रश्न सोडवू शकेल.

❒

# ग्रामदान

२५ डिसेंबर १९६२ पं. नेहरू शांतीनिकेतनमधील पदवीदान सभारंभ आटोपून विनोबांना भेटण्यासाठी नवग्राम येथे आले. भारताची बाजू समजावून सांगण्यासाठी नेहरूंनी बरीच कागदपत्रे आणि नकाशे आणले होते. शेवटी विनोबांना नेहरूंची भूमिका पटली आणि ते शांत राहिले व म्हणाले, जर चीनशी असणारा आपला झगडा राष्ट्रीय सन्मान आणि प्रतिष्ठा सांभाळून सुटला तर त्याच मार्गाने पाकिस्तान आणि काश्मीरचा झगडा सोडण्यात यश मिळू शकेल.

४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी १९६३ या तीन दिवसात भारतातील सर्व खादी कार्यकर्त्यांचा मेळावा नवद्वीप येथे होता. विनोबांनी आपेल चिंतन त्यांच्या समोर मांडीत म्हटले की, ''आतापर्यंत खादी सरकारभिमुख होती, ती आता ग्रामभिमुख करावयाची आहे. प्रत्येक माणसाला काही वार खादी मोफत विणून द्यावी. खादीच्या वीणकामात केलेली मदत गावकऱ्यांना प्रोत्साहन देणारी ठरेल. त्याबरोबर डिफेन्स मेझर म्हणून गावाला कापडाबद्दल स्वावलंबी होता येईल. अशा प्रकारच्या खादी प्रचारावर तुम्ही युद्ध पातळीवरून कामाला लागा. राबर्ट ब्राउनींगच्या कवितेप्रमाणे I have everbeen a fighter so one fitght more. The last and the best.. खादीसाठी अखेरचा प्रयत्न करायचा आहे. यानंतर खादी राणी बनेल अथवा संपुष्टात येईल.''

१८ एप्रिल १९९३ रोजी भूदान यात्रेला एक तप होणार होते. त्या दिवशी विनोबा गंगासागरच्या पदयात्रेला निघाले. गंगासागर हे एक महत्त्वाचे तिर्थस्थळ, तेथे गंगानदी अरबी सागराला मिळते. गंगासागर हे तीसरे टोक- कन्याकुमारी एक टोक, हिमालय दुसरे टोक गाठले. त्यांनी ग्रामस्वराज्याचा त्रिवार जय केला.

**सुलभ ग्रामदान-** २१ डिसेंबर ते २३ डिसेंबर रायपूर येथे विनोबा सर्वोदय संमेलनात हजर राहिले. या संमेलनात विनोबांनी त्रिवीध कार्यक्रमाची घोषणा केली.

१) जोवर ग्रामदानाची संख्या वाढणार नाही तोपर्यंत नव्या युगाची पात्रता येणार नाही. २) शांतीसेना व्यापक झाल्याशिवाय अहिंसक शक्तीचा विकास होणार नाही. ३) खादीचा प्रसार गावागावातून झाला पाहिजे. याच संमेलनात विनोबांनी सुलभ ग्रामदानाची कल्पना मांडली. विनोबा म्हणतात, ''सौम्य - सौम्यतर- सौम्यतम ही अहिंसक क्रांतीची दिशा आहे. ह्या दिशेने पुढे जाताना दात्यांनी जमीन वाटप करावे हे पुढचे पाऊल पडले व प. बंगालात सुलभ ग्रामदान हे त्याहून पुढचे पाऊल पडले. विनोबा म्हणतात, ''ग्रामदानाचा विचार समाज प्रेरणेला पूर्णपणे अनुकूल असा आहे पण स्वार्थ प्रेरणेला तो तितकासा अनुकूल नाही. या दोन्हीचा मेळ घालण्याच्या विचारातून सुलभ ग्रामदानाची कल्पना ध्यानात आली.''

सुलभ ग्रामदानात खालील गोष्टीचा समावेश होतो-

१) ग्रामदानात खेड्यातील निदान ८० टक्क्यां पेक्षा अधिक लोकांनी आपल्या जमीनीची मालकी सोडावी.
२) ग्रामदानात गावची कमीत कमी ५१ टक्के जमीन यावी.
३) प्रत्येकाने आपल्या जमीनीचा २० वा हिस्सा गावच्या भूमीहीनासाठी द्यावा.
४) उरलेली जमीन पूर्वीप्रमाणेच मालकाजवळ राहील व तो ती जमीन कसेल.
५) लहान गाव असल्यास गावच्या सर्व प्रौढांची मिळून एक ग्रामसभा बनेल. मोठे गाव असल्यास प्रत्येक कुटुंबातील एक व्यक्ती ग्रामसभेची सभासद राहिल. गावचा सर्व कारभार ग्रामसभा पाहिल.
६) प्रत्येक व्यक्ती दरवर्षी आपल्या उत्पन्नाचा १ टक्के हिस्सा ग्रामकोष निर्माण करण्याकरिता म्हणून ग्रामसभेला देत राहिल. ग्रामसभा यातून बेकारांना काम देण्याकरीता, उद्योग सुरू करण्याकरीता, अनाथ अपंगाच्या व्यवस्थेसाठी शिक्षण, आरोग्य इत्यादी कामेकेली जातील.

याच यात्रेत कलकत्यात विनोबांनी 'कुराणसार' ह्या पुस्तकाचे प्रकाशन केले. कलकत्यात विनोबांनी चीनी लोकांची वस्ती असलेल्या 'चायना टाऊन'या भागाला भेट दिली. ''... या देशात तुम्हाला प्रेम आत्मियताच मिळेल असे भारतीय जनतेतर्फे मी तुम्हाला आश्वासन देतो. परस्पर स्नेहभाव वाढविण्यासाठी परस्पराची भाषा शिकणे आवश्यक आहे.'' असे मार्गदर्शनपर दोन शब्द विनोबांनी सांगितले. शांतीनिकेतन मधील एका शिक्षकाच्या मदतीने चीनी भाषेचा अभ्यास केला होता. ते म्हणतात, ''चीनी व जपानी या चित्रलिपी फार कठीण असल्यामुळे त्यांना नवी सोपी व शास्त्रीय लिपी असावी. भारताच्या सर्व भाषांनी देवनागरी लिपीचा स्वीकार केला तर पुढे मागे चीन जपानही देवनागरी लिपीचा स्वीकार करतील अशी मात्र आशा आहे.''

**पुन्हा पवनार** : रामपूर संमेलन आटोपून विनोबा ६ एप्रिलला सेवाग्रामला पोहोचले. तेथून ते १० एप्रिलला म्हणजे १३ वर्षानंतर पवनारला पोहोचले. या १३ वर्षाच्या काळात विनोबांनी ८० हजार मैल पायी प्रवास केला, लाखो एकर जमीनीचे भूदान मिळविले, काही हजार ग्रामदाने जाहीर केली. या बरोबरच अनेक ग्रंथाचे संकलनही केले. पवनारला १० दिवस मुक्काम करून २१ एप्रिल १९६४ रोजी विनोबा वर्धा जिल्ह्याच्या पदयात्रेला निघाले. या पदयात्रेत असतानाच त्यांना २७ मे १९६४ रोजी पं. नेहरूंच्या निधनाची बातमी समजली. 'पं. नेहरू महान नेते होते ते अखेरचे नेते आता नेतृत्वाचे युग संपले आहे, गणसेवकाचे युग आले. सर्वांनी मिळून काम करण्याचे, सर्वांनी मिळून निर्णय घेण्याचे युग आले आहे' याच पदयात्रेत असताना त्यांना लॅबरथाईन व्हर्टीगो (कानाची शीर निकामी होणे)मुळे चक्कर आली. त्यांमुळे ते पवनारला परत आले. ब्रह्म विद्यामंदिरात त्यांनी विश्रांती घ्यायचे ठरविले. वैद्यनाथ धामच्या मंदिरात झालेल्या मारहाणीमुळे त्यांना कानाजवळ आणि मान व पाठीवर मार लागला होता. त्यातूनच हा आजार बळावला होता. सर्व प्रकारच्या औषधौपचार पद्धतीचा (पॅथीचा) उपयोग करूनही रोग कायमच राहिला. शेवटी विनोबा गमतीने म्हणाले, ''मी एकच पॅथी सर्वोत्तम मानतो. नॅचरोपॅथी, अॅलोपॅथी ह्या सर्वात श्रेष्ठ आहे सिम्पथी.''

पवनार येथे विनोबांनी ब्रह्मविद्या मंदिरात नोव्हेंबर १९६४ ते जुलै ६४ या काळात विश्रांती घेतली. या कालखंडास विनोबांनी 'अकर्मयोग' असे संबोधले. वेदांतसुधा, अनुशासनम्, विनयांजली, गुरुबोधसार आदी ग्रंथाचे संकलनही या काळात झाले. विनोबा म्हणत मी माझ्या आयुष्यात तीनच संस्था सुरू केल्या १) बडोद्याचे विद्यार्थी मंडळ २) नाळवाडीचे ग्रामसेवा मंडळ ३) पवनारचे ब्रह्म विद्यामंदिर. या तिन्हीना विनोबा महत्त्व देत. यालाच ते आपले जीवितकार्यही मानीत.

पं. नेहरूनंतर शास्त्री पंतप्रधान झाले. विनोबांना भेटण्यासाठी शास्त्रीजी नागपूरहून जामनी या गावी पोहोचले. एका लहानशा झोपडीत विनोबा आणि शास्त्री यांची चर्चा झाली. ऑगस्ट १९६४ मध्ये विनोबा विषमज्वराने आजारी पडले. आजारामुळे आलेल्या अशक्तपणामुळे त्यांना पायी चालण्याचा त्रास होऊ लागला तेव्हा पायी चालण्याचा आग्रह सोडून मोटार वापरण्यास त्यांनी संमती दिली. ६ डिसेंबर १९६४ रोजी जमनालाल बजाजांनी स्थापन केलेल्या शिक्षण मंडळाची सुवर्ण जयंतीसाठी राष्ट्रपती राधाकृष्णन वर्ध्यास आले असता त्यांनीही पवनारला येऊन विनोबांची भेट घेतली. त्यावेळी विनोबा राधाकृष्णनाला म्हणाले, ''आजकाल माझे मौन आणि अश्रवण आहे अधिक भाषणापुढे प्राथमिक रुपात मौन आणि अश्रवण 'रपट पडे की हरगंगात' आहे.

**द. भारत हिंदी विरोध :** फेब्रुवारी १९६५ ला दक्षिण भारतात हिंदी विरोधी आंदोलनाने उग्र स्वरूप धारण केले. हे आंदोलन म्हणजे केंद्र सरकारच्या हिंदीसंबंधी धोरणाच्या विरोधी रोष होता. १२ फेब्रुवारीपासून विनोबांनी उपोषण सुरू केले. दक्षिण भारतावर हिंदी लादणे वा उत्तर भारतावर इंग्रजी लादणे या दोन्ही गोष्टी विनोबांना मान्य नव्हत्या. विनोबांच्या मते दक्षिण भारतीयांनी राष्ट्रभाषेच्या स्वरूपात हिंदी शिकावी आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी उत्तर भारतीयांना कोणत्याही एका दक्षिण भारतीय भाषेचा अभ्यास करावा.

तत्कालीन गृहमंत्री गुलझारीलाल नंदा वर्ध्यास आले असता त्यांनी विनोबांना आश्वासन दिले की, ''भारत सरकार दक्षिण भारतीयांच्या इच्छेविरुद्ध तेथे हिंदीचा आग्रह धरणार नाही.'' दक्षिण भारतीय नेत्यांनीही विनोबांनी कळविले की, हिंदी विरोधी आंदोलनामुळे आम्हालाही दु:ख झाले असून राष्ट्रीय एकात्मतेला धक्का पोहोचणारे कोणतेही कृत्य यापुढे केले जाणार नाही. त्यानंतर पाचव्या दिवशी विनोबांनी आपले उपोषण मागे घेतले.

**प्रदेशदान:** मे १९६५ मध्ये गोपुरी वर्धा येथे सर्व सेवा संघाच्या अधिवेशनात 'संपूर्ण बिहारात ग्रामदान घडवून आणण्यासाठी वादळी आंदोलन उभे करा'' असा ठराव घेण्यात आला. बिहारच्या कार्यकर्त्यांनी या दृष्टीने सुरुवात केली. त्यांना मदत करण्यासाठी १९ मे १९६५ रोजी विनोबा बिहारला जायला निघाले. यावेळी त्यांचा प्रवास मोटारने होता. या आंदोलनाच्या वेळी जमशेदपूर येथे विनोबा आजारी पडले. तीन महिने त्यांनी जमशेदपूर येथेच मुक्काम केला. प्रकृतीस आराम पडताच विनोबा दरभंग्याकडे रवाना झाले. १९६६ च्या शेवटपर्यंत दरभंग्यातील बहुतेक गावाचे ग्रामदान झाले होते. बिहारात ग्रामदानाचे लक्ष पूर्ण होण्याच्या मार्गावर असतानाच बिहारात 'प्रदेशदान'ची कल्पना पुढे आली. राज्याचे दान कडून आल्यास ग्रामदानी संकल्पना अधिक मजबूत होऊन इतरासाठी तरी मार्गदर्शक ठरेल. अशी चर्चा होऊ लागली. २ ऑक्टो. १९६९ मध्ये म.गांधीच्या जन्मशताब्दी पर्यंत प्रदेशदान घडावे अशीही इच्छा विनोबांनी व्यक्त केली.

७ जून १९६६ रोजी बिहारच्या पूर्णिया जिल्ह्यात राणीपतरा आश्रमात विनोबांनी सूक्ष्म कर्मयोगाची घोषणा केली. ५० वर्षांपूर्वी याच दिवशी विनोबा कोचरब आश्रमात गांधीजीकडे पोहचले होते. विनोबा म्हणतात, ''तेव्हापासूनची ५० वर्षे गांधीजींच्या आश्रमात राहून त्यांच्या जीवनाचा त्यांच्या जीवनदर्शनाचा अंगीकार करीत. मी कार्य करीत होतो. आतापर्यंत केलेले कार्य गांधींना अर्पण करून मी मुक्त होण्याचा निर्णय घेत आहे. त्यामुळे मी फक्त असेल, देशाला फक्त इतकेच कळेल की मी कोणत्या प्रदेशात पदयात्रेवर आहे. राज्याला फक्त की मी कोणत्या प्रदेशात

पदयात्रेवर आहे. राज्याला फक्त याची माहिती राहील की मी राज्यातील कोणत्या जिल्ह्यात आहे. आणि जिल्ह्यातील संबंधीताना फक्त काहीदिवस आधी कळविले जाईल की मी जिल्ह्यातील कोणत्या गावी केव्हा येणार आहे. यापुढे लेखन, पत्रव्यवहार इ. कर्म थांबवून सहकाऱ्यांनी स्वावलंबी व्हावे यासाठी त्यांना मार्गदर्शन करणेही थांबवणार आहे.'' सहकाऱ्यांनी आता सर्व निर्णय सर्व संमतीने घ्यावयाचे आहे. सहकाऱ्यांनी आता माझ्यावर मार्गदर्शनासाठी अवलंबून राहू नये.''

पुढे विनोबा म्हणतात, ''जरी मी सूक्ष्मात प्रवेश केला असला तरी दम, दान, दया याचा जो कार्य कर्मआहे त्याच्याशी हृदयाने जोडलेला राहीन. तूफान चाललेलेच होते. यापुढेही मी सहकाऱ्याशी आंतरिक अनुसंधान राखीन. भारतीय सर्व कार्यकर्त्यांचे मनात मी ध्यान करून त्यांचे नाव घेईन, त्यांची आठवण करीन, त्याच्या कार्याची दखल घेईन. यालाच आंतरिक अनुसंधान म्हणतात. यात फार मोठी शक्ती असते, त्यासाठी स्वत:ला विसरून जावे लागते.''

पुढील चार वर्षे विनोबा संपूर्ण बिहारात वादळी पदयात्रा करीत होते. दरभंगायेथील काम सर्वोदयी कार्यकर्त्यांसमोर एक आदर्श म्हणून उभे राहावे यासाठीप्रयत्न चालू होता. दौऱ्यातच २२ सप्टेंबर १९६७ रोजी 'ख्रिस्त धर्मसार' हे पुस्तक लिहून पुन्हा सामान्य माणसाच्या मनात असणाऱ्या ख्रिस्ती धर्माविषयीचे गैरसमज दूर करण्यास मदत केली.

**संगीती** : ७ व ८ डिसेंबर १९६७ ला पुसा रोड येथे विद्वतजनाची परिषद बोलावण्यात आली. प्राचीन काळी बिहारमध्ये अशा सभा बोलावल्या जात. त्यांना 'संगीती' असे म्हणत. या संगीतीत विनोबांनी जाहीर केले की, ''...कार्यक्रमाने शिक्षणात अहिंसक क्रांती घडून येईल. आचार्याच्या हातात संपूर्ण देशाला मार्गदर्शन करण्याची शक्ती असायला हवी. न्यायाधिशाला सरकारकडून पगार मिळतो तरी न्यायविभाग सरकारच्या हाताखाली नाही. त्याच प्रमाणे शिक्षकाला जरी पगार जास्त असला तरी शिक्षकाला स्वतंत्र अस्तित्व असलेच पाहिजे. म्हणून शिक्षकाने सत्तेच्या राजकारणामागे न जाता स्वत:च्या शक्तीचा विकास करावा. कलुषीत राजकारणापासून मुक्त होऊन विश्वव्यापक अशा मानवतेच्या राजकारणाचा व लोकनीतीचा पुरस्कार करावा.'' अशाच वेळी शिक्षक देशाचे नेतृत्व करू शकतील.

या दृष्टीनेच ८ मार्च १९६८ रोजी विक्रमशीलेच्या जवळ भागलपूर जिल्ह्यातील कहलगाव मुक्कामी 'आचार्यकुल' स्थापनेची घोषणा करण्यात आली. 'संगीती'च्या वेळी असलेल्या विचाराचे फळ म्हणजे 'आचार्य कुल' होय. कारण संगीतीच्या वेळी बिहारचे शिक्षणमंत्री कर्पूरी ठाकूर यांनीच ''बिहारच्या समस्या

सोडवण्यासाठी... ..जमले तर आपण वेळ द्याल का?'' असा प्रश्न विनोबांना केला होता. त्यातूनच विनोबांचे आचार्य कुलाचा विचार पुढे आला. या शिक्षण तज्ज्ञाच्या परिषदेत विनोबा म्हणाले, ''आजचे शिक्षण ही एक मोठी समस्या बनली आहे. याचे कारण शिक्षण राज्याच्या हातात गेले आहे. त्यामुळे जो अधिकार आपण शंकराचार्य, तुलसीदास यांना दिला नाही तो अधिकार एका शिक्षण संचालकाला मिळाला. तो फक्त पाठ्यपुस्तके तयार करील व राज्यभर चालवील. त्याचा अभ्यास न करणाऱ्यास नापास केले जाईल. तुलसीदासाने रामायण वाचायला सांगितले नाही. लोक स्वेच्छेने रामायण वाचतात. पुस्तकाचे वाचन इच्छेने झाले पाहिजे तसे पाठ्यपुस्तकाचे होत नाही म्हणून शिक्षण शासनमुक्त हवे.''

याच परिषदेत धर्म आणि राजकारणाऐवजी अध्यात्म व विज्ञान आले पाहिजे. मातृभाषेतून शिक्षण असावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विनोबा म्हणतात, ''ह्या आचार्यकुल परिषदेत काही ईश्वरी संकेत आढळतात ते म्हणजे यातून अहिंसक परिवर्तन घडवून आणता येईल.''

शेवटी आचार्य कुलाच्या स्थापने मागचा हेतू सांगत विनोबांनी म्हटले की, ''आचार्य कुल ही संस्था कर्तव्यजागृती आणि प्रयत्नशीलता या गुणाच्या वाढीसाठी निर्माण होत आहे, यामुळे शिक्षकांचा गमावलेला दर्जा पूर्ववत त्यांना प्राप्त होईल. महाभारतातील धर्मराजाप्रमाणेच शिक्षकाचा धर्मरथ जमीनीपासून वर हवेतच चालला पाहिजे.. यासाठी निश्चयात्मक बुद्धीवर जोर दिला पाहिजे.

११ सप्टेंबर १९६८चा वाढदिवस विनोबांनी 'अभंगव्रते' लिहून साजरा केला. ५ ते ७ ऑक्टोबर १९६८ बोधगयेच्या संत संमेलनाच्यावेळी विनोबांनी आपला 'ऋग्वेदसार' हा ग्रंथ पूर्ण केला. ते म्हणतात, ''५० वर्षे मी वेदाचा अभ्यास केला. साडेचार हजार मंत्रे तोंडपाठ केली त्यातील १३१९ मंत्र म्हणजेच 'ऋग्वेदसार' होय. ऋग्वेदातील १/८ मंत्र निवडून त्याची 'अष्टादशी' हा ग्रंथ जुलै ६९ साली प्रसिद्ध केला.

**विनोबा-सरहदगांधी भेट:** २० ते २५ ऑक्टोबर १९६९ गांधी जन्मशताब्दी वर्षाचे निमीत्य साधून राजगृह येथे सर्वोदय संमेलन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात खान अब्दुल गफार खान-बादशाहखान किंवा सरहद्द गांधी गुजराथमधील सांप्रदायीक संघर्षामुळे येऊ शकले नव्हते परंतु नोव्हेंबर १९६९ मध्ये गफारखानानी सेवाग्रामला भेट देण्याचे जाहीर करताच विनोबांनी सेवाग्रामला जाऊन त्यांचे स्वागत करण्याचे ठरवले. ऑक्टोबरच्या शेवटी विनोबा पवनारात पोहचले आणि मुख्य म्हणजे आयुष्याच्या शेवटपर्यंत विनोबा पवनारातच राहिले.

४ नोव्हेंबर १९६९ बादशाहखान व विनोबांची चिरस्मरणीय भेट घडून

आली. २७ वर्षानंतर दोघांची भेट होत होती. सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी दोघांची देशातील हिंसेवर चर्चा झाली. यावेळी जयप्रकाश नारायण हेही हजर होते. याच वेळी विनोबांनी ए. बी. सी. महासंघाची (Confederation) संकल्पना स्पष्ट केली. अफगाणिस्तान, ब्रह्मदेश आणि सिलोन (ABC) या त्रिकोणात जितके देश येतील त्या सर्व देशाचा एक महासंघ बनवून त्यात भारत, पाकिस्तान, नेपाळ, तिबेट या सर्वांचा समावेश करावा. ज्यामुळे या प्रदेशातील समस्या सुटण्यास मदत होईल. दलाई लामाच्या भेटीच्या वेळी ए. बी. सी. त्रिकोण निर्मितीची जबाबदारी दलाईलामावर टाकावी व दलाई लामानी त्यासाठी प्रयत्न करण्याचे मान्य केले होते.

हिंदी भाषेची सेवा केल्याबद्दल म. गांधी पुरस्कार व सामाजिक सेवेचा रॅमन मॅगसिसे पुरस्कार विनोबांना जाहीर झाले. पायी चालणारा, दानात जमीन मिळवून जनतेला वाटणाऱ्या संताबद्दल परदेशात बरेच कुतुहल निर्माण झाले होते. ब्रिटनचे शांततावादी कार्यकर्ते डेव्हीड ग्रुम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विनोबां बरोबर पदयात्रेत सामील होऊन प्रत्यक्ष कार्याची पद्धत पाहिली. ''तुमचा जय जगत हा एक शब्द पुरे'' असे ग्रुम यांनी विनोबांना सांगितले.

❏

# सूक्ष्मतर कर्मयोग

१९७० च्या अमृत महोत्सवी वर्षापासून ब्रह्मविद्या मंदिरात राहण्याचा विचार विनोबांनी बोलून दाखविला. अमृत महोत्सव साजरा करण्याऐवजी ७५ लाख सूतगुंड्याचा सूत्रकोट आणि ७५ लाख रुपयांचा ग्राम स्वराज्य कोष जमा करावा आणि त्याचा वापर भूदान ग्रामदानाच्या जमीनी सुपीक करण्यासाठी, त्या शेतकऱ्यांची शेतीची अवजारे, बी, बियाणे घेण्यासाठी खर्च करावा. याला विनोबांनी मान्यता दिली. आणि विनोबांच्या सहकाऱ्यांनी हा संकल्प पूर्णही करून दाखविला.

कर्ममुक्ती, ग्रंथमुक्ती, अध्ययनमुक्ती आणि अध्ययनमुक्ती तून विनोबांनी ७ जून १९७० पासून 'सूक्ष्मतर कर्मयोगा'ची सुरुवात केली. आणि पवनार येथे कायम राहण्याचे मनोदय व्यक्त केला. सूक्ष्मतर कर्मयोग म्हणजे काय? हे सांगताना विनोबा म्हणतात, ''मी अधिक सूक्ष्मात प्रवेश करीत आहे. हा निर्णय मी स्वत: माझ्या मनानेच घेतला नसून याला भारतीय परपंरा आहे. क्षेत्रसंन्यास म्हणजे सर्व सोडून एकाच ठिकाणी राहणे. हा विचार अत्यंत प्राचीन आहे. आपले पूर्वज आत्मोन्नतीसाठी असा क्षेत्रसंन्यास घेत. पण माझा विचार तसा नाही. समूहाचे अध्ययन करीत हा सूक्ष्मतर प्रवेश आहे. केवळ बाहेरील हालचालींनी कर्म होत नसून क्रिया जसजशी सूक्ष्म होत जाते तसतसे कर्म विकास पावत असते. म्हणून मी सूक्ष्मातरात प्रवेश करीत आहे.''

सूक्ष्मतर म्हणजे काय? या प्रश्नाच्या उत्तरात विनोबा म्हणाले, ''सृष्टीला समोर ठेवून ईश्वरी स्वरूपाचे ध्यान करणे. लोकांना अभिमुख राहून अंतरात्म्यात विलीन होणे. जी व्यक्ती सूक्ष्मतराचा प्रयोग करते ती शून्य, शून्यतरामध्ये जाईल. शून्य शून्यतरामध्ये जाणे म्हणजेच त्या व्यक्तीची परीक्षा होय. समाजासाठी याचा परिणाम असा असेल की अणुशक्ती प्रमाणे सर्व कर्म सूक्ष्म होऊन त्याच्या परिणाम

स्थूल कर्मापेक्षा अधिक होईल.''

**विनोबा-जयप्रकाश:** विनोबांच्या अधिक सूक्ष्मात जाण्यामुळे जनतेत ग्रामीण, सर्वोदय या कार्याला हवा तेवढा प्रतिसाद मिळेना. कार्यकर्त्यात निराशा वाढू लागली. त्यातूनच जयप्रकाशाचा आणि विनोबांचा असे होत विचारप्रवाह पुढे आले. गुजराथमधील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. देशातील प्रतिगामी शक्तींनी गुजराथ विद्यार्थ्यांचे आंदोलन उचलून धरले. बिहारातही भ्रष्टाचाराच्या प्रश्नावरून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू झाले. तेव्हा त्याचे नेतृत्व जयप्रकाशांनी घेतले. ''सर्वोदयाचे राजकीयीकरण' अशी जयप्रकाशाच्या भूमिकेची संभावना केली जाऊ लागली. अशातच जुलै १९७४ ला पवनार येथे सर्व सेवा संघाच्या बैठकीत विनोबा जयप्रकाश वाद उघड झाला. तडजोड म्हणून विनोबांनी मार्ग सुचवला: 'गंगा ब्रह्मपुत्रा या दोन धारा आहेत. त्याप्रमाणे सर्वोदय ग्रामस्वराज्य हे मूळ काम ज्यांना करायचे आहे त्यांनी ते करावे आणि ज्यांना बिहार आंदोलनात भाग घ्यायचा आहे त्यांनी सत्य, अहिंसा यांची मर्यादा पाळून फक्त बिहारमध्येच काम करावे.''

विनोबांनी जयप्रकाशाच्या आंदोलनाला दिलेली मूकसंमती गृहीत धरून आंदोलक आक्रमक झाले. ४ नोव्हेंबर १९७४ रोजी आंदोलकांनी आपापल्या मतदार संघातील प्रतिनिधीना राजीनामा देण्यास सांगीतले. त्यासाठी सर्वोदयी कार्यकर्ते पाटण्यास जमू लागले. तेव्हा सरकारने सर्वोदयी कार्यकर्त्यांवर हद्दपारी लादली. येथून आंदोलन देशव्यापी करण्याचे जयप्रकाशांनी जाहीर केले.

२५ डिसेंबर १९७४ ख्रिस्त जन्मदिवस, गीता जयंती व ईदच्या त्रिवेणी संगमाच्या मुहूर्तावर विनोबांनी एक वर्षाचे मौन धारण केले. त्यावेळी संघर्ष आंदोलनाला तात्वीक विरोध करणाऱ्या सहकाऱ्यांना विनोबा म्हणाले, ''बुद्धाने त्रिशरण सांगितले बुद्धाला शरण जा, संघाला शरण जा, पण आता संघ (सर्वसेवासंघ) तुटत चालला आहे.संघाला 'रस्ट' लागला आहे. अशावेळी धम्मं सरणं गच्छामि म्हणजे जो धर्म हृदयात आहे त्याप्रमाणे आचरण करा. सर्वसेवा संघाच्या घटनेप्रमाणे सर्वनिर्णय सर्वसंमतीने घ्यायचे असतात. आंदोलनात सहभागी व्हायचे किंवा नाही हा निर्णय होऊ शकला नाही. सर्वसेवा संघाने बेकायदेशीरपणे आंदोलनाला पाठिंबा दिला.

१५ मार्च १९७५ रोजी पवनार येथील सर्व सेवा संघाच्या अधिवेशनापूर्वी जयप्रकाश आणि विनोबा यांच्यात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. संमेलनाच्या शेवटच्या दिवशी विनोबा स्वत:च जयप्रकाशांच्या निवासापर्यंत चालत गेले. काही मिनिटांसाठी मौन सोडले. जयप्रकाशांनी ''चळवळ चालू ठेवावी पण

सरकारबरोबर संघर्ष टाळावा'' पण जयप्रकाशांची असमर्थता दाखविली. विनोबांनी सर्व सेवा संघाला 'उपवासदान' न देण्याची घोषणा केली. (विनोबा एक दिवसाचा उपवास करून ते दान सर्वसेवा संघाला देणे हे उपवासदान). सर्व सेवा संघाचे विसर्जन करावे ही सूचना केली पण तीही फेटाळली गेली. विनोबा हताश झाले.

**अनुशासन पर्व:** २५ जून १९७५ रोजी राजनारायण यांनी इंदिरा गांधी विरुद्ध अलाहाबाद न्यायालयात दाखल केलेल्या निवडणूक विषयक खटला इंदिरा गांधीच्या विरुद्ध गेला व त्यांना निवडणूक लढविण्यास अपात्र घोषित केले. परिणामी देशात आणीबाणी घोषित करण्याची विनंती पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी राष्ट्रपतींना केली. संपूर्ण देशभर आणीबाणी घोषित करण्यात आली. आणीबाणी घोषित होताच जयप्रकाश नारायण व इतर सर्वोदयी कार्यकर्ते, मोरारजी देसाई इत्यादी नेत्याना अटक झाली. वृत्तपत्रावर निर्बंध जाहीर झाले. संपूर्ण देशात अस्वस्थता निर्माण झाली. नागपूरचे खासदार वसंतराव साठे यांनी आणीबाणी विषयी मत विचारता एका चिठोऱ्यावर विनोबांनी लिहिले 'अनुशासन पर्व.' याचाच फायदा इंदिरा गांधी सरकारने करून घेतला. विनोबाही आणीबाणीच्या मताचे आहे असे दाखविण्यासाठी विनोबाच्या 'अनुशासन पर्व' अशी पोस्टर्स जागोजागी लावण्यात आली.

विनोबा मौनात असल्यामुळे विनोबांना अपेक्षित 'अनुशासन पर्व'चा अर्थ जाणून घेण्याचा कुणीही प्रयत्न केला नाही. २५ डिसेंबर १९७५ रोजी विनोबांचे एक वर्षाचे मौन सुटले त्याच दिवशी विनोबांनी अनुशासन पर्वचा त्यांना अपेक्षित अर्थ जाहीर केला. ''हा शब्द महाभारतात आला आहे, तत्पूर्वी उपनिषदात आला आहे. प्राचीन काळी विद्यार्थी शिक्षकाकडे राहून बारा वर्षे शिक्षण घ्यायचा. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तो जेव्हा परत घरी जाण्यापूर्वी शिक्षक त्याला उपदेश करीत 'एतत् अनुशासनम्। एवं उपासित्यम्' हे अनुशासन आहे. आचार्याचे असते अनुशासन आणि राजकारण्याचे असते शासन. शासनाने समस्या सुटत नाही, शासनाच्या आदेशाने चालणारी स्थिती ही आजची स्थिती आहे. त्याऐवजी जग आचार्याच्या अनुशासनाने चालले तर शांतता निर्माण होईल. निर्भय, निर्वैर आणि निष्पक्ष असतो तो आचार्य, अशा आचार्यांच्या मार्गदर्शनाने चालते ते अनुशासन. अनुशासनाला जर शासन विरोध करीत असेल तर शासनासमोर सत्याग्रह करावा. भारताचे शासन अनुशासनाच्या विरुद्ध असे काही करणार नाही.''

**आचार्य कुल:** १६ ते १८ जानेवारी १९७६ पवनार येते आचार्य कुलाचे आयोजन करण्यात आले. श्रीमन्नारायण आणि विनोबांनी निवडलेल्या २६ जणांच्या परिषदेत आणीबाणीचा सांगोपांग विचार झाला. अंतिम निर्णय पंतप्रधानाला

कळवायचा होता. पण आचार्य कुलाची कल्पना काही अमलात आली नाही.

२५ फेब्रुवारी १९७६ रोजी इंदिरा गांधी पवनारला आल्या. विनोबा इंदिरा गांधी भेटीत विनोबांनी आणीबाणी संपवून निवडणुका घेण्याचे, किमान वृत्तपत्रावरील निर्बंध मागे घेण्याचे, काही व्यक्ती सोडून इतरांना कैदेतून मुक्त करण्याची सूचना केली. पण इंदिरा गांधींनी असमर्थता दर्शविली. तेव्हा ११ सप्टेंबर या आपल्या जन्मदिवसापासून विनोबांनी गोहत्या बंदीसाठी आमरण उपोषण करण्याची घोषणा केली. साम्यवादी पक्ष नेते, शासनाधिकारी यांनी विनोबांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. अखेरीस एका तडजोडीने हा प्रश्न मिटला. केरळ व बंगाल सोडून इतर राज्यात गोहत्या बंदीचा कायदा करण्याची घोषणा करण्यात आली. केरळ व बंगाल राज्यासाठी एक वर्षाचा कालावधी देण्याचे ठरले. ११ सप्टेंबर १९७६ रोजी म्हणजे आपल्या ज़न्मदिवशी ही घोषणा झाल्यामुळे विनोबांनी समाधान व्यक्त केले. गोहत्या बंदीच्या कायद्याचेश्रेय चार जणांचे असल्याचे विनोबांनी सांगितले. १) परमेश्वर २) माता रुक्मिणी (विनोबांची आई) ३) म. गांधी ४) इंदिराजी यापैकी तीन आकाशात पण इंदिराजी पृथ्वीवर आहेत म्हणून त्यांना धन्यवाद.

जानेवारी १९७७मध्ये लोकसभा विसर्जित करून निवडणुका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या जनता पक्षाला बहुमत मिळाले. आणीबाणीनंतर इंदिराजींनी राजकारण सोडून सम्राट अशोकाचे अनुकरण करावे असा विनोबांचा सल्ला इंदिरा गांधींनी स्वीकारला नाही. ६ ऑक्टोबर १९७९ जयप्रकाशनाचे निधन झाले. जयप्रकाशांची गुरू नानकासोबत तुलना करीत विनोबा उद्गारले, ''कोणी शत्रू नाहीआणि परका नाही.''

**गोवंश हत्याबंदी**: १९७८च्या अखेरीस कलकत्त्यात कापल्या जाणाऱ्या गाईची करुण कहाणी विनोबांच्या कानावर आली. पुन्हा संपूर्ण गोहत्या बंदीसाठी विनोबांनी उपोषण करण्याची घोषणा केली. २२ एप्रिल १९७९ रोजी विनोबांनी उपोषणाला सुरुवात केली. दुसऱ्याच दिवशी त्यांच्या लघवीत ॲसिटोन आढळल्याने डॉक्टरांनी चिंता व्यक्त केली. सहाव्या दिवशी त्यावेळचे पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी घटना दुरुस्तीत हा विषय मध्यवर्ती सूचीत आणण्याचे आश्वासन दिल्यानंतर विनोबांनी आपले उपोषण सोडले. या नंतरच २१ सप्टेंबर १९८१ रोजी विनोबांचे भाऊ बाळकोबा भावे यांचे निधन झाले.

३० डिसेंबर १९७९ ते १ जानेवारी १९८० पवनार येथे जागतिक महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. ''आध्यात्मिक स्वातंत्र्यासाठी स्त्रियांची यात्रा' हे या मेळाव्याचे उद्दिष्ट होते. जगभरातून १३०० महिला या मेळाव्याला उपस्थित होत्या.

केंद्रात इंदिरा गांधीचे सरकार पुन्हा आले तरी गोहत्या बंदीच्या प्रश्नाची तड लागत नव्हती. दिलेली आश्वासने सरकारतर्फे पाळली जात नव्हती. विनोबांनी म्हटले, ''शरीरात श्वासाचे जे स्थान आहे तेच स्थान समाजात विश्वासाचे आहे. बाबाला विश्वास दिला बाबाने विश्वास ठेवला.'' २४ डिसेंबर १९७१ रोजी मुंबईला गोवंश हत्याबंदीसाठी सत्याग्रह करावा असा आदेश दिला. त्याप्रमाणे सेनापती अच्युतकाका देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली देवनार मुंबईत सत्याग्रह झाला. तरीही त्याचा काहीच उपयोगच झाला नाही. आजही तो प्रश्न तसाच लोंबकळत आहे.

# अखेरचे पर्व

११ सप्टेंबर १९८२ रोजी विनोबांनी जाहीर केले, ''आज बाबाच्या देहाला ८७ वर्षे झाली. बाबाच्या देहाचा आज वाढदिवस आहे. जयंती बाबाची नसून बाबाच्या देहाची आहे.''

विनोबांच्या आश्रम जीवनात फारसा फरक पडला नाही. पण प्रकृती पहिल्यासारखी साथ देत नाही याची जाणीव विनोबांना होऊ लागली होती. काही महिन्यापासून प्रकृती क्षीण होत असून चेहऱ्यावर तेज वाढत होते. ४ नोव्हेंबर १९८२ रोजी विनोबांना थोडा ताप आला. म्हणून सेवाग्रामच्या डॉक्टरांनी त्यांना तपासले लगेच दुसऱ्या दिवशी रात्री साडेआठ वाजता हृदय विकाराचा झटका आला. नागपूरचे हृदय रोग तज्ज्ञ डॉ. चौबे यांनी तपासून उपचार सुरू केला. मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलचे हृदयरोग तज्ज्ञ डॉ. आश्विन मेहता आणि अजग्र गांधी यांनी विनोबांना तपासून नागपूरात हलवण्यास सांगितले. आश्रमवासियांनी याला नकार दिला. ७ नोव्हेंबर १९८२ रोजी विनोबांना थोडे बरे वाटू लागले. नाडी व रक्तदाब सामान्य असून अंगातला तापही उतरला होता. दूध, मध, पाणी दिले ते त्यांनी घेतले. सायंकाळी दादा धर्माधिकारीशी थोडी चर्चाही केली. ८ नोव्हेंबर १९८२ रोजी नेहमीचा दूध पाणी मधाचा आहार घेतला तो शेवटचा. ९ नोव्हेंबर १९८२ पासून विनोबांनी आहार सोडला. यामुळे त्यांच्या प्रकृतीला गंभीर धोका असल्याचे डॉक्टरांनी सांगितले, तरीपण विनोबांनी आहार घेण्यास नकार दिला. १० नोव्हेंबरपासून विनोबांनी औषधोपचारानाही नकार दिला. दुपारी १२.३० च्या सुमारास श्रीमती इंदिरा गांधी आणि राजीव गांधी आले. त्यांनीही काही घेण्याची विनंती केली. त्यांनाही विनोबांनी नकार दिला. १४ नोव्हेंबर १९८२ रोजी विनोबांची अस्वस्थता वाढली. हृदयाची गती वाढली. लघवीचे प्रमाण कमी झाले. पिलानीचे डॉ. अमरजितसिंहना विनोबांनी जपुजीचा पहिला श्लोक म्हणायला सांगितला. १५ नोव्हेंबर १९८२ निर्जल निराहाराचा सातवा दिवस. सकाळी नऊ वाजेपासून

श्वासाची गती क्षीण होत ९.३० वाजता अगदी सहजगत्या श्वासाची गती थांबली. विनाबांचे नहमनिर्वाण झाले.

विनोबा नेहमी जैन धर्माच्या संथारा व्रताबाबत म्हणायचे, ''बाबा संथाराचा विचार नव्हे चिंतन करतो.'' त्यांच्या आयुष्यातले शेवटचे सात दिवस म्हणजे संथारा व्रताचे दिवस होत.

शासनातर्फे शासकीय इतमामात अंतयात्रा करण्यास आश्रमवासियांनी नकार दिला. विनोबांच्या इच्छेप्रमाणे आश्रमातील भगिनींनी तिरडी उचलली. धाम नदीच्या काठावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आश्रमवासिया सोबत गावकऱ्यांनी या समयी दिंडी घेऊन भजन किर्तन केले. त्यातल्याच एका ग्रामीण भगिनीला प्रश्न केला, ''विनोबा गेले आता तुमचे काय होणार?'' त्या भगिनीचे उत्तर मोठे मार्मिक होते, ''पूर्वी जे असूनही नसत, आता नसूनही असल्यागत आहेत.'' दुसरी भगिनी म्हणाली, ''विनोबा गेले नाहीत तर आपल्या सर्वांच्या हृदयात आहेत.''

दुसऱ्या दिवशी विनोबांनी इच्छा व्यक्त केल्याप्रमाणे त्यांच्या आस्थी गोळा करून ते ज्या कुटीत झोपत त्या कुटीत पलंगाखाली २ x ३ च्या खड्यात विसर्जित करण्यात आल्या.

विनोबांचे जन्मगाव गागोदे यानेही विनोबांच्या स्मृती अगदी अनोख्या पद्धतीने जपून ठेवल्या आहेत. विनोबांच्या आईच्या पवित्र स्मृती पलंगाखाली जपणारा रुक्मिणी तलाव. विनोबाचा जन्म झाला ती खोली, विनोबाच्या वापरातील काही वस्तु. आजही गावात विनोबा आश्रम असून कोणत्याही संस्थेकडून कोणतीही आर्थिक मदत न घेता जनाधारित व कार्यकर्त्यांच्या स्वावलंबनावर आधारित आजही या आश्रमाची व्यवस्था आहे. स्वपरिवर्तनातून समाज परिवर्तन ही दिशा आणि कृषी, चरखा, अध्ययन व सर्वोदयी विचाराचा प्रस्ताव हे या आश्रमाचे ब्रीद आहे. ५ जानेवारी २००० पासून या आश्रमातील कार्यकर्त्यांनी आणखी एक अनोखा प्रयोग सुरू केला आहे. आश्रमातील कार्यकर्ते गुराच्या शवविच्छेदनाचे काम करतात. असे काम फक्त गागोदे येथेच होते. खऱ्या अर्थाने विनोबांच्या स्मृती या गावानेक्रांतीकारक पद्धतीने जपून ठेवल्या आहेत.

विनोबा नसूनही त्यांच्या स्मृती कायम राहाव्या यासाठीच. १९८३ साली भारत सरकारने विनोबांना 'भारतरत्न' हा सन्मान मरणोत्तर जाहीर केला आहे.

५० वर्षापूर्वी एका पाश्चात्य अभ्यासकाने 'संत परंपरेतील शेवटचा संत' असे विनोबांचे वर्णन केले होते. त्याच वेळी वसंत नारगोलकरांनीही मात्र विनोबांची धार्मिक, आध्यात्मिक भाषा आणि एक निरोगी सबुद्ध विश्वसमाज स्थापत्याबाबत अत्यंत पुरोगामी आणि मूलग्राही मित्र करणारा 'परमाणु युगातील पहिला संत' असे जे वर्णन केले होते ते विनोबांनी सिद्ध केले. ❑

# विनोबा भावे यांचा संक्षिप्त जीवनपट

| | |
|---|---|
| ११ सप्टें. १८९५ | गागोदे (जि. कुलाबा महाराष्ट्र) येथे जन्म, जन्मनाव विनायक |
| १९०३ | वयाच्या नवव्या वर्षी बडोद्यास शिक्षणासाठी प्रयाण |
| १९१३ | मॅट्रीकची परीक्षा पास |
| १९१४ | विद्यार्थी मंडळाची स्थापना |
| २५ मार्च १९१६ | परीक्षेसाठी मुंबईस जाताना  गृहत्याग काशीस प्रयाण |
| ७ जून १९१६ | म. गांधी-विनोबा यांची कोचरब आश्रमात भेट |
| फेब्रु. १९१७ | विनोबा-लो. टिळक यांची भेट |
| २४ ऑक्टो. १९१८ | विनोबांच्या आईचे निधन |
| ८ एप्रिल १९२१ | वर्धा आश्रमाची स्थापना |
| जाने. १९२३ | 'महाराष्ट्र धर्म' मासिकाचे प्रकाशन सुरू |
| १३ एप्रिल १९२३ | झेंडा सत्याग्रहात सहभाग. नागपूर येथे अटक |
| १९२४ | वायकोम (कन्याकुमारी) येथे मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह |
| ७ ऑक्टो. १९३० | 'गीताई' लिखाणास प्रारंभ |
| ६ फेब्रु. १९३१ | 'गीताई' लिखाण समाप्त |
| २१ फेब्रु. १९३२ ते १९ जून १९३२ | धुळे कारागृहात 'गीता प्रवचने' |
| १४ जुलै १९३२ | 'गीताई'चे धुळे कारागृहात प्रकाशन |
| ६ मे १९३४ | ग्राम सेवा मंडळाची स्थापना |
| ४ एप्रिल १९३६ | सेवाग्राम वर्धाची स्थापना |
| डिसें. १९३७ | बुनियादी तालीम अहवालाची प्रसिद्धी |
| ७ मार्च १९३८ | परंधाम पवनार आश्रमाची स्थापना |
| २४ ऑक्टो. १९४७ | पहिला सत्याग्रही म्हणून म. गांधीतर्फे निवड. तीन महिने शिक्षा |
| ऑक्टो १९४८ | वडिलांचे निधन |
| १४ मार्च १९४८ | सेवाग्राम येथे सर्वोदय मंडळाचीस्थापना |
| १ जाने १९५० | कांचन मुक्तीची सुरुवात |
| १८ एप्रिल १९५१ | पोचमपल्ली (आंध्र प्रदेश) येथे भूदानाची सुरुवात |
| २३ मे १९५२ | मंगरोठ ( जि. हमीदपूर उ. प्र.) पहिले ग्रामदान |
| २४ ऑक्टो. १९५२ | 'संपत्तीदान' संकल्पाची सुरूवात |

| | |
|---|---|
| १२ मार्च १९५३ | 'श्रमदान' संकल्पनेची सुरुवात |
| १९सप्टें१९५३ | वैद्यनाथाश्रम (बिहार) येथे हल्ला |
| ११ जुलै १९५४ | कोलीक्कड (केरळ) येथे शांतिसेनेचीस्थापना |
| १ फेब्रु १९५८ | 'सर्वोदय पत्र' विचाराची सुरुवात |
| १५ ऑगस्ट १९५८ | अक्राणी (जि. धुळे) पहिले तालुकादान |
| ७ जून १९६० | २० डाकूचे आत्मसमर्पण-चंबळघाटी शांतता समितीची स्थापना |
| सप्टें १९६२ | पूर्व पाकिस्तानात पहिले भूदान |
| २३ डिसें १९६३ | 'सुलभ ग्रामदान' |
| ७ जून १९६६ | सूक्ष्मात प्रवेश |
| ८ मार्च १९६८ | आचार्य कुलाची स्थापना |
| २३ ऑक्टो १९६९ | राजगृह संमेलनात गांधी जन्मशताब्दीनिमित्त बिहार राज्यदान |
| ४ नोव्हें. १९६५ | विनोबा बादशाहखान भेट |
| ७ जून १९७० | सूक्ष्मेतरात प्रवेश |
| २५ डिसें १९७४ | एक वर्षाच्या मौनाची सुरुवात |
| ४ नोव्हें १९८२ | अंतिम आजाराची सुरुवात |
| ८ नोव्हे १९८२ | अन्न घेण्यास नकार |
| १५ नोव्हें १९८२ | निराहाराच्या-संथारा व्रताच्या -सातव्या दिवशी सकाळी ९.३० वाजता ब्रह्म निर्वाण |
| १९८३ | भारत सरकारतर्फे मरणोणरान्त 'भारत रत्न' पुरस्कार |

# संदर्भ ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १) विनोबा | निर्मलादेशपांडे | नॅशनल बुक ट्रस्ट, नई दिल्ली |
| २) विनोबा | भ. ग. बापट | राजहंस प्रकाशन, पुणे |
| ३) साम्ययोगी विनोबा | वसंत नारगोलकर | भारतीय विद्याभवन, मुंबई |
| ४) दानयात्री विनोबा | सविता भावे | वरदा प्रकाशन, पुणे |
| ५) ऋषि विनोबा (हिंदी) | श्रीमन्नारायण | सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी |
| ६) विनोबा जीवन दर्शन | शिवाजी भावे | म. राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई |
| ७) विनोबा सारस्वत | राम शेवाळकर | साहित्य अकादमी, नई दिल्ली |
| ८) विनोबा भावे | ठाकूरदास वंग | ठाकूरदास वंग वर्धा |
| ९) विनोबा-जीवन और कार्य (हिंदी) | कांतिशाह | सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी |
| १०) आचार्य विनोबा भावे | अनु. अंजली नारगोलकर | प्रकाशन विभाग, भारत सरकार |
| ११) विनोबाजी महाप्रयाणयात्रा | संपा. रामभाऊ म्हसकर | परंधाम प्रकाशन, पवनार |
| १२) तिसरी शक्ती | विनोबा | परंधाम प्रकाशन, पवनार |
| १३) स्नेहनीति | विनोबा | परंधाम प्रकाशन, पवनार |
| १४) अहिंसेचा शोध | संपा. कालिंदी | परंधाम प्रकाशन, पवनार |
| १५) काकाजी, बापु विनोबा | अनु. तारा भागवत | परंधाम प्रकाशन, पवनार |
| १६) दैनिक सका | ३० मार्च २००३ | आचार्य विनोबांचा गाव, ले. डॉ. विश्वास पाटील |



अन्त्यसंस्काराच्या ठिकाणी उभारलेली स्मृती

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनअंतर्गत मालिकेतील चरित्रग्रंथ

| | | |
|---|---|---|
| १) एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ३६/- |
| १५) बॅ. राजाभाऊ खोब्रागडे | श्री. व्ही. डी. मेश्राम | रु. ३५/- |
| १६) स्वामी रामानंद तीर्थ | श्री. प्रकाश मेदककर | रु. ४५/- |
| १७) पठ्ठे बापूराव | श्री. चंद्रकुमार नलगे | रु. ४५/- |
| १८) भाई उद्धवराव पाटील | श्री. व. न. इंगळे | रु. ५५/- |
| १९) धोंडो केशव कर्वे | डॉ. न. म. जोशी | रु. ४०/- |
| २०) लोकहितवादी | डॉ. निर्मलकुमार फडकुले | रु. ५०/- |
| २१) यदुनाथ थत्ते | डॉ. मु. ब. शहा | रु. ४०/- |

| | | |
|---|---|---|
| २२) गोविंदभाई श्रॉफ | डॉ. विजय दिवाण | रु. ४५/- |
| २३) लोककवी शाहीर रामजोशी | श्री. शिरीष गंधे | रु. ४५/- |
| २४) वसंतराव नाईक | डॉ. उत्तम रुद्रवार | रु. ३५/- |
| २५) महात्मा फुले | श्री. श्रीराम गुंदेकर | रु. ४०/- |
| २६) स्वातंत्र्यसेनानी तुळशीदास जाधव | श्री. व्यंकटेश कामतकर | रु. ४६/- |
| २७) ना. ग. गोरे | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ३५/- |
| २८) शंकरराव चव्हाण | डॉ. सुरेश सावंत | रु. ४५/- |
| २९) 'पंडिता रमाबाई' | डॉ. सिसिलिया कार्व्हालो | रु. ४५/- |
| ३०) बॅ. नाथ पै | जयानंद मठकर | रु. ३५/- |

## *मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे*

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

## *अधिक माहिती/चौकशीसाठी*

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
पु. ल. देशपांडे कला अकादमी,
दुसरा मजला, रवींद्र नाट्य मंदिर इमारत,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०० ०१४
दूरध्वनी - २४२२६१५६/२४३२५९२९



## प्रा. किसन चोपडे

प्रा. किसन चोपडे गेली ३२ वर्षे मराठवाड्यातील परभणी येथील श्री शिवाजी महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग प्रमुख. त्यात १० वर्षे पदव्युत्तर विभाग प्रमुख आणि उपप्राचार्य. १ जानेवारी २००३ पासून सेवा निवृत्त.

'तपासणी ' हा कथासंग्रह प्रसिद्ध. आधुनिक भारतीय राजकीय विचार हा आवडीचा विषय. राज्यशास्त्र विषयावरील १५ क्रमांक पुस्तकाचे लिखाण, शिवाय 'राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि गुन्हेगारांचे राजकारण' आणि 'परभणी जिल्ह्यातील विस्थापित ऊसतोड कामगारांच्या राजकीय आणि सामाजिक समस्या' असे दोन शोध प्रकल्पाचे काम पूर्ण.

अखिल भारतीय गांधी अध्ययन समितीचे आजीव सभासद. गांधी आणि विनोबांच्या विचार कार्यावर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदातून शोध निबंधाचे वाचन. 'गांधी ज्योति', 'गांधी जर्नल' मधून गांधी, विनोबांच्या विचारांवर इंग्रजी, हिंदीतून लिखाण प्रसिद्ध. 'मेक्सीकन गांधी सिझर शॅवेझ' हे पुस्तक प्रकाशनाच्या मार्गावर.

समाज प्रबोधन पत्रिकेच्या संपादक मंडळाचे माजी सभासद.